
# शब्द रुची

४७

जून २०२२ • मूल्य १० रुपये • ४४ पृष्ठे

## अशोक सराफ @ ७५!




### प्रसिद्ध झाले 'मी बहुरूपी'

अशोक सराफ यांच्या अभिनयप्रवासाचे आत्मकथन




'मी बहुरूपी' प्रकाशनसमयी अरुण जोशी, सुदेश हिंगलासपूरकर, राज्याचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षणमंत्री छगन भुजबळ, सुनील गावसकर, राजदत्त, अशोक सराफ, निवेदिता सराफ, मीना कर्णिक, अनिल खंवटे, किशोर मासुरकर, सुभाष सराफ आणि उदय गुरकर

# पुस्तकप्रकाशनाची क्षणचित्रे



अरुणा असण्याचा गंध



मंत्रमुग्धा



राजा कालस्य कारणम्



'हे सांगायला हवं' पुस्तकाची ब्रेल लिपीतील आवृत्ती प्रसिद्ध




बाबा आमटे : व्यक्तित्व, कवित्व आणि कर्तृत्व



माझी कार्पोरेट दिंडी

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द रुची ४७

जून २०२२, वर्ष नववे
अंक दुसरा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

## अनुक्रम

बडोदे यांच्या साहित्य संमेलन –
**अभिराम भडकमकर** यांचे अध्यक्षीय भाषण / ६

दोन अध्यक्षीय भाषणे / ९
**नीतिन आरेकर**

'स्वीकार' आणि अस्वीकार / १२
**अरुणा ढेरे**

प्रिय दिनू... / १५
**शिवराम भोंडेकर**

### अन्य लेख

अंकल टॉम्स केबिन – हॅरिएट बीचर स्टोव्ह
**राजीव श्रीखंडे / १७**

मानसिकतेत बदल आवश्यक / **२१**
**शरद काळे**

दीपक श्रीपाद भवरासकर / **२४**
**प्रकाश दुधळकर**

बहुआयामी चित्रकार / **२७**
**विजयराज बोधनकर**

**ग्रंथाली पुस्तकप्रकाशन वृत्तांत / ३२ ते ३८**

**'ग्रंथाली' ग्रंथपाने / चांगदेव काळे / ३९**

कार्यालयीन संपर्क
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग**
**सचिन पिळणकर, समीर कदम**
**साहाय्य – अर्चित नागवेकर**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ४०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

SCAN & PAY
1000210529000008.9821032830@idbi
GRANTHALI

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५०
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## संपादकीय

**गेल्या** महिन्याचा अंक अभिजात मराठी या विषयावर मतं मांडणारा होता. मला एकानं प्रश्न केला, अभिजात म्हणजे काय? आली का पंचाईत! शब्दकोशातला त्याचा अर्थ कुलीन, सभ्य, थोर, प्रतिष्ठित असा आहे. भाषेला 'अभिजात' दर्जा देणं हे केंद्र सरकारच्या अखत्यारीत आहे. कुठलंही सरकार म्हटलं, की त्यात राजकीय इच्छाशक्ती येतेच. सध्या राजकीय मंडळींची भाषा ऐकली की 'अभिजात' शब्दाच्या व्याख्येबद्दल संभ्रम निर्माण व्हावा अशी स्थिती आहे. मराठीला अभिजात दर्जा मिळेल तेव्हा मिळो. परंतु जिच्याबद्दल 'अस्मिता' बाळगतो ती मराठी काळानुरूप बदलत आता अशा स्थितीत कात टाकत आहे, की आज व उद्याची भाषा कशी असेल ते स्पष्ट होतं.

प्रमाणभाषा व अनौपचारिक भाषा हे वाद किंवा विचार होत राहिले तरी त्यात बोली व ग्रामीण भागांतील शब्द समाविष्ट करून ती समृद्ध करावी असं मत मांडणं गैर नाही. ऑक्स्फर्डनं भारतीय शब्द कसे स्वीकारले हे कौतुकानं सांगताना, अधिकांश लोक बोलतात ते मराठी शब्द प्रमाणभाषेत घेण्यास का विरोध असावा?

हे आजवरच्या प्रमाण व मूळ बोली अथवा ग्रामीण भाषेबद्दल झालं. मात्र आज मराठी नाटक, सिनेमा, मालिका, बातम्या, वृत्तांत, वृत्तपत्रं यामधून ज्या प्रकारे मराठी बोलली-लिहिली जाते ती या मुद्यांपलीकडची आहे. ''मला 'समोरून' फोन आला'', ''आपण ज्याला फोन केला आहे 'तो' व्यक्ती उत्तर देत नाही'', ''हा शर्ट 'तुझ्यावर' उठून दिसतो'', ''मी कालच अमेरिके'वरून' आलो'', ''मी त्याच्या 'सोबत' लग्न करणार नाही''... अशी अनेक वाक्यं आज सहज वापरली जातात. आजपर्यंत अन्य भाषांतले पूर्ण शब्द मराठीत येत होते. 'सजग' किंवा 'सावध'ऐवजी हल्ली 'सतर्क' म्हटलं जातं, तसे. इथे फक्त शब्दच अन्य भाषांतले आले. परंतु आताची भाषा ही व्याकरणच मोडून प्रकट झाली आहे. 'टेबला'वर पसारा झालाय तो आवर असं म्हणण्याऐवजी 'टेबल'वर असं सोपं मराठी रुजतंय. आता कदाचित वाघीण न म्हणता 'ती' वाघ, घोडीऐवजी 'ती' घोडा असे शब्दही येतील. काय काय रूपं होतील, काळच ठरवेल. भाषेची शुद्धाशुद्धता शब्दांवरून ठरवू नये, वापरावर ठरावी. अस्खलित शुद्ध(?) मराठीत एखाद्याला भाषेवरून हीन लेखणं आणि ग्राम्य भाषेत उत्तम विचार मांडणं यातला भेद लक्षात घ्यायला हवा. आपली भाषा सभ्य, सुसंस्कृत ठेवली तर ती 'अभिजात'च असेल. तिला कोणाच्या प्रशस्तीची गरज नाही.

ठरावीक वर्गाची भाषा म्हणून प्रमाणभाषेकडे पाहिलं जातं. मात्र जाऊ दे'त', खाऊ दे'त', 'हिकडं-तिकडं', काय 'कराचं', 'दिलंनी, घेतलंनी', 'दिलंन्-घेतलंन्' असं बोलणारे याच वर्गातले आहेत. तेही स्थळानुसार तिथल्या लहेजाची भाषा बोलतात. त्यांनाही लिहिताना प्रमाषणभाषेतच लिहावं लागतं, हे लक्षात घ्यायला हवं.

पुण्या-मुंबईची भाषा म्हणजे मराठी भाषा नव्हे, असं मत मध्यंतरी नागराज मंजुळेनं व्यक्त केलं. तो 'झिंगाट', 'सैराट', 'लागिरं' असे शब्द आता कसे रुळले आहेत हे सांगतो. ते योग्यच आहे. याहीपुढे तो अशा शब्दांची सूची करणार आहे हे अधिक महत्त्वाचं आहे. असे विविध ठिकाणचे शब्द अर्थासकट मराठीत सामावले, रुळले की ती व्यापक होईल. तिच्या अस्ताची भीती बाळगणाऱ्यांनी हाही विचार करायला हवा.

*

दोन मनस्वी साहित्यिक आपल्यातून गेले. 'ग्रंथाली'चं 'कविता दशकाची' हे ऐंशीच्या दशकातील नवीन कवींच्या प्रज्ञेची दखल घेणारं पुस्तक प्रसिद्ध झालं. त्यात एकमेव कवयित्री असलेल्या रजनी परुळेकर आणि ज्यांचं 'बिलामत' ग्रंथालीनं प्रसिद्ध केलां ते दिनकर दाभाडे, या दोन संवेदनशील लेखकांचं निधन झालं. अरुणा ढेरे यांनी रजनी परुळेकर यांना लिहिलेलं पत्र आणि शिवराम भोंडेकर यांनी दिनकर दाभाडे यांच्यावर लिहिलेला लेख यातून त्यांचं व्यक्तिमत्त्व उलगडतं.

शरद काळे, राजीव श्रीखंडे, विजयराज बोधनकर आणि प्रकाश दुधळकर यांचे नियमित लेख आणि चांगदेव काळे यांची 'ग्रंथपाने' आहेतच.

'ग्रंथाली'नं गेल्या महिन्यात बरीच प्रकाशनं केली. त्यांचे वृत्तांत अंकात आहेत व त्यांच्या चित्रफिती ग्रंथालीच्या यूट्यूब चॅनेलवर उपलब्ध आहेत.

**– अरुण जोशी**
कार्यकारी संपादक

# मी बहुरूपी

## देखणा प्रकाशनसोहळा

अशोक सराफ यांच्या ‘मी बहुरूपी’ या अभिनयप्रवासाच्या आत्मकथनाचं प्रकाशन ४ जून रोजी ख्यातनाम क्रिकेटपटू सुनील गावसकर यांच्या हस्ते झालं. या वेळी दिग्दर्शक राजदत्त आणि अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षणमंत्री छगन भुजबळ उपस्थित होते. मुंबईतल्या मुलुंड येथील कालिदास नाट्यगृहात अशोक सराफ यांच्या पंचाहत्तरीतील प्रवेशानिमित्त त्यांना मानवंदना म्हणून सौमिल क्रिएशनच्या सुनील भोसले यांनी झी मराठी वाहिनीसाठी साजरा केलेल्या समारंभात हा प्रकाशनसोहळा पार पडला.

ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर आणि अरुण जोशी, सारस्वत बँकेचे डायरेक्टर किशोर मासुरकर, एसव्हीसी बँकेचे व्हाइस चेअरमन उदय गुरकर, अल्कॉन एन्टरप्रायझेसचे अनिल खंवटे, मीना कर्णिक, सुभाष सराफ आणि अशोक व निवेदिता सराफ प्रकाशनसमयी उपस्थित होते.

अशोक आणि सुनील गावसकर ही दोघंही ग्रँटरोड येथील चिखलवाडी परिसरात वाढले. त्यांच्या लहानपणचे अनेक किस्से यावेळी दोघांनी सांगितले. सुनील गावसकर यांनी अशोकबरोबर केलेल्या नाटकांची आठवण काढली, तर अशोक सराफ यांनी सुनीलच्या बालपणच्या फलंदाजीला दाद दिली. ‘‘रस्त्यातून चालताना अशोक कसा स्वत:शीच बोलत जाताना दिसत असे, आज मोबाइलच्या ब्लूटूथवर माणसं अशी एकटीच बोलताना दिसतात, म्हणजे अशोकपाशी ती दूरदृष्टी लहानपणापासूनच होती,’’ ‘‘एका नाटकावेळी मला कडकडून भूक लागली होती. मी मरणाला तयार आहे, हे वाक्य ‘मी वरणाला तयार आहे’ असं मी म्हटलं,’’ अशा खुमासदार वक्तव्यांनी गावसकर यांनी प्रेक्षकांची दाद मिळवली.

छगन भुजबळ यांनीही अशोक सराफ यांच्याविषयीच्या आपल्या आठवणींना उजाळा दिला. त्यांची निर्मिती असलेल्या दोन चित्रपटांमध्ये अशोक सराफ यांनी मध्यवर्ती भूमिका केलेली आहे हे त्यांनी आवर्जून सांगितलं आणि आपली अनेक वर्षांची मैत्री असल्याचंही म्हटलं.

‘मी बहुरूपी’ या पुस्तकाला दिग्दर्शक राजदत्त यांची प्रस्तावना आहे. प्रकाशन समारंभात अभिनेता जितेंद्र जोशी यांनी या सुरेख प्रस्तावनेचं वाचन केलं.

अशोक सराफ यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त झी मराठीनं एक भव्य कार्यक्रम आयोजित केला होता. अशोक यांच्या सिनेमांमधल्या गाण्यांवर वर्षा उसगांवकर, किशोरी शहाणे, अलका कुबल या त्यांच्या नायिकांनी आणि सिद्धार्थ जाधव यांनी नृत्यं सादर केली. त्यांच्या नाटकांमधले प्रवेश पेश करण्यात आले. सचिन पिळगावकर यांनी एक गाणे सादर केले.

या पुस्तकाचं शब्दांकन केलं आहे पत्रकार मीना कर्णिक यांनी. मुखपृष्ठ आणि आतील सजावट नूतन आसगांवकर यांची आहे, तर अशोक सराफ यांची विशेष छायाचित्रं नितीन चिटणीस यांनी टिपली आहेत.

संगीत नाटकांपासून व्यावसायिक नाटक आणि सिनेमापासून टीव्हीपर्यंतच्या पन्नास वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीचा अशोक सराफ यांचा प्रवास, वैयक्तिक आयुष्यात आलेले बरेवाईट अनुभव, भेटलेली माणसं, त्यांच्याकडून कळत–नकळत झालेले संस्कार या सगळ्याबद्दल त्यांनी प्रांजळ कथन पुस्तकामध्ये केलेलं आहे. पुस्तकाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे बदलत गेलेल्या नाट्य आणि सिनेसृष्टीचं हे एकप्रकारचं डॉक्युमेंटशन आहे.




**पूर्ण रंगीत छपाई... आर्ट पेपरवर...**
**मूल्य ६०० रुपये**
**सवलतीत ३५० रुपयांत**
**टपालखर्च ५० रुपये वेगळा**

## मराठी वाङ्मय परिषद, बडोदे यांच्या साहित्य संमेलनात

# अभिराम भडकमकर यांनी केलेले अध्यक्षीय भाषण



**नमस्कार!** या बडोद्याच्या साहित्य रसिकांच्या समोर उभं राहताना मला विलक्षण आनंद होतो आहे.

या वाङ्मय परिषदेचा इतिहास मोठा आहे. साक्षात चिं.वि. जोशी यांचं योगदान असलेली ही संस्था. माझ्यासारख्याच्या दृष्टीनं साहित्याचं मंदिरच आहे. मी त्यांना वंदन करतो. बडोदा म्हटलं की सयाजीराव गायकवाड यांचं स्मरण होणं स्वाभाविक आहे. कलाकार, साहित्यिक, समाजसुधारक आणि क्रांतिकारकांचे ते आधारस्तंभ होते. काळाच्या पुढे पाहणारा राजा असंच त्यांचं वर्णन करावं लागेल. त्यांना मी विनम्रतेनं अभिवादन करतो.

आपण सर्व साहित्याच्या धाग्याने जोडले गेलो आहोत. सर्वप्रथमच मी स्पष्ट करू इच्छितो, की मी साहित्यावरच बोलणार आहे. आजकाल साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांच्या भाषणाचा पायंडा थोडासा ठरलेला आहे. तो चुकीचा आहे असे मी म्हणणार नाही, ती त्यांची मते आहेत. मला असं वाटतं की सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, सर्व विषयांवर बोलताबोलता साहित्यावर बोलणे राहून जाते का? साहित्याची बांधिलकी समाजाशी असते असं म्हणत असताना, राजकीय प्रश्नांच्याबद्दल बोलत असताना साहित्याबद्दल आपण बोलतो का? माझ्या आजच्या भाषणाचा केंद्रबिंदू हा साहित्य आणि वाङ्मय हाच असणार आहे. हा माझा परीघ या ठिकाणी मी आखून घेतलेला आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक प्रश्नावर मला मतं नाहीत असं नाही. ती आहेतच, पण ती मांडायची ही जागा नव्हे.

साहित्य काय असतं हो, साहित्याचा प्रांत नेमका कुठे सुरू होतो, असे प्रश्न पडतात तेव्हा मला व्यंकटेश माडगूळकरांच्या लहानपणची एक आठवण आठवते. माडगूळकर खेळायला गेले होते आणि खेळता खेळता त्यांना त्यांच्या गावचा, मासे पकडणारा एक माणूस भेटला. तो मित्रच होता त्यांचा. वयानं मोठा होता. त्यांनी विचारलं, काय रे, कुठे चालला? तो म्हणाला, हे आपलं मासे पकडायला चाललो. दिवसभर व्यंकटेश माडगूळकर खेळत होते मित्रांबरोबर. संध्याकाळी ते परत यायला निघाले तेव्हा पुन्हा त्यांना तो माणूस भेटला. त्यांनी विचारलं, काय रे, गावले का मासे? आता या प्रश्नाचं उत्तर हो मासे गावले किंवा मासे नाही गावले असू शकतं. परंतु तो काय म्हणाला? नाय बा. आज एक बी मासा नाय गावला. तो तिथेच थांबला नाही. तो म्हणाला, नाय बा, आज एक बी मासा नाय गावला. आज नदीला जनू एकादस होती. मित्रांनो, साहित्याचा प्रांत 'आज नदीला जनू एकादस होती', इथून सुरू होतो...

सामान्य माणूस आपण ज्याला ले मॅन म्हणतो आणि आपण साहित्यिक, दोघांमध्ये नेमका फरक काय असतो? या मला वाटतं, सामान्य माणूसही जगतो, साहित्यिकही जगत असतो; पण साहित्यिक जगता जगता त्या जगण्याकडे बघत असतो. बघता बघता त्या जगण्याचा अन्वयार्थ लावायचा प्रयत्न करत असतो आणि मग तो अन्वयार्थ कुठल्यातरी साहित्यप्रकारच्या माध्यमातून लोकांच्या समोर ठेवायचा प्रयत्न करतो. मग ती कविता असेल, कादंबरी असेल, कथा असेल, काही इतर असेल. तर तो मासे पकडणारा जो होता ना त्याच्याकडे कागद-पेन नव्हतं किंवा तो सुशिक्षित नव्हता, म्हणून आपण त्याला साहित्यिक मानत नाही, पण त्याच्याकडे साहित्यिकाचे गुण निश्चित होते. कारण त्यानं जगण्याकडे बघितलं, बघता बघता त्याचा अन्वयार्थ लावला आणि तो अन्वयार्थ 'नाय बा. आज नदीला जनू एकादस होती' अशा पद्धतीनं आपल्यासमोर ठेवला.

म्हणूनच साहित्यिकाचं मूळ काम आपल्या आजूबाजूला जे काही आहे त्याच्याकडे बघणं, त्याचा अन्वयार्थ लावणं आणि ते साहित्यात मांडणं, असं असतं.

आता इथे आजूबाजूला म्हणजे नेमकं कुठे? कुठपर्यंत?

म्हणजे लेखकाचा भवताल असा एका स्थळ-काळापुरता बांधून घालता येतो का? सध्या 'समकालीन' वास्तव असा एक शब्द फार ऐकू येतो. परंतु साहित्यात, कलेत समकालीन नामक काही असतं का? असू शकतं का? लेखक ज्या गोष्टी सांगतो त्याला काही तात्कालीन, समकालीन तपशील असू शकतात. म्हणून तो त्या तपशिलापुरताच बोलत बसला तर रिपोर्ताजच्या पलीकडे त्याचं लेखन जाईल का?

महाभारताचा काळ कुठला? मला तर ते आजचंच वाटतं. शेक्सपीयर हा आजचाच वाटतो. मग लेखकाला समकालीनतेच्या चौकटीत बस म्हणण्याचा आग्रह कितपत योग्य आहे? भूत, भविष्य, वर्तमान हे मानवानं आपल्या सोयीसाठी पाडलेले तुकडे आहेत. काळ सलगच असतो असं आइनस्टाइनही सांगून गेला आहेच.

आताच्या कोलाहलात हा प्रश्न कदाचित असंवेदनशील वाटेलही, पण आजचं साहित्य समकालीन वास्तवाला भिडतं का? यावर परिसंवाद घेण्याआधी साहित्याचे ते काम आहे का याचा विचार व्हायला नको का? प्रश्न विचित्र वाटेल कारण मग साहित्यिकानं आजूबाजूच्या परिस्थितिकडे काणाडोळा करायचा का असा प्रश्न येऊ शकतो. साहित्य आजूबाजूचे सामजिक, धार्मिक, राजकीय वातावरण, व्यवस्था, शोषण, सामाजिक दरी, वंचित, स्त्रिया तरुण, आदिवासी, अल्पसंख्य, यांचे प्रश्न, जगणं हे सर्व कवेत घेणार की नाही?

एकीकडे लेखक एका काळापुरता बांधील राहू शकत नाही म्हणायचं आणि दुसरीकडे या सगळ्याचीही लेखनात अपेक्षा करायची, असं कसं होऊ शकेल? आणि लेखकाला या भवतालापासून दूर राहता येईल का?

या आणि आशा साहित्यिक प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न करण्याचं हे व्यासपीठ आहे, असं मला वाटतं. राजकीय गप्पा काय सोशल मीडियावरही होऊ शकतील.

लेखकाला लेखनाचं आशयद्रव्य पुरवतो तो कुठलातरी काळच ना? म्हणजे लेखकाला ज्ञात असलेला काळच ना? माझ्या मते महान लेखक ही कोंडी फोडण्यात यशस्वी ठरतो तो इथेच. तो त्याला ज्ञात असलेल्या काळाचा तुकड़ा घेतो. तत्कालीन भवतालाबद्दल बोलता बोलता सार्वकालिक होत जातो. म्हणूनच शेक्सपीयर गोष्ट सांगतो ती त्या काळातली असूनही ती मला माझी, आजची वाटू शकते. मोठा लेखक कदाचित समकालीन शोषणानं सुरुवात करेल, पण एकूणच माणसांतली शोषकवृत्तीच उलगडून काढेल. जसे महर्षी व्यास षड्विकारानं लिप्त माणसाची मांडणी करतात. जी.ए. नियतीचा धांडोळा घेतात. तर चिं.त्र्यं. अज्ञाताच्या प्रदेशाचा. दळवींना माणसाच्या लैंगिक घुसमटीचा तर चेकोव्हला महत्त्वाकांक्षानी जखडलेल्यांचा शोध खुणावतो. हे सर्व एका मूलभूत चिंतानाकडे नेणारं असतं आणि ते तात्कालिकतेच्या पल्याड जातं.

समकालीन किंवा तात्कालिक भवतालाविषयी एक भान देणारं, ज्याला आपण मंथनवादी साहित्य म्हणू, त्यांचे त्या त्या काळात, त्या त्या काळापुरतं एक योगदान नक्कीच असतं, पण त्याला काळाची सीमा असते. म्हणून इबसेनच्या नोरानं एका काळात एक भूमिका बजावली; पण अजूनही चेकोव्हची नीना जरेश्न्या किंवा शेक्सपीयरची लेडी मॅक्बेथ आजही न सुटलेली कोडी होऊन बसतात.

याचा अर्थ आजूबाजूच्या परिस्थितीबाबत अनभिज्ञ असणं अथवा उदासीन असणं असं नव्हे; तर एक मोठीच जबाबदारी लेखकावर असते असा आहे. केवळ सद्यस्थितीबाबत एक जागृती किंवा तात्पुरती उपाययोजना (ज्यात असहमती वा लढ्यापासून सत्तांत्तरापर्यंत सर्व काही येईल) यासाठी जनमानस तयार करणं इतपतच मर्यादित भूमिका अपेक्षित नाही, असा आहे.

यासाठीही साहित्यकृतीचा वापर होऊ शकतो. परंतु ते सर्वथैव, एकमात्र प्रयोजन असू शकत नाही.

लेखकाला स्थळकाळनिरपेक्ष असा शोध घ्यायचा असतो. तो एकाच वेळी समकालीन आणि सार्वकालिन असतो तो याच अर्थानं.

म्हणूनच विसाव्या शतकातले मोहन राकेश तिसऱ्या शतकातल्या कालिदासाची गोष्ट सांगतात 'आषाढ का एक दिन'मध्ये ती सांगताना कालच्या, आजच्या आणि उद्याच्याही सर्जनशील कलावंतांच्या सृजनशीलता, भौतिकता आणि नातेसंबंधांबाबतचं अंतर्द्वंद्व रेखाटतात.

मानवी अस्तित्वाची वेगवेगळी रूपं, त्याची क्षणभंगुरता, त्याच्या आदीम प्रेरणा, बदलातून निसर्गचक्रात टिकून राहण्याची धडपड, विजिगिषूता, अंतर्मनातले काळोखे कोपरे, विविध वासना आणि वखवखीच्या पूर्ततेची पराकाष्ठा आणि त्यातून त्याला दिसणारं पुसता न आलेलं पशुत्व... आणि या सगळ्यातूनही एका मांगल्याची, सत्य-शिवाची आस... भविष्याबद्दलच्या अनभिज्ञतेतून येणारं भय... निसर्गाच्या गूढगर्भातली चकित करून टाकणारी रहस्यं, त्यामुळे विस्मयचकित होणं... अज्ञाताच्या प्रदेशाबद्दलचं कुतूहल... आणि या सगळ्या पसाऱ्यामध्ये उभं राहून मूळ मानवी अस्तित्वाचं नेमकं प्रयोजनच काय हा छळणारा प्रश्न... साहित्य या सगळ्या सगळ्याचा धांडोळा घेतं.

मोठा लेखक या सगळ्याला कवेत घेतो. स्थळकाळाची बंधनं त्याला अडवू शकत नाही.

मोहन राकेश मौर्यकाळाच्या किंवा बौद्धकाळाच्या तपशिलात आपले साहित्य बांधतात, तर जॉर्ज ऑरवेल प्राण्यांच्या विश्वातून व्यक्त होतो. ॲनिमल फार्ममध्ये. एकेकाळी समतावादी तत्त्वज्ञानाचे पितळ उघडे पाडणारी कादंबरी म्हणून ती गाजली. आज विविध दिवाळी अंक, वर्तमानपत्रं यातून ऑरवेलनं त्याच्या कादंबऱ्यांतून 'ज्या भयस्वप्नाचं दर्शन घडवलं तेच सध्या आजूबाजूला दिसतं आहे' असे म्हणत, त्याच्या लेखनास फॅसिस्ट विरोधी लेखन ठरवत, ऑरवेलच्याच लाठीचा वापर होताना दिसतो आहे. म्हणजे गंमत बघा, एकच साहित्य वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या बाजूंनी वापरलं जातं. मी ही ऑरवेलची ताकद समजतो आणि मोठं साहित्य हे कुणा एकाच्या अजेंड्याच्या दावणीला बांधलं जाऊ शकत नाही याचं हे उदाहरणही मानतो.

साहित्याचा पैस असा आणि इतका व्यापक असल्यानं समग्र जीवनालाच कवेत घेण्याची क्षमता ते बाळगतं. म्हणूनच साहित्याला एकाच प्रयोजनात बांधून घालण्यापेक्षा त्याच्या विविध शक्यता ताडून बघणं साहित्यिकाचं काम असायला नको का?

एका एकांकिकास्पर्धेला परीक्षक होतो. एका संघानं उत्तम रहस्यप्रधान एकांकिका सादर केली. पण त्यांना पुरस्कार दिला याचं सर्वांना अगदी त्या संघालाही आश्चर्य वाटले. विचारलं तर म्हणाले, 'आमची एकांकिका छान झाली, पण त्यात सामाजिक संदेश नव्हता ना!'

साहित्यबाह्य मोजपट्ट्या मोठ्या साहित्याचे निकष ठरवू लागतात त्या अशा.

म्हणून आज गरज आहे ती आजूबाजूच्या कोलाहलातून आपल्या लेखनाचा पिंड व प्रयोजन शोधण्याची. जसे बहुसांस्कृतिकत्व ही आपल्या संस्कृतीची ओळख आहे तसंच हे प्रयोजनही बहुविध असणार हे मान्य करत गरज आहे त्या प्रत्येकाचा आदर करण्याची मानसिकता आपल्यात निर्माण करण्याची.

जीवन जर एकरेषीय नसतं, तर साहित्य कसं? जीवन बहुद्देशीय असतं तसं त्याकडे पाहण्याची दृष्टीही तितकीच विशाल हवी. पण प्रयोजनाला आखूड करून ठेवलं तर साहित्यही आक्रसत जातं. तशीच आपली स्थिती होत चालली आहे.

म्हणूनच मग अज्ञाताच्या प्रदेशात नेणारी गूढकथा, मेंदूला गुंगारा देणारं रहस्य, विचित्र विश्वाची मांडणी करणारी फँटसी, निखळ (आणि निर्विषही) विनोद, शक्यता ताणणारा फार्स, भावकविता, निसर्गकविता, सांगीतिका, असंगत नाट्य, प्रहसनं, चिंतनशील वैचारिक वाङ्मय आणि त्यासोबत बेस्ट सेलर म्हणवले जाणारे पण नेहमीच हिणवले जाणारेसुद्धा... ही सगळी दालनं आक्रसत लुप्त होत जाताना दिसतात यामागचं कारण काय याचा विचार आपण करतोय का?

या सगळ्यातून लेखक मानवी जीवनातील काही अभिजात पेच मांडण्याचा प्रयत्न करतो. तो चिरंतन प्रश्नांचा शोध घेत असतो आणि त्याद्वारे मानवी मनाची समज वाढताना दिसते. मनुष्याचं स्वत:विषयीचं, एकूणच जगण्याविषयीचं आकलन वाढताना दिसतं. हे आकलन लेखक आणि वाचक दोघांना समग्र भान देतं.

मग असा लेखक त्याला आकळलेल्या आयुष्याचा एक तुकडा म्हणजेच आयुष्य मानत नाही. महानुभाव पंथामधल्या एका कथेत एक हत्ती होता. ज्याला सोंड दिसली त्याला समग्र जीवन हे सोंडेसारखं वाटलं, ज्याला शेपूट दिसली त्याला समग्र जीवन हे झाडूसारखं वाटलं; पण मोठ्या लेखकाकडे जीवनाकडे समग्रपणे पाहण्याची शक्ती निर्माण होते.

त्याचं साहित्य दुःखाकडे बघतं, नीती-अनीतीकडे बघतं आणि मग त्याची दुःखाची व्याख्या व्यापक होऊन जाते. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचं दुःख त्याला दिसतं, ते त्याला जाळतं, अत्यंत जवळचं वाटतं. त्याचबरोबर पोटाची भूक भागलेली आहे, सुबत्ता आहे तरीसुद्धा घरामध्ये एक मतिमंद मूल जन्माला येतं आणि मग मतिमंदात्वाचं दुःख त्याच्याहीकडे तो त्याच समतोल नजरेनं बघण्याचा प्रयत्न करतो. इतकंच काय; पण सुबत्ता आहे, पोटापाण्याचा प्रश्नच नाहीये, आरोग्यही उत्तम आहे, तरीही केवळ आपल्या समाजाच्या रूढ चौकटीत न बसणाऱ्या लैंगिकतेमुळे समाज स्वीकार करत नाही, कुठेतरी बाजूला ठेवलं जातं, अशा प्रकारची कुचंबणा असलेल्या एखाद्या समलैंगिक म्हणजे होमोसेक्शुअल माणसाचं एकाकीपणसुद्धा तितकंच महत्त्वाचं वाटायला लागतं. साहित्यिकाला असं दुःखाचं एक समग्र भान आलं की दुःखाचा असा परीघच वाढतो.

या अर्थानं लेखक म्हणून जगणं एक मोठ्या जबबदारीचा भाग असतो. तपश्चर्येचाच म्हणा ना. म्हणून स्वत:चा पिंड समजून घेत स्वत:च्या साहित्याच्या प्रयोजनाची निश्चिती केली पाहिजे.

आजूबाजूच्या कोलाहलापासून अनभिज्ञ वा उदासीन राहता कामा नये हे योग्यच, तसंच त्या कोलाहलाला शरणही जाता कामा नये. साहित्याबाह्य प्रवाह आज तर अधिक जोमानंच साहित्यिकाकडून विविध अपेक्षा करत आहेत. अगदी उच्चरवानं करत आहेत. ह्या मोजट्टीत बसलो नाही तर असंवेदनशील अगदी भित्रे वगैरेही ठरवले जाण्याची व्यवस्था कार्यरत असली तरीही लेखकानं आपल्या अंत:स्वराला या गोंगाटात हरवू देता कामा नये. गर्दीत राहून एकटेपण जपलं पाहिजे.

माझ्या अलीकडल्या 'इन्शाअल्लाह' कादंबरीमध्ये मी अशाच अभिनिवेशापलीकडच्या, ध्रुवीकरणाला नाकारणाऱ्या अंत:स्वराची कहाणी मांडली आहे. आजूबाजूच्या आग्रही अभिनिवेशी कर्कश वातावरणात ती अल्पसंख्य, अनफिट वाटू शकते.

एकदा लेखाकानं आपलं अस्तित्व एका विवक्षित काळापुरतं नसतंच हे मान्य करून टाकल्यानंतर सभोवातालाशी किंवा त्या मोजपट्टीच्या निकषावर उतरत बसण्याची तमा तरी का बाळगावी?

कारण लेखकाला भवभूतीनं सांगूनच ठेवलं आहे, की काळ अनंत आहे आणि पृथ्वी विपुल आहे... केव्हा ना केव्हा आणि कुठे ना कुठे लेखकाला त्याचा समानधर्मा भेटेलच... तोवर लेखकाचं लेखन तो असताना आणि नसतानाही पायपीट करत राहतं. किंबहुना ते त्या ताकदीचं असावं. नाव, पैसा, पुरस्कार हे थांबे क्षणभर विसाव्यासाठी आवश्यक असतीलही, पण पायपीट हेच लेखकाचं भागधेय असतं.

ही पायपीट सुखकर होत नाहीच, किमान अंगवळणी तरी पडावी इतकाच प्रयास तो करू शकतो.

यानिमित्तानं मनातले विचारतरंग मांडायची संधी मला दिली याबद्दल मी आपणा सर्वांचे आणि बडोदा वाङ्मय परिषदेचे मनापासून आभार मानतो.

(१७ एप्रिल २०२२)

**– अभिराम भडकमकर**
भ्रमणध्वनी : ९९८७०३८१८८

# दोन अध्यक्षीय भाषणे



**नीतिन आरेकर**

**एप्रिल** २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात उदगीर येथे दोन साहित्य संमेलने झाली. ९५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आणि १६ वे विद्रोही साहित्य संमेलन. ह्या दोन्ही साहित्य संमेलनांच्या अध्यक्षीय भाषणांनी विचारवंतांच्या, साहित्यिकांच्या, रसिकांच्या मनात अनेक प्रश्नवलये निर्माण केली, त्या प्रश्नांची काही उत्तरेही दिली. त्याचा शोध घेण्याचा हा प्रयत्न आहे.

ह्या दोन्ही साहित्य संमेलनांची उद्दिष्टे सर्वज्ञात आहेत, त्यांचा ऊहापोह करणे हा या लेखाचा हेतू नाही, तर परस्परांपेक्षा एकशे ऐंशी अंशातून वेगळी प्रयोजने असलेल्या ह्या दोन साहित्य संमेलनांच्या अध्यक्षीय भाषणांमधून एकाच प्रकारचा सूर बाहेर पडताना दिसतोय व ही गोष्ट मराठी साहित्याकरिता किती उपकारक वा अपकारक आहे ह्याचाही येथे शोध घ्यायचा आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे आणि विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष गणेश विसपुते ह्यांची भाषणे विस्तृत आहेत. सासणे ह्यांचे भाषण सुमारे ७२०० शब्दांचे तर विसपुते ह्यांचे भाषण सुमारे ८२०० शब्दांचे आहे. दोघेही प्रारंभी उद्‌गीर, मराठवाडा या प्रदेशांचे ऐतिहासिक, सांस्कृतिक, राजकीय, साहित्यिक महत्त्व अधोरेखित करतात. हे करताना दोघांनीही आपली नाळ ह्या मातीशी जुळली आहे असे सांगितले आहे. विसपुते यांनी सासणे यांच्यापेक्षा एक मुद्दा वेगळा मांडला आहे, तो म्हणजे मराठवाड्याची नाळ बंडखोरीशी जुळली आहे हा! भाषिक बंडखोरी, वैचारिक बंडखोरी, सांस्कृतिक बंडखोरी करण्यात मराठवाड्यातील कवींनी, संतांनी अग्रक्रमाने भाग घेतला आहे. विद्रोही साहित्य संमेलनाच्या हेतूंशी ते नाते सांगतात. हे दोघेही संमेलन ज्या ठिकाणी भरले आहे, त्या गावाचा इतिहास आणि आत्मचरित्र यांत ते अडकून पडलेले नाहीत तर त्याऐवजी साहित्यविषयक मंथन, ते ज्या कथालेखनासाठी ओळखले जातात त्यातील वेगवेळे प्रवाह आणि वर्तमानातील साहित्यिक-सामाजिक आव्हाने यांचा ऊहापोह करण्यावरच त्यांनी भर दिला आहे.

दोघेही आपल्या भाषणांच्या प्रारंभीच सध्या कठीण काळ आहे, याचे सूचन करतात. सासणे ह्यांनी अ.भा.म.सा.सं.च्या पटावर अनेक वर्षांनी सर्वांना आरसा दाखवला- 'आपण यंत्रयुग अनुभवलं. त्यानंतर तंत्रयुग अनुभवलं. अणूयुग आणि अवकाशयुग अनुभवलं. आणि आता आपण भ्रमयुगात प्रवेश केला आहे. या युगात सर्वसामान्य माणूस भ्रमित झालेला आहे, संमोहित झालेला आहे. मुख्य म्हणजे त्याची वाचा हरवलेली आहे. एक अबोध दहशत, भीती आणि आतंक त्याच्या जगण्याला वेढून, व्यापून राहिलेला आहे.' विसपुते ह्यांनीही तेच मत प्रदर्शन केले आहे- भारतीय लोकशाहीच्या इतिहासात आजच्या काळाइतका हिंसेचा, द्वेषाचा, क्रौर्याचा, दहशतीचा आणि दमनाचा दुसरा काळ नाही. गेल्या काही वर्षांमध्ये माणसांच्या मरणांच्या इतक्या बातम्या नियमितपणे ऐकतोय आता त्या अक्षरांपलीकडचं क्रौर्य समजायची संवेदनाच बधिर होऊन जाईल काय असं वाटतं.

त्यानंतर सासणे ह्यांनी अ.भा.म.सा.सं.च्या मळलेल्या रस्त्यावरून प्रवास करत ठरावीक मुद्दे मांडले आहेत. लेखक का लिहितो? त्याच्या लेखनाचे प्रयोजन कोणते? त्याच्या वाङ्मयीन निष्ठा कोणत्या असायला हव्यात? त्यातून कोणत्या प्रकारच्या मूल्यांची जोपासना व्हायला हवी? लेखनातील वास्तव म्हणजे काय? लेखक कसा घडत जातो? त्याची वाङ्मयीन साधना कशी असते? त्याची बांधिलकीची कल्पना कशी असायला हवी? लेखकाचे चिंतन आणि त्याच्यासमोरच्या चिंता कोणत्या? हे प्रश्न चर्चेला घेऊन नंतर ते स्वत:च्या लेखनप्रवासाबद्दल बोलतात. त्यांनी अनेक लेखनप्रकार हाताळले असले तरी त्यांची नाळ लघुकथेशी घट्ट जुळलेली आहे. डॉ. भालचंद्र नेमाड्यांनी लघुकथेवर क्षुद्र लेखनप्रकार असे संबोधून त्यावर हल्ला चढवला होता. नेमाडे यांचे नाव न घेता सासणे त्यांच्या मताचा समाचार घेतात व जागतिकीकरणानंतर मराठी कथेने सशक्त निर्मिती केली आहे असे साधार प्रतिपादन करतात, की 'जागतिकीकरणाची चाहूल लागल्यानंतर, उत्तराधुनिक कालखंडातील मराठी कथेने हळूहळू आपला चेहरा व स्वभाव बदलायला सुरुवात केली आहे. माहिती

व तंत्रज्ञानाच्या अफाट अशा मायाजालातून मानवी मनाचा शोध अधिकाधिक प्रभावीपणे घेतला जाऊ शकतो हे माहीत झाल्यानंतर पूर्वीची मनोविश्लेषणात्मक कथा जास्त गडद झाली हे खरे असले तरी उत्तराधुनिक कालखंडातील कथा विश्वमनाचा शोध घेऊ लागल्यामुळे पुन्हा एकदा व्यक्तिजीवनाकडून समाजजीवनाकडे अशी प्रवास करू लागली. तिच्यामध्ये समूहमनाचे हुंकार, समूहमनाच्या वेदना उमटताना दिसत असल्यामुळे एकूणच कथा सामाजिक जीवनापासून प्रारंभ करून व्यक्तिजीवनाकडे आली आणि पुन्हा व्यक्तिजीवनापासून समूहजीवनाकडे जास्त ताकदीने वाटचाल करू लागली आहे, असे दिसते.' वास्तव आणि साहित्य यांची जी फारकत गेली काही वर्षे मराठीत झाली होती त्या पार्श्वभूमीवर सासणे हे हा सांधा पुन्हा जोडू पाहतात

विसपुते आजचा स्मृतिभ्रंशाचा काळ आणि आपण, प्रतिमांचा पूर आणि बधिरीकरण, अन्यत्व, असहमती, सहिष्णुता, कल्याणकारी राज्याचा होत असलेला ध्वंस, राष्ट्रवादाच्या कल्पनेकडे नव्याने पाहण्याची गरज, तुम्ही निगराणीखाली आहात (Big Brother is watching at you-1984-जॉर्ज ऑरवेल) ह्या वाक्याला आजच्या काळात लाभलेला भयानक अर्थ, अविवेकाचा प्रादुर्भाव, मानवी सभ्यतेवर ओढवलेले अरिष्ट, क्रूर बनलेला समकाळ, अशा अनेक प्रश्नांची मांडणी करतात. भाषणाच्या प्रारंभीच ते सांगतात– 'आजचा काळ पाहता मूलभूत मानवी मूल्यं, लोकशाहीची पायाभूत तत्त्वं आणि कल्याणकारी राज्याची कल्पना यांनी निगुतीनं विणलेल्या वस्त्राची वीण केवळ उसवलेलीच नाही तर त्याच्या चिंध्या-धांदोट्या होताना आपण पाहत आहोत. भारतीय लोकशाहीच्या इतिहासात आजच्या काळाइतका हिंसेचा, द्वेषाचा, क्रौर्याचा, दहशतीचा आणि दमनाचा दुसरा काळ नाही. आपण स्मृतिभ्रंशाच्या काळात जगत आहोत. लोकशाहीची पायाभूत मूल्यं आणि संविधानातले निर्देश दिवसाढवळ्या पायदळी तुडवले जाताहेत. दडपशाही आणि सेन्सॉरशिपचं भय इतकं वाढवलं गेलं आहे की सार्वजनिक शैक्षणिक संस्थांमधील अधिकारीवर्ग स्वतःहूनच रांगायला तयार झाला आहे.' हे मत मांडत असतानाच विसपुते यांनी एक भयानक निरिक्षण दिले आहे व समंजस विचारवंतांना जागृत केले आहे– वेगवान तंत्रज्ञानानं मानवी मेंदूचा कब्जा घेतल्यावर करुणा, शील, प्रज्ञा, मैत्र यांचं महत्त्वच लक्षात येईनासं होतं. कोणालाही खतम करून टाकण्याचे डिजिटल खेळ खेळणं हेच व्यसन लागलेले सत्ताधारी आणि तोच खेळ आपापल्या सेलफोनवर खेळणारे आबालवृद्ध असा सारीपाट जगभर सज्ज आहे.' त्यांचं पुढील निरीक्षण अधिक महत्त्वाचं आहे– 'प्रतिमांचं नवंच युग आहे. सगळीकडे प्रतिमांचे आरसे तुम्हाला टिपायलाही टपलेले आहेत. आरोग्यासाठीचं ॲप, स्विगीसाठीचं, झोमॅटोसाठीचं, अमुकसाठीचं ॲप, तमुकसाठीचं ॲप तुमचं क्रेडिट कार्ड, तुमचा फोन या सगळ्यांतून एक अदृश्य डोळा पाहातोय तुमच्या इतिहास-वर्तमानाचा, तुमच्या जन्म-मरणाचा एक्स रे विनासायास सामाजिक माध्यमांतलं व्यक्त होण्याचं स्वातंत्र्य वगैरे ऐकून सत्ताविसाव्या मजल्यावर राहाणारा गब्दूल माणूस हसतो आणि ती माध्यमं विकत घेतल्याचा कागद लॉकरमध्ये ठेऊन देतो.'

सासणे यांनी आपल्या भाषणाच्या उत्तरार्धात पारंपरिक मांडणी बाजूला ठेवून अत्यंत स्पष्टपणे प्रचलित राजव्यवस्थेवर आणि समाजव्यवस्थेवर कोरडे ओढले आहेत– 'आपण आत्यंतिक अशा भ्रमयुगामध्ये आता प्रवेश केला आहे. आपण छद्मबुद्धी विध्वंसकांच्या ताब्यामध्ये जातो आहोत असे संकेत मिळायला लागले आहेत. चिंतनशील लेखकाला अशावेळेस चिंता वाटत असते, वाटली पाहिजे. हे विध्वंसक, आपल्या पुढील पिढीच्या मुलांच्या हातामध्ये कोणता भिकेचा कटोरा देणार आहेत, याचा फक्त अंदाजच करता येतो. पण नांदी तर झालेलीच आहे. आपण थाळी वाजवली आणि ती वाजवताना लेखक, विचारवंत आणि विचारी माणूस चिंतेत पडला होता. थाळी वाजवण्याचे भीषण संदर्भ खरं तर राज्यकर्त्यांनासुद्धा माहीत नाहीत. नोंद अशी मिळते की दुर्गादेवीच्या दुष्काळामध्ये बारा वर्षं पाऊस पडला नव्हता आणि समाज भुकेकंगाल होऊन त्राहिमाम म्हणत सैरावैरा झाला होता. भुकेकंगालांच्या जरत्कारू टोळ्या अन्नाच्या शोधात बाहेर पडून थाळ्या वाजवत गल्लोगल्ली फिरत होत्या आणि समोरून येणाऱ्या माणसांवर तुटून पडत होत्या. अन्नासाठी चाललेली ही भीषण झटापट अशी थाळीनादाशी जोडली गेलेली आहे.' सासणे जेव्हा हा संदर्भ देतात, तेव्हा विचार करू शकणारा वाचक खडबडून जागा होतो. सत्याचा आग्रह, सत्याचा उच्चार ही तर काळाची गरज आहेच आणि सत्य निर्भयपणे सांगितलं पाहिजे हीदेखील काळाची गरज आहे एक देश, एक भाषा, एक पुस्तक, एक संस्कृती असे काहीसे कोणीतरी म्हणते आहे. लेखकाला यात 'मेथड इन मॅडनेस'चा वास येतो आहे. पण हा केवळ मॅडनेस नाही तर विचारपूर्वक केलेलं चिथावणीखोर विधानदेखील आहे.

विसपुते यांनी प्रारंभापासून प्रस्थापित व्यवस्थेवर आपला हल्ला चढवला आहे. त्यांनी अन्यत्वाचा मुद्दा साहित्यचर्चेत प्रथमतः आणला आहे. आपण इतका चिरफाळलेला, इतका असहिष्णू झालेला समाज नव्हतो. भारतात पहिल्या शतकातच ख्रिश्चन धर्म पोहचला होता. त्यानंतर जगातल्या बहुतेक धर्मांचे लोक अनेक शतकं इथे राहात आलेले आहेत. इतकं वैविध्य इतरत्र कुठेही सापडत नाही. यातले बरेचसे लोक शतकानुशतकं इथंच राहून इथल्या हवा-पाणी-मातीशी जोडले गेले. त्यांनीही भारत नावाच्या कल्पनेला प्रत्यक्षात मूर्त करण्यात मदत केली. या सगळ्यांसह आपली जी संस्कृती तयार झाली तिची समृद्धी अभिमान वाटावा अशीच आहे. परंतु गेल्या काही वर्षांत मोठ्या योजनेंतर्गत अशा अनेक अल्पसंख्य समूहांना ठरवून अन्यत्वाची (प्रस्थापित स्वपासून अदरिंगची) वागणूक देण्याचे प्रयत्न होत आहेत. फाशिस्ट राज्यात ज्याप्रमाणे आर्य आणि ज्यू अशी विभागणी करून ज्यूंचं शिरकाण झालं होतं, तीच मानसिकता इथं स्पष्टपणे दिसते. जगभर सध्या हे असे प्रखर राष्ट्रवादाचं आणि अमानूष विस्तारवादाच्या लालसेचं फलित दिसत आहे. राष्ट्रवाद त्याचं टोकाचं जहाल रूप दाखवतो,

तेव्हा त्याचे परिणाम अत्यंत हिंसक आणि धोकादायक असतात. त्यातील अमानुष शोषणाच्या खात्रीमुळे तो अनेक विचारवंतांनी नाकारला आहे. रवींद्रनाथ टागोरांनी त्यातले धोके ओळखले होते. स्वातंत्र्य मिळण्याअगोदर पंचवीस वर्षं आधीच, १९२१साली टागोरांनी मित्राला लिहिलेल्या पत्रात 'भारताची कल्पना' किंवा 'आयडिया ऑफ इंडिया असा शब्दप्रयोग केला होता. आपल्याच लोकांपासून वेगळेपणाची जाणीव ही संघर्षाला निमंत्रण देणारी असते, त्या भावनेला भारताच्या कल्पनेत थारा नाही. वैविध्य असेल म्हणूनच त्यात सौंदर्य आहे. ते जिवंत आणि सळसळतं आहे, असं टागोर म्हणाले होते. म्हणूनच त्यांनी राष्ट्रवादावर प्रखर हल्ले करणारी ती तीन प्रसिद्ध व्याख्यानं दिली होती. त्यात त्यांनी युरोपीय, जपानी राष्ट्रवादाची प्रारूपं आमच्यासाठी उपयोगाची नाहीत आणि भारताच्या संदर्भात लिहितांनाही ते म्हणतात की आपल्याला आपल्या कल्पनेतल्या भारताची प्राप्ती करायची असेल तर आपल्याला मानवतेच्या मूल्यांपेक्षाही राष्ट्र मोठं असतं त्या शिकवणुकीविरुद्ध लढावं लागेल. विसपुते यांनी गुरुदेव टागोर यांचा जो दाखला दिला आहे तो आपल्या सर्वांना अंतर्मुख करणारा आहे. काही वर्षांपूर्वी डॉ. गणेश देवी यांनीही आपल्या एका लेखात ह्याविषयी चर्चा केली आहे.

भारत सासणे व गणेश विसपुते हे दोघेही भारतीय समाजमनाच्या सहिष्णुतेबद्दल, त्याच्या वैविध्याबद्दल, आजवर टिकून राहण्याच्या क्षमतेबद्दल बोलतात आणि तिच्यावर होत असलेल्या हल्ल्यांबद्दल चिंता व्यक्त करतात. या मुद्याकडे पाहण्याचे दोघांचे दृष्टिकोन वेगळे आहेत. सासणे यांची मांडणी उदारमतवादी, समाजवादी आहे तर विसपुतेंची मांडणी साम्यवादी आहे. त्यामुळे दोघांनी एकच मुद्दा मांडण्यासाठी निवडलेला शब्दसंच वेगळा आहे. सासणे हे सौम्य पद्धतीने बोलतात; विसपुते आक्रमक मांडणी करतात. सासणे ह्यांच्या समस्यामांडणीनंतर त्या समस्यांची उकल करणारी उत्तरे फारशी येत नाहीत, ते निरिक्षणे देतात; विसपुते यांची साम्यवादी मांडणी समस्यांची उत्तरेही देते. मौजेची गोष्ट म्हणजे ही उत्तरे त्यांना जोतिबांच्या विचारांत सापडतात– फुलेंनी एकूण सामाजिक व्यवस्थेचा समग्रतेनं विचार केला होता. भांडवलशाही आणि धर्मव्यवस्था या किती शोषणव्यवस्थांना जन्म देतात हे नेमकं ओळखलं होतं. जोतिबांनी समतेचा विचार मांडताना सर्व वर्गांतल्या स्त्रीलासुद्धा विचारात घेतलं होतं. विषमतेला नकार देतांना जोतिबा स्त्री–पुरुष सर्वांचा एक घटक म्हणून विचार करतात. ते समाजाचा एक भाग म्हणून विचार करण्याअगोदर एका व्यक्तीला समतेची संधी मिळायला हवी असा आग्रह धरतात जोतिबांनी आपला वैकल्पिक संस्कृती उभारणीचा प्रकल्प मांडला त्या आधुनिक विचारात परंपरेतील सत्त्वशील तत्त्वं आणि नवतेचा स्वीकार केलेला दिसतो. त्यांच्या या अब्राह्मणी आधुनिकतेचा विचार म्हणूनच आजच्या काळातही तितकाच प्रस्तुत आणि सार्थ आहे. जमातवाद हा जातीय आणि धार्मिक अस्मितेला खतपाणी घालून आपला मतलब साधतो हे त्यांनी जाणलेलं होतं. त्यामुळे आजच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाला तोंड देण्यासाठी त्यांनी जे नेमकं सर्वसमावेशक पर्यायी ठोस प्रारूप उपलब्ध करून दिलेलं आहे त्यावरूनच आपल्याला आपल्या संघर्षाची दिशा ठरवावी लागणार आहे. फक्त त्याच्यासाठी परस्परांतील कलह, जाती–जातीच्या टोकदार अस्मिता, फालतू अहंगंड विसरून, वेगवेगळ्या दिशेला झालेली तोंडं सामोरी करून खुलेपणा स्वीकारला पाहिजे. दोन्ही संमेलनाध्यक्ष ही सर्व जबाबदारी लेखकांची आहे, असे अत्यंत स्पष्टपणे सांगतात.

ही दोन्ही भाषणे आजच्या समाजाला अंतर्मुख होऊन विचार करायला भाग पाडणारी आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आणि विद्रोही साहित्य संमेलनांच्या दिशा, आता दोन बाजूला जाणाऱ्या नसून त्या एकाच दिशेने वाहणाऱ्या समांतर दिशा बनत आहेत, असे ही भाषणे अधोरेखित करतात.

**– डॉ. नीतिन दत्तात्रेय आरेकर**
मराठी विभागप्रमुख,
श्रीमती चांदीबाई हिंमथमल मनसुखानी महाविद्यालय,
उल्हासनगर
nitinarekar@gmail.com

ग्रंथाली




# पुस्तकाच्या चित्रवाटा

## शिरीष घाटे


जवळजवळ शंभर निवडक मुखपृष्ठे हा एक विचारी आणि संवेदनशील कलाकाराच्या कामाचा दस्तावेज आहे.

**मूल्य ७५० रु. सवलतीत ४५० रु.**

# रिक्त विरक्त

## छाया कोरेगांवकर

छाया कोरेगांवकर यांची ही पहिलीच कादंबरी जीवनाच्या विविध स्तरांवर झुंजणाऱ्या; एका वरकरणी सामान्य पण अंतर्यामी झुंझार स्त्रीची काळजाला भिडणारी दमदार कथा सांगते.




**मूल्य ४०० रु. सवलतीत २५० रु.**



# 'स्वीकार' आणि अस्वीकार

**अरुणा ढेरे**

**रजनी,**

पत्राची सुरुवात नेहमीच्या सवयीनं बहुधा सगळे 'प्रिय' या संबोधनानं करतात. पण, तसला निव्वळ उपचार तुला आवडणार नाही, म्हणून नुसत्या तुझ्या नावानं संवाद करते आहे. मनात आणि प्रत्यक्षही मी कायम तुला एकेरीच संबोधत आले. वयानं तू माझ्यापेक्षा पुष्कळ मोठी होतीस तरीही, आणि तू मला भेट दिलेल्या पहिल्या तिन्ही संग्रहांवर तू मला आदरार्थी संबोधलं होतंस तरीही.



रजनी परुळेकर

तुझा कृष्णधवल असा एकच फोटो एकाच पुस्तकात आहे.पण मला तीसएक वर्षांपूर्वीचं तुझं रूप आठवतं. कपाळावर भलंमोठं कुंकू, नाकात मोठीशी चमकी, कानांत मोठाल्या कुड्या, गळ्यात पांढऱ्या मण्यांची माळ आणि चष्म्याच्या जाड, मोठ्या फ्रेममधून दिसणारे काजळ घातलेले मोठेच डोळे. ते ठसठोंबस रूप तर लक्षात राहिलंच, त्याहीपेक्षा लक्षात राहिली ती तुझी थेट, स्पष्ट आणि साधी उत्कटता.

आपण कऱ्हाडला भेटलो होतो. बरोबर तुझी आई होती आणि आईला घेऊन चाफळला जाण्याची तुझी इच्छा होती. तू मला विचारलंस आणि आपण बरोबर गेलो. पुष्कळशी विचारी माणसं ज्याला कर्मकांड म्हणतील अशा गोष्टी आईसारखी तूही भक्तिभावानं करत होतीस. मग पुढे संतोष शेणई या धाकट्या मित्रानं तू करत असलेली दर गुरुवारची दत्ताची पूजा आणि देत असलेला प्रसादाचा खरवस यांच्याबद्दल सांगितलं, तेव्हा नवल नाही वाटलं. नवल वाटलं ते याचं, की तुझ्या कवितेला या तुझ्या कर्मकांडात्मक श्रद्धेचा जरासुद्धा स्पर्श नाही. अगदी पुसटही नाही.

काय जबरदस्त प्रतिमांची भाषा बोलते तुझी कविता! एकाकीपणातल्या यातनांचा कैफ चढलेली कविता! एक भिववणारी स्पष्टता आहे तिच्यात. वाचणाऱ्याच्या जाणिवेला काच बसेल इतका घट्ट विळखा घालणारी स्पष्टता! स्वत:चं मन निर्वस्त्र करत आयुष्याला सोलत जायचं ठरवलं होतंस जणू तू! किती खासगी, किती वैयक्तिक अनुभव तुझे, पण तू त्यांना एक अनाकलनीय पाशवी शक्ती दिली होतीस. अशी, की कधी कधी माणसांच्या खोल तळाशी असणाऱ्या तशाच पशुत्वाला हिसडा देऊ शकेल ती. वाचणाऱ्याचे डोळे पेटेपर्यंत एका दमात, एका धुंदीत पोखरणाऱ्या ओळी... भिरभिरती क्रियापदं... भरधाव विशेषणं, पावसाच्या धारा तावदानाला झोडपतात तसं सांगणं... हे मी तुझेच शब्द उचलून तुझ्या कवितेला लावते आहे.


तुला नको होते 'सुखस्वप्नांच्या कंबरेत लाथा हाणणारे शिष्टाचार आणि उच्छ्वासांबरोबर ओझी टाकायला लावणारी गळेपडू कर्तव्यं'. म्हणून बहुधा तू सार्वजनिक व्यासपीठांपासून तशी दूर दूर राहिलीस आणि अगदी मोजक्या माणसांशी मोजका संवाद करत गेलीस. अर्थात तो संवादही सरळ, नितळ नव्हता आणि त्याला कारण अधिक करून होतीस तू स्वत:च. जन्मत:च अतिसंवेदनशील मन तुला मिळालं होतं. तुझा जन्म कोकणातला. रत्नागिरीचा. पण तेवढं सोडलं तर तुझं अख्खं आयुष्य मुंबईला गिरगावातल्या एका चाळीत गेलं. घरात उत्तम पुस्तकांची पारख असणारे वडील होते खरे, पण कवितेचं खूळ कुणालाच नव्हतं. तू मात्र झपाटलीस कवितेनं.आणि मग नंतर तुझं झपाटलेपण कवितेनं उचललं. तूच झपाटलंस तुझ्या कवितेला. काय ते विलक्षण झपाटलंपण! कधी कधी भोवळ आणणाऱ्या त्या झपाट्यातून जराशी शुद्धीवर यायचीस तू. मग स्वत:मधलं ते अ-मानुष रसायन शोधत जायचीस, जे झाकल्यावर तुझ्या मानुष जगातून तुझी सुटका होईल, असं तुला वाटायचं.

खरं तर आर्थिक झगडे अनेकांच्या वाट्याला आले. अनेक संवेदनशील कवी-कलावंत त्यात भरडून निघाले. तशी मुंबईच्या बुऱ्हाणी महाविद्यालयात अनेक वर्षं तू प्राध्यापकी केलीस. आर्थिक विवंचना पुष्कळ कमी करणारी होती तुझी नोकरी, पण शिवाय घरातलं कोणीही तुझ्या कविता वाचत नव्हतं. त्यामुळे तू त्यांत

कसले अनुभव भरते आहेस हे कळणं, कळल्यावर दुखावणं, रागावणं, तुझ्यावर दृश्यादृश्य बंधनं घालणं यांतलं काहीही घडण्याची शक्यता नव्हती आणि घडलंही नाही.

तू लिहीत गेलीस तुझ्याच कैफात. तुझा भवताल, तुझ्या मैत्रिणी, तुझ्या आवाक्यात आलेलं जग यांविषयी. तुला दिसलेल्या, भेटलेल्या, समजलेल्या आणि हव्याशा वाटलेल्या पुरुषांविषयी. फक्त सत्तर दिवस टिकलेल्या तुझ्या लग्नाविषयी, तुझ्या घटस्फोटाची केस लढणाऱ्या तुझ्या वकिलाविषयी, तुझ्या बाळपणातून, तुझ्या कुमारवयातून तुला फिरवून आणणाऱ्या एखाद्या विद्यार्थिनीविषयी आणि तू लिहीत गेलीस उडालेल्या झोपेविषयी, भयाण, एकाकी अंधाराविषयी, शरीरात वेळीअवेळी उसळून उठणाऱ्या वासनेविषयी! स्वत:वर चाबकाचे फटकारे ओढणारं तुझं लिहिणं!

जन्मत:च प्रत्येकाच्या वाट्याला येते
त्याच्या पायाखालची जमीन
तशी माझ्याही वाट्याला आली
ही डोंगरावरची जमीन
आता आयुष्याच्या उतरणीवर
असंख्य विषवृक्ष बहरून आले यात
जमिनीवर सर्वत्र
आणि त्यांची बीजं
मीच पेरली होती कळत-नकळत
हे खरं वाटत नाहीय माझं मलाच





'मनाला खोलवर शरम वाटावी असे शब्द आणि अशा कृती' करत जायचीस तू बेभान ओढीनं आणि वाटेत 'मटारच्या शेंगांसारखी भेटलेली माणसं' सोलून पाहायचीस. बहुधा आत दिसायचे 'हिरव्यागार पुष्ट किडीनं पोखरलेले दाणे'. मग तीव्र घृणेनं भरून जायचीस.

तुझा 'स्वीकार' संग्रह नावापासूनच मला फार भावलेला संग्रह. तारेवर बसलेल्या चिमण्यांनी तारेच्या उग्र, पीळदार गाठी सहज टाळलेल्या आणि तारेलाही चिमण्यांचं ओझं वाटत नसलेलं - हे संवादाचं चित्र त्या काळात तू पाहिलं होतंस. आपण जणू सळसळणारं हिरवंगार झाड झालो आहोत आणि पाखरांसारखे कवितेचे शब्द तुझ्या अंगाखांद्याशी किलबिलताहेत असं जाणवत होतं तेव्हा तुला. पुढ्यात ठाकलेली वाट आणि वाटेवरचं सारं काही स्वीकारावं जसं आहे तसं, अशी तयारीही होती तेव्हा तुझी. परंतु त्याच काळात हळूहळू एक निरर्थकाची मुळीही तुझ्या मनात रुजू लागलेली होती.

तुझ्याजवळ पुष्कळ काही कोवळं होतं ग! 'गंधर्वनगरीतल्या प्रेममय आठवणींची फुलं' होती तुझ्या ओंजळीत. 'बटमोगरीसारखे टपोरे क्षण' होते, पण नाही त्यांच्या नाजूक कोवळेपणानं, रंगगंधानं सुख दिलं तुला. नाही शांत केलं. उलट आपल्या कवितांना बजावत राहिलीस तू की, 'रानवेलींप्रमाणे लपलेल्या साऱ्यांचा शोध घ्या, वयात आलेल्या कुमारिकांसारख्या वाढत जा, पण वाटेत वृक्ष भेटतील, त्यांना कवटाळू नका!'

तुझ्या कवितांमधला पुरुषाविषयीचा आणि जगाविषयीचाही कडवट विचार हे एक वास्तव होतं, आहे, कबूल, पण त्यापलीकडच्या सुखदु:खमय जगाचा विस्तारलेला अनुभव तू घेऊ शकली नाहीस तुझ्यात सामावून. समजूत मोठी करत जाण्याचं भान उरलं नाही तुला, तुझ्या कवितेला.




लौकिक जगानं तुला पूर्णपणे ठोकरलं आणि उपेक्षेच्या गर्तेत लोटलं, असं म्हणणं चूक आहे खरं म्हणजे. तू लिहीत गेलीस तो काळ स्त्रियांचा आवाज मोकळा होण्याचा आणि त्यांच्या सगळ्याच कृती-उक्ती समजून घ्यायला हव्यात अशा आग्रहाचा स्वीकार करण्याचा होता. १९८५ ते १९९९ या काळात आलेले तुझे पाचच कवितासंग्रह स्त्रीवादाच्या लाटेनं उंच उचलले. राज्यशासनासह कवी कुसुमाग्रज आणि ना.धों. महानोर यांच्या नावाचे पुरस्कारही तुला मिळाले. तुझ्या निवडक कविता जाणत्या प्रकाशक-संपादकांनी आवर्जून प्रसिद्ध केल्या. 'इन देअर ओन व्हॉइस'सारख्या स्त्रीलिखित राष्ट्रीय कवितासंग्रहात काही समाविष्ट झाल्या. देशपातळीवर लेखिकांना संघटित करणाऱ्या 'अस्मिता'सारख्या संस्थेसाठी गौरी साळवीनं तुझी दीर्घ, मोकळी मुलाखत घेतली. पण, तुलाच यातल्या कशानं सुख दिलं नाही. तुझ्या हट्टी, अतिमनस्वी मनानं यातलं काही तुझ्या कवितेच्या अंगी लागू दिलं नाही.

अगदी अलीकडे सहा-सात वर्षांपूर्वी निवडक मराठी कवयित्रींच्या कवितांचा एक खंड सिद्ध करत असताना मी तुझ्याशी बोलले. मधल्या वीसएक वर्षांत अगदी तुरळक संपर्क होता आपला, संवादासाठी अवघड होत होतीस तू. मग कधी काळसेकरांशी, तर कधी गुरुनाथ सामंतांशी बोलून तुझी खबर घेणं एवढंच घडत होतं. मी या वेळी चिकाटीनं प्रयत्न केला. तुझ्या कवितांविषयी तूच लिहावंस थोडं, अशी कल्पना होती. पण तू चिकाटीनं नकारच देत राहिलीस. 'तुझं प्रेम आहे ना, तर तूच लिही माझ्या कवितेतर. मी नाही लिहिणार,' असं परत सांगत राहिलीस. शेवटी तुझ्या जुन्या

मुलाखतीच्या आधारे मी जे लिहून काढलं, ते तू वाचलंदेखील नसावंस. 'छाप' म्हणालीस, एवढंच.

नाना दुखण्यांनी तुला ग्रासलं होतं. किडनीचे विकार, ब्लडप्रेशर, मधुमेह, मणक्याचा त्रास – सगळी शारीर दुखणी, आणि ज्याच्या बळावर त्या दुखण्यांशी लढा द्यायचा, ते मन असाध्य निराशेनं ग्रासलेलं. किंबहुना शारीर दुखण्यांचंही तेच मूळ असणार.

तुला संवादाची तहान होती, पण सहज संवाद करणं आणि जग आहे तसं स्वीकारणं तुला जमत नव्हतं. तुझी अतिरिक्त संवेदनशीलता सतत त्या संवादाला तोडत-फोडत-ओरबाडत जात होती आणि उलट फिरून तुलाच क्रूर पंजांनी घायाळ करत होती. म्हणून वाङ्मयविश्वात निरभ्रपणे वावरणं तुला शक्य झालं नाही आणि वैयक्तिक आयुष्यात स्नेहाच्या माणसांशीही निरभ्रपणे हात मिळवून जगता आलं नाही. त्या ओढाताणीत फाटून निघालीस तू आणि तुझी कविताही. एरवी इतकी विलक्षण प्रतिमासृष्टी निर्माण करणारी, मानवी संबंधांच्या तळापर्यंत पोहोचण्याची क्षमता असणारी आणि इतरांप्रमाणेच स्वत:लाही निर्ममपणे सोलून काढण्याचं धाडस असणारी तुझी प्रातिभ शक्ती सर्वसाधारणांपेक्षा कितीतरी निराळी होती.

तिच्यात नव्हती ती फक्त सकारात्मक ऊर्जा. जीवनरसाचं पोषण करणाऱ्या जाणिवांचे स्रोत तिच्यात नव्हते. माणसांचा मर्मभेद प्रखरपणे करू शकणारे शब्द आणि त्यांनी स्फुरत ठेवलेल्या असाधारण प्रतिमा ही तुझ्या कवितेची ताकद होती. तशी प्रतिमासृष्टी आधी कोणीही निर्माण केली नाही. भारतीय पातळीवरच्या तुझ्या समकालीन स्त्रीलिखित कवितेतही तुला त्या बाबतीत तुल्यबळ कोणी दिसलं नाही. पण, अखेर तुझी कविता ही वैराण करणारी कविता आहे. कोवळ्या मृदू भावनेचं अस्तर फाडून भळभळा वाहणाऱ्या अंधाऱ्या एकाकी भयाणाची कविता आहे. तिला उंच उठताच येत नाही. आभाळाकडे पसरले आहेत तिचे हात, पण पाय अतिसंवेदनशीलतेनं आयुष्याला दिलेल्या नकारात गाडले गेले आहेत.


तू गेलीस : सत्त्याहत्तर वर्षं रसरसून न पेटता, नुसता काळा धूर पसरत राहिलेले तुझ्या तगमगीचे निखारे अखेर विझले. संज्ञेचा हात झिडकारून भवतालाची जाणीव मिटवत गेलेला तुझा तान्हेला जीव भौतिकाच्या पार कुठे विसावला आहे कुणास ठाऊक. तुझी कविता तेवढी मागे आहे आणि तुझ्यासारखीच तीही फार तान्हेली आहे.

इतकंच.

**– अरुणा ढेरे**
aruna.dhere@gmail.com

ग्रंथाली

# युक्तीच्या गोष्टी सांगणाऱ्याची गोष्ट




शब्दांकन : **शिल्पा शिवलकर**

जयंत देव. इंडस्ट्रियल इंजिनीयर व सल्लागार. अनेक उद्योगांना त्यांनी युक्तीच्या चार गोष्टी सांगितल्या. उद्योजक, राजकारणी, अभ्यासक, विद्यार्थी... नव्हे... प्रत्येक मराठी माणसानं वाचावी अशी ही कहाणी आहे.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# पितळी नोंदवही

## आठवणी दाटतात




अनुवाद : **अलका गरुड**

अलका गरुड यांनी हा कॅनव्हास आणि ते जीवनचित्र यावरचे रंग तितकेच जिवंत ठेवले आहेत. मराठी स्त्रीजीवनात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना देवकी जैन यांचे पुस्तक आणि अलका गरुड यांचे भाषांतर अतिशय प्रबोधनकारी ठरणार आहे.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# प्रिय दिनू...

**शिवराम भोंडेकर**

**आता** तुला काहीच ऐकू येणार नाही
नद्या अन् समुद्राचे प्रवाहही कळणार नाहीत.
आता तरी शांत होशील का?
......

पहिला फोन आला
रमेश उमाळकर, संपादक 'सत्यनिष्ठ' याचा.
शिवराम. शांतपणे ऐक. शांत हो. दिनू गेला.
मी नसलेल्या देवाला पहिली शिवी दिली
अन् दुसरी थेट तुलाच दिन्या.
सुन्न झालो, मेंदूच बधिर झाला.कोसळलोच.

...टाहो फोडत हंबरडा निघावा पण तडफड करूनही.... कंठातून आवाजच निघू नये अशी जीवघेणी अवस्था झाली.

...ती अवस्था फक्त माझीच नाही तर महाराष्ट्रभर तू जमवलेल्या तुझ्या आप्तस्वकीयांची, गावकऱ्यांची, शेतकरी संघटनेतील तमाम सहकारी कार्यकर्त्यांची, साहित्यिक-कवी-लेखक, चित्रकार मित्रमंडळीची होती.

तू ज्यांच्यासाठी लढलास त्या प्रत्येक शोषित-पीडित हिंदू-मुसलमान, आदिवासी, गरीब-दीनदुबळ्या समाजघटकाची होती.

...........

आदल्याच दिवशी आपल्या जुन्या शब्दवेध चळवळीतील मंग्याला (मंगेश नारायणराव काळे गुरुदेव रविंद्रनाथ टागोर जयंतीदिनी टागोर पुरस्कारानिमित्त बंगाली असोसिएशन, कालीबारी, उल्हासनगर येथे सत्कारसन्मानार्थ निमंत्रित केलं होतं... तेव्हा आपले नेहमी स्वागतस्थळी आम्ही बराच वेळ बोलत बसलो. तुझाच विषय चर्चेत होता...

पण तुझ्याशी बोलायचं राहून गेलं.

...........

सॉरी यार... मी तुझ्याशीच बोलतोय, पण आज मला तुझ्याशी बोलायचं नसून तुझ्याबद्दल बोलायचं आहे हेच खूप जीवघेणं आहे. तू तर मरून मोकळा झालास वेड्या!



दिनकर दाभाडे

...........

आता मला लोकांशी, मित्रांशी, साहित्यिकांशी, राजकरण्यांशी संघटनांशी, संस्थांशी अन सर्वांशी थोडंसं बोलू दे. तू झोप शांत!

............

समाजसेवेचा पिंड असलेला दिनकर शिक्षणात फारसा रमला नाही.

विशीतील दिनकर धुळे येथे टेलिफोन एस्क्चेंजमध्ये ट्रेनी ऑपरेटर म्हणून जाईन झाला. धुळ्यातील 'स्वतंत्र भारत'मधून अभंग लेखन करू लागला.... बसस्टँडशेजारी दहा बाय दहाची मातीची खोली. खोलीत एक घासलेटी स्टोव्ह. एक सतरंजी. दोनचार डबे.. एवढे मर्यादित साहित्य... बहुतेक सर्वच साहित्यविषयक

कार्यक्रमांत भेटायचा. मी शहाद्याहून धुळ्यास आलो की त्याच्या खोलीवर जायचो.. बहुधा बाहेरच जेवायचो... शनिवार-रविवार साहित्यिक मित्रांकडे जिल्हाभर दौरा.. अगदी नंदूरबार, नवापूर, साक्री, पिंपळनेर ते सातपुड्यातील धडगाव (अक्राणी-महाल), तोरणमाळ, मोलगीपर्यंत. जगदीश देवपूरकरला मोठा भाऊ मानायचा... त्याच काळात धुळ्यात श्रमिक संघटनेचे वाहरु सोनवणेसह अनेक कार्यकर्ते परिचित झाले. सत्यशोधक मार्क्सवादी चळवळही जोमात होती. कवितारतिचे पुरुषोत्तम पाटील (पुपाजी) व अंमळनेरचे वा.रा. सोनार (तात्या) परिचित झाले. दिनकर घडतच गेला, लिहितच राहिला. कधीच काही अडचणी सांगत बसला नाही.

.... पण नोकरीत मात्र त्याचं मन रमत नव्हतं. झोडग्याचा कमलाकर देसले, नाशिकला संजय चौधरी, प्रताप लोके, फ्रँकी एकाच रूममधे राहायचे. मग रात्ररात्र मैफिली व जागरणंही व्हायची.

दिनकरची धुळ्यातील शेवटची भेट साक्रीच्या दलित-आदिवासी-ग्रामीण साहित्य संमेलनात झाली. त्यानंतर मी कल्याणला बदलून आलो व तो पुसदला निघून गेला....

.... तिकडेच त्याचं लग्न/ नोकरीचा राजिनामा / आणि विदर्भाचे राबिनहूड शामादादा कोलाम यांना पितृवत सांभाळून त्यांचंच शब्दांत त्यानं 'बिलामत' हे आत्मकथन लिहून काढलं. आणि ग्रंथालीनं ते प्रकाशितही केलं... या कालावधीत तो कसा जगला... काय काय केलं, काय काय लिहायचं राहून गेलं, हे अलीकडच्या काळात भेटला की भरभरून सांगायचा.

त्याची गयपात आली. त्याचा राबता, भ्रमंती नागपूरपासून मुंबई, सांगली, पुण्यापर्यंत वाढली... पायाला सतत भोवरा बांधलेलाच. चोवीस तास छातीवर शेतकरी संघटनेचा बिल्ला चिकटलेलाच. रघुनाथदादांनी त्याला विदर्भप्रमुख पदाची जबाबदारी दिली... शेतकरी-कष्टकऱ्यांसाठी झटतच राहिला.. आंदोलनं-मोर्चे हे त्याचं जगण्याचं एक अंगच झालं. रात्री अपरात्री खोलीवर कागदाचे गठ्ठे लिहित बसायचा. लोकसंग्रह वाढतच राहिला.

..... राजकारणात चांगली माणसं आली पाहिजेत... मतदार सुजाण व जागरूक असला पाहिजे झाला पाहिजे यासाठी सतत धडपड राहिला.

..... आपल्या लिखाणात त्यानं जिवंत पात्रांनाच काल्पनिक नावं देऊन वेगळ्याच शैलीची 'व्हाया सावरगाव खुर्द' ही न संपणारी दीर्घ कादंबरी दिली. तिचाच विस्तार करून पुढे आता सावरगाव-बुद्रुक लिही असं त्याला सांगताच त्यानं तीही दीर्घ कादंबरी लिहून काढली व आता ती प्रकाशित करण्याच्याच धावपळीत तो होता.

..... दरम्यानच्या काळात 'पदरव' हा त्याचा कवितासंग्रह आला.

दोन्ही मुलींची लग्नं झालीत... त्याचा घरसंसार त्याच्यासह खऱ्या अर्थी बायकोनंच सांभाळला.

..... आता कुठे त्या कार्याला व अस्तित्वाला खरं रूप येत चाललं होतं.

गाठीशी काहीही नसताना...

नवकवी-लेखक संघटना काढून धडपडतच राहिला. तिची रूपरेषा, कार्यप्रणाली, उद्देश निश्चित करणेसाठी जिल्हानिहाय कार्यकारिण्या नेमून सर्वांना नवीन कार्यास स्पेस मिळवून दिली.

......

खूप गोष्टी तशाच अपूर्ण ठेवून तो असा अचानक कुणालाही थागपत्ता लागू न देता निघून गेला.... हे त्याचे कुटुंबीय, मित्रपरिवार, शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते, कविलेखक संघटनेचे सभासद सदस्य यांच्यासाठी मोठा आघातच आहे.

(किल्लारीचा भूकंप झाल्या झाल्या दोन महिने तिथे राहून त्याने लिहिलेल्या कादंबरीचे बाड आता कुठे असेल कुणास ठाऊक! ती कादंबरी काही राजकीय कारणांमुळे तेव्हा प्रकाशात आणू दिली गेली नाही... असे तो सतत सांगायचा.... )

**– शिवराम भोंडेकर**


॥ग्रंथाली॥




**कथा मेपल कळ्यांच्या**

**रेवती भागवत**

जी माणसं लेखिकेला भेटली त्यांच्या नेहमीच्या आयुष्यात घडणाऱ्या प्रसंगांवर आधारित असा हा कथासंच आहे.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

**कथा जेनीची**

**तुम्हा-आम्हा सर्वांची**

**फ्रान्सिस डिमेलो**

आजच्या धकाधकीच्या जगात आदर्श कौटुंबिक जीवन कसं राखावं, ह्याचं धावतं वर्णन सदरच्या पुस्तकात ओघवत्या भाषाशैलीत वाचायला मिळतं.




**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**



राजीव श्रीखंडे

# अंकल टॉम्स केबिन - हॅरिएट बीचर स्टोव्ह

## Uncle Tom's Cabin by Harriet Beecher Stowe

प्रख्यात अमेरिकन लेखिका हॅरिएट एलिझाबेथ बीचर स्टोव्ह हिचा जन्म लिचफील्ड कनेक्टिकट येथे १४ जून १८१२ रोजी झाला. आई-वडिलांच्या ११ मुलांपैकी ती सहावं अपत्य. तिचे वडील लायमन बीचर हे एक स्पष्टवक्ते Calvinist उपदेशक होते. आई रोक्साना धार्मिक होती. तिच्या आईचे वडील जनरल वॉर्ड अमेरिकन क्रांतीच्या लढाईत प्रसिद्धीला आले होते. यावरून हॅरिएटचा जन्म एका प्रतिथयश कुटुंबात झाला होता हे स्पष्ट होते. दुर्दैवाने ती पाच वर्षांची असताना तिच्या आईचा मृत्यू झाला.

हॅरिएट हार्टफोर्ड फिमेल सेमिनरीत (Hartford Female Seminary) दाखल झाली. तिची मोठी बहीण कॅथरीन या सेमिनरीची प्रमुख होती. हॅरीएटला इथे फारच उत्तम शिक्षण मिळाले, जे मुलींना त्याकाळी अभावानेच मिळत असे. तिच्या शिक्षणात भाषा, गणित आणि क्लासिक्सचा समावेश होता.

हॅरिएट १८३२ साली, वयाच्या २१ व्या वर्षी सिनसिनाटीला स्थलांतरित झाली. तिथे तिचे वडील लेन थिओलॉजिकल सेमिनरीचे (Lane Theological Seminary) प्रमुख म्हणून काम करत होते. तिथे तिने सेमी कोलोन (Semi Colon) क्लबमध्ये आपले नाव नोंदवले. या क्लबचे सभासद समाजातील प्रतिष्ठितांपैकी होते. सिनसिनाटीमध्ये त्याकाळी जहाजांवरचा व्यापार जोरात होता, त्यामुळे तिथे अख्ख्या अमेरिकेतून लोक स्थलांतरित होत होते, ज्यात पळालेल्या गुलामांचाही समावेश होता. १८२९ साली मूळ रहिवासी असलेल्या आयरिश लोकांनी कृष्णवर्णीय लोकांच्या वसाहतींवर हल्ला केला, त्यांना तिथून पळवून लावण्यासाठी. या दंगलीत कृष्णवर्णीय लोकांना खूप यातना सहन कराव्या लागल्या. पुढे १८३६ आणि १८४१ मध्येही याच मुद्यावरून तिथे मोठ्या दंगली झाल्या. हॅरिएटने अनेक कृष्णवर्णीयांची भेट घेतली आणि त्यांचे अनुभव जाणून घेतले, ज्यांचा तिने आपल्या पुढील गुलामगिरीविरुद्धच्या लिखाणात बराच वापर केला.

लेनमध्ये गुलामगिरीवर होणाऱ्या चर्चांचादेखील हॅरिएटवर चांगलाच परिणाम झाला. यात ॲबोलिशनिस्ट (Abolitionist) म्हणजे गुलामी नष्ट करण्यासाठी कार्यरत असलेल्या चळवळीचा उद्‌गाता थिओडॉक्स वेल्ड (Theodox weld) याच्या विचारांचा, भाषणांचा, लिखाणाचा तिच्यावर दूरगामी परिणाम झाला. पण या विचारांच्या विरुद्ध असलेल्या गोऱ्या लोकांच्या आक्रमक वृत्तीमुळे पुढे तिच्या वडिलांनी हे चर्चासत्र बंद केले. या क्लबमध्येच हॅरीएटची भेट रेव्हरंड कॅल्विन एलिस स्टोव्ह यांच्याशी झाली. हे बायब्लिकल (Biblical) वाङ्मयाचे प्राध्यापक होते. ते विधूर होते. या दोघांचा ६ जानेवारी १८३६ रोजी सेमिनरीत विवाह झाला. त्यांना एकंदर सात मुले झाली, ज्यात जुळ्या बहिणींचा समावेश आहे.

पुढे १८५० मध्ये अमेरिकन कॉंग्रेसने म्हणजेच संसदेने Fugitive Slave Law हा कायदा संमत केला, ज्याद्वारे गुलामगिरी नसलेल्या राज्यांतदेखील पळालेल्या गुलामांना मदत करण्यावर बंदी घालण्यात आली. हॅरिएट आणि तिच्या यजमानांचा गुलामगिरीला प्रचंड विरोध होता आणि पळालेल्या अनेक गुलामांना ते आपल्या घरात काही काळासाठी आश्रय देत असत.

जून १८५१ मध्ये स्टोव्ह ४० वर्षांची असताना The National Era या गुलामगिरी प्रथेविरुद्ध कार्यरत असलेल्या वृत्तपत्रात Uncle Tom's Cabin चा पहिला भाग प्रसिद्ध झाला. पुढे १ एप्रिल १८५२पर्यंत ही सगळी कादंबरी या वृत्तपत्रात क्रमशः प्रसिद्ध झाली. यासाठी त्याकाळी हॅरिएटला चारशे डॉलर एवढी बिदागी मिळाली. ही कादंबरी पुस्तकरूपाने २० मार्च १८५२ रोजी प्रकाशित झाली. एका वर्षात या पुस्तकाच्या तीन लाख प्रती खपल्या गेल्या. हा एक उच्चांकच होता. या पुस्तकाने अमेरिकेत आणि युरोपात खळबळ माजवली. अमेरिकेच्या दक्षिण भागात जिथे ही गुलामगिरीची प्रथा

प्रचलित होती तिथे हॅरिएटबद्दल चांगलाच असंतोष पसरला. ग्रेट ब्रिटनमध्येही या पुस्तकाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. १८५३ च्या शेवटी तिने ब्रिटनमध्ये अनेक भाषणे दिली आणि आपल्या प्रसिद्ध कादंबरीचे वाचनही केले. पुस्तकांच्या जगात या कादंबरीने खपाचे नवीन कीर्तिमान स्थापन केले.

पुढे, अमेरिकन यादवी युद्ध सुरू झाले तेव्हा हॅरिएट वॉशिंग्टनला गेली. जिथे तिची राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांच्याशी भेट झाली. या भेटीत हॅरिएटला उद्देशून ते म्हणाले, की ‘अच्छा तर तू ती बाई आहेस, जिच्यामुळे हे मोठे युद्ध सुरू झालेले आहे.’ हॅरिएटने पुढे असे सांगितले की तिने राष्ट्राध्यक्ष लिंकनबरोबर फार छान वेळ घालवला.

युद्धानंतर ती फ्लोरिडाला गेली. तिथे ती Jacksonville जवळ राहिली. पुढे १८६८ मध्ये हर्थ अँड होम (Hearth and Home) या नियतकालिकाची पहिली संपादक बनली. परंतु एका वर्षातच तिने या पदाचा त्याग केला. विवाहित बायकांच्या अधिकारात सुधारणा व्हावी म्हणून तिने चळवळ सुरू केली आणि ती यशस्वीरीत्या वाढवली, जिचा पुढे अमेरिकन विवाहित स्त्रियांना खूप फायदा झाला.



हॅरिएट बीचर स्टोव्ह




अंकल टॉम्स केबिन

हॅरिएट कनेक्टिकटला परतली. तिथे तिने काही समविचारी माणसांबरोबर हार्टफोर्ड आर्ट स्कूलची स्थापना केली. सध्या ही आर्ट स्कूल युनिव्हर्सिटी ऑफ कनेक्टिकटचा भाग आहे.

१८८६ साली हॅरिएटच्या पतीचा मृत्यू झाला. त्यानंतर तिची प्रकृती झपाट्याने ढासळू लागली. डिमेंशिया विकाराने तिला ग्रासले. या अवस्थेत तिने Uncle Tom's Cabin परत लिहिण्यास सुरुवात केली आणि पुस्तकातले अनेक भाग तिने लिहून काढले. हे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे, ते इतके लोकप्रिय झाले आहे, हे तिच्या गावीच नव्हते. तिचा १ जुलै १८९६ रोजी वयाच्या ८५व्या वर्षी हार्टफोर्ड, कनेक्टिकट येथे मृत्यू झाला. तिचे दफन अ‍ॅण्डोवर येथील ऐतिहासिक फिलिप्स अ‍ॅकेडमीच्या दफनभूमीत करण्यात आले. तिथेच तिचे यजमान आणि मुलगा हेन्री एलिस यांचेही दफन करण्यात आले.

हॅरिएटने आयुष्यभर गुलामगिरीच्या अनिष्ट प्रथेविरुद्ध बुलंद आवाज उठवला. त्या चळवळीत तिने आणि तिच्या कुटुंबीयांनी नेहमीच सक्रिय भाग घेतला. तिच्या पुस्तकांनी गुलामगिरीचे वास्तव जगापर्यंत पोचवले. इतकेच नव्हे; तर तिच्या कादंबरीने गुलामगिरीविरुद्धची चळवळ इतकी जोरात पसरवली की शेवटी त्याचे पर्यवसान अमेरिकन यादवी युद्धात झाले, ज्यात लाखो माणसांचा बळी गेला, प्रचंड नासधूस झाली आणि दक्षिण अमेरिकेचा बराचसा भाग बेचिराख झाला. हॅरिएटने एकंदर तीस पुस्तके लिहिली, ज्यात कादंबऱ्या, प्रवासवर्णने आणि वैचारिक लेखन यांचा समावेश होतो. अमेरिकेच्या त्याकाळच्या समाजजीवनावर तिच्या विचारांचा फार मोठा परिणाम झाला, हे सत्य नाकारता येणार नाही.

----

आता आपण ‘अंकल टॉम्स केबिन’ या कादंबरीकडे वळूया.

या कादंबरीच्या सुरुवातीला केंटकीमधला एक सधन शेतकरी ऑर्थर शेल्बी हा कर्जबाजारीपणामुळे स्वतःचे शेत गमावण्याच्या बेतात असतो. त्याचे आणि त्याच्या बायकोचे त्यांच्या गुलामांबरोबर अतिशय सौहार्दाचे संबंध असतात. परंतु परिस्थितीच्या फेऱ्यात अडकल्यामुळे तो नाइलाजाने त्याचे दोन गुलाम विकून पैसे उभे करण्याचे ठरवतो. या दोघांपैकी एक असतो अंकल टॉम जो एक मध्यमवयीन, कुटुंब असलेला माणूस असतो आणि दुसरा असतो हॅरी, जो श्रीमती शेल्बीची मदतनीस असलेल्या एलिझाचा अगदी लहान मुलगा असतो. या दोघांना तो हॅले नावाच्या गुलामांचा व्यापार करण्याऱ्या व्यापाऱ्याला विकतो. श्रीमती शेल्बीचा या सगळ्याच प्रकरणाला पूर्ण विरोध असतो आणि तिचा मुलगा जॉर्जही यामुळे अतिशय नाराज होतो, कारण त्याचा अंकल टॉमवर अतिशय जीव असतो.

ही गोष्ट एलिझाला कळते तेव्हा ती स्वतःच्या छोट्या मुलाला घेऊन पळून जाण्याचे ठरवते आणि त्याप्रमाणे ती तशी पळतेही. त्यापूर्वी ती श्रीमती शेल्बीला एक चिठ्ठी लिहून त्यात तिची मनापासून माफीदेखील मागते.

इथे टॉमला मिस्टर हॅले जहाजातून गुलामांच्या बाजारात घेऊन जातो. हा त्यांचा प्रवास मिसिसिपी नदीतून होतो. या बोटीवर टॉमची इव्हा या एका छोट्या गोऱ्या मुलीशी ओळख होते. पुढे इव्हा नदीत पडते तेव्हा टॉम उडी मारून तिला वाचवतो. इव्हाचे वडील ऑगस्टीन सेंटक्लेअर उपकारापोटी त्याला हॅलेकडून विकत घेतात आणि त्याला स्वतःच्या कुटुंबाबरोबर त्याच्या घरी म्हणजेच न्यू ऑर्लिन्सला घेऊन जातात. टॉम आणि इव्हाची पुढे चांगली मैत्री होते, त्यांची गट्टी होते.

इथे एलिझा जी पळते, तिची तिच्या पळून गेलेल्या नवऱ्याशी– जॉर्ज हॅरिसशी – गाठ पडते. ते दोघे अमेरिकेतून कॅनडाला जायची योजना आखतात, पण त्यांच्या मागावर असलेला हॅलेचा मदतनीस टॉम लॉकर त्यांना त्यापूर्वीच गाठतो. आपले कुटुंब असे अडकलेले बघून जॉर्ज बिथरतो आणि तो टॉमवर गोळीबार करतो. टॉम जखमी होतो तेव्हा एलिझा जॉर्जला त्याला वाचवण्याची विनंती करते. त्याप्रमाणे जॉर्ज टॉमला एका क्वाकर

वसाहतीत वैद्यकीय मदतीसाठी घेऊन येतो.

इथे न्यू ऑर्लिन्समध्ये टॉम सेंटक्लेअरच्या शेतावर त्याचा गुलाम म्हणून राहत असतो. दोन वर्षांनी इव्हा आजारी पडते आणि तिचा आजार बळावतच जातो. मरणापूर्वी तिला जणू एक दृष्टांत होतो आणि त्याचा अनुभव ती तिच्या भोवताली असणाऱ्या लोकांना सांगते. त्याने प्रभावित होऊन ते सगळे लोक स्वतःचे आयुष्य बदलण्याचा निश्चय करतात. त्याप्रमाणे सेंटक्लेअर टॉमला गुलामगिरीतून मुक्त करण्याचे ठरवतो.

आपला हा निश्चय पूर्ण करण्याच्या आधीच एका झटापटीत सेंटक्लेअरचा मृत्यू होतो. त्याची बायको त्याने दिलेले वचन विसरते आणि टॉमला सिमॉन लिग्री या एका दुष्ट जमीनदाराला गुलाम म्हणून विकते. हा लिग्री टॉमला घेऊन त्याच्या लुइझानामध्ये असणाऱ्या जमिनीवर नेतो. पुढे एके दिवशी लिग्री टॉमला दुसऱ्या एका गुलामाला चाबकाने फोडून काढण्याची आज्ञा देतो, पण टॉम त्याला नकार देतो. त्यामुळे लिग्री टॉमचा खूप द्वेष करू लागतो आणि त्याचे जीवन अतिशय त्रासदायक करतो. टॉम ते सगळे बायबलचे पठण करत अतिशय धीरगंभीरपणे स्वीकारतो आणि बाकी गुलामांची त्याच्या परीने सर्व काळजी घेण्याचा प्रयत्न करतच राहतो.

इथे क्वाकर वसाहतीच्या इस्पितळात वेळेवर उपचार झाल्यामुळे टॉम लॉकरला जीवदान मिळते. यामुळे त्याच्यात आमूलाग्र बदल होतो. इतका की तो जॉर्ज, एलिझा आणि हॅरीला कॅनडाला पळून जायला सगळी मदत करतो. लुइझानामध्ये टॉमचे नष्टचर्य संपण्याचे नावच नसते. हा त्रास इतका वाढतो की त्यामुळे त्याच्या देवावर असलेल्या श्रद्धेची जणू कसोटीच लागते. एके दिवशी त्याला ख्रिस्त आणि इव्हा यांचा जणू दृष्टांत होतो आणि त्याची डगमगणारी श्रद्धा पूर्वीसारखी दृढ होते. एके दिवशी तेथे असलेल्या एका गुलाम स्त्रीला तिच्या मुलासकट पळून जायला टॉम मदत करतो. हे लिग्रीच्या कानावर पडते आणि तो भयंकर संतापतो. कितीही झाले तरी टॉम, ती बाई आणि तिचा मुलगा कुठे गेले आहेत हे लिग्रीला सांगत नाही. शेवटी लिग्री त्याच्या साहाय्यकांना टॉमला ठार मारण्याची आज्ञा देतो. ते दोघे साहाय्यक टॉमला बेदम मारहाण करतात. टॉम त्यांना क्षमा करतो. त्यामुळे ते दोघेही पार बदलतात. त्याचवेळी ऑर्थर शेल्बीचा मुलगा जॉर्ज तिथे पोचतो, तो टॉमची पैसे देऊन गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी. मात्र त्याचवेळी दुर्दैवाने टॉमचा मृत्यू होतो.

ती जी पळालेली गुलाम स्त्री असते तिचे नाव असते कॅसी. तिला पुढे जॉर्ज हॅरिसची बहीण Madame de Moux भेटते आणि ते एकत्र कॅनडाला जातात. पुढे असेही कळते की एलिझा ही कॅसीची लहानपणीच हरवलेली मुलगी असते. हे सगळे कुटुंब अशा तऱ्हेने एकत्र येते. ते पुढे फ्रान्सला जातात आणि तिकडून ते लायबेरियाला (Liberia) जातात. हे पूर्वाश्रमीच्या अमेरिकन गुलामांसाठी खास निर्माण झालेले राष्ट्र असते. इथे जॉर्ज शेल्बी केंटकीला आपल्या स्वगृही परततो आणि स्वतःच्या वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या जमिनीवर काम करण्याऱ्या सगळ्या गुलामांची मुक्तता करतो. जॉर्ज त्या सगळ्यांना टॉमने केलेल्या त्यागाची सतत आठवण ठेवण्यास सांगतो आणि टॉमचे घर म्हणजेच केबिन तो नेहमीच जतन करण्याचे ठरवतो. इथेच ही कादंबरी संपते.

--

हे आपले मन हेलावणारे कथानक एका अर्थाने सरळ रेषेत जाणारे आहे, तरी या कथानकाला दोन प्रवाह आहेत. एक प्रवाह आहे म्हणजे टॉमची कथा. त्याच्यावर येणारे निरनिराळे प्रसंग, त्यात त्याची झालेली परवड, ज्या धैर्याने तो या सर्व प्रसंगांना तोंड देतो त्याचे वर्णन, त्याचा निग्रह आणि त्याची चिकाटी आणि अर्थातच त्याची शोकांतिका म्हणजे त्याचा झालेला हकनाक मृत्यू. दुसरा प्रवाह आहे एलिझाच्या कथेचा. आपल्या लहान मुलाला घेऊन तिने केलेले पलायन आणि गुलामगिरीतून कायमचे सुटण्यासाठी तिने तिचे ठरवलेले उद्दिष्ट म्हणजेच अमेरिका सोडून कॅनडा गाठून तिथल्या स्वतंत्र वातावरणात आयुष्य जगायचे. हे दोन प्रवाह या कादंबरीच्या कथानकाला सहजच पुढे नेतात. पण, हे प्रवाह एकमेकांना शेवटपर्यंत छेदतच नाहीत. हे पुस्तक वाचताना आपल्याला आलटूनपालटून टॉमची आणि एलिझाची कथा समजत जाते.

या दोन प्रवाहांना आणखी एक परिमाण आहे. गुलामगिरीच्या विळख्यात टॉम उत्तरोत्तर अधिकच अडकत जातो, पण एलिझा मात्र गुलामगिरीच्या मगरमिठीतून स्वतःची आणि स्वतःच्या मुलाची शेवटी सुटका करण्यात यशस्वी होते. कादंबरीच्या सुरुवातीलाच ती स्वतःच्या मुलासकट पळते त्यानंतर ती कधीच गुलामगिरीत अडकत नाही. तिच्यावर अनेक संकटे येतात, तरी दरवेळी त्यातून ती सहीसलामत बाहेर पडते. या उलट टॉमचे नशीब त्याला कधीच साथ देत नाही आणि संकटांची तीव्रता इतकी वाढते की एका वेळी त्याचा देवावरचा विश्वासही डळमळीत होतो– याला अपवाद त्याने इव्हाबरोबर काढलेली दोन वर्ष हाच होय. त्यावर तो निग्रहाने मात करतो आणि आपल्या ध्येयापासून तो पुढे जराही विचलित होत नाही. टॉमचा आणि एलिझाचा हा संपूर्ण विरुद्ध दिशेचा प्रवास हॅरिएट स्टोव्हने अतिशय ठळकपणे चितारला असल्यामुळे याचा आपल्या मनावर खोलवर परिणाम होतो.

या कथानकाची बांधणी हॅरिएटने मुख्यत्वे या दोन विभिन्न प्रवाहांद्वारे केली असल्यामुळे या कथानकाला गतिमानता प्राप्त झालेली आहे. टॉम आणि एलिझावर वेगवेगळी संकटे येत जातात आणि ते त्यांचा सामना करत आपले जीवन जगत असतात. आपण या वेगवेगळ्या प्रसंगांत गुरफटत जातो आणि पुढे काय होते याची उत्सुकता आपल्याला कायम राहते. त्यामुळेच हे सरळसोट कथानक अतिशय वेधक स्वरूपात सादर करण्यात हॅरिएट यशस्वी ठरलेली आहे. तिची कथनशैलीही कथानकाला साजेशी म्हणजेच अतिशय भावनिक आणि नाट्यमय असल्यामुळे ही कथा आपल्या मनाला भिडते. घडणारे प्रसंग अतिशय परिणामकारक उभे करण्यात तिचा हातखंडा आहे.

हे पुस्तक अमेरिकन यादवी युद्धाआधी म्हणजे १८५२ ला प्रसिद्ध झाले असल्यामुळे त्या काळाची हॅरिएट स्टोव्हच्या भाषेवर

छाप आहे. आजच्या वाचकांना ती जुन्या वळणाची आणि म्हणूनच थोडी जड वाटू शकेल. परंतु त्याने कथानकात आपण गुंतण्यात काहीच अडथळा येत नाही हेही तितकेच खरे!

जो प्रकार भाषेचा तोच संवादांचा. हॅरिएटचे संवाद अतिशय मार्मिक आणि प्रभावी आहेत. त्याकाळच्या परिस्थितीवर झगझगीत प्रकाश टाकणारे आहेत, परंतु भाषा त्याकाळची असल्यामुळे समजायला थोडे कठीण आहेत. एका ठरावीक तऱ्हेच्या इंग्रजी संभाषणाची आपल्याला सवय झाली असल्यामुळे हे संवाद आपल्याला बरेच वेगळे वाटतील. त्यामुळे त्यातली अर्थगर्भता किंवा त्यांचा परिणाम कमी होत नाही.

अनेक व्यक्तिरेखांनी भरलेली ही कादंबरी आहे, पण यातल्या प्रमुख व्यक्तिरेखा खऱ्या तर चारच. इव्हा सेंटक्लेअर ही अतिशय कनवाळू असलेली एका श्रीमंत बापाची छोटी, अल्पवयीन मुलगी, टॉमला अतिशय मदत करणारी, त्याची गुलामगिरीतून सुटका व्हावी म्हणून आपल्या वडिलांकडून ज्यांनी टॉमला विकत घेतलेले असते तसे वचन घेतलेली, पण अकाली मृत्युमुखी पडलेली. सिमॉन लेग्री हा गुलामांचा एक अतिशय क्रूर मालक, जणू त्याकाळच्या गुलामांच्या मालकांचे एक भयावह प्रतीकच. टॉमचा देवावरचा विश्वास ढळावा, त्याची माणूस म्हणून गणना होऊ नये म्हणून सदा प्रयत्नशील असणारा, अतिशय जुलमी, उलट्या काळजाचा, ज्याच्यामुळेच टॉमचा मृत्यू होतो असा. शेवटी टॉम आणि एलिझा. टॉम म्हणजे अतिशय उमदा, खरा ख्रिश्चन असणारा गुलाम. सगळ्या संकटांतही आपली माणुसकी आणि श्रद्धा जपणारा, तत्त्वनिष्ठ, धैर्यवान, कमालीचा सोशिक, अत्यंत दयाळू. एलिझा तर एकाच ध्यासाने वेडावलेली, त्यासाठी वाटेल ते करायची तयारी असलेली. धाडसी, निग्रही. या सगळ्याच व्यक्तिरेखा, अगदी दुय्यम व्यक्तिरेखांसकट हॅरिएट स्टोव्हने अतिशय उठावदार केल्या आहेत. टॉम आणि छोटी इव्हा यांच्यात तयार झालेले प्रेमळ नाते हे तर हॅरिएट स्टोव्हने फारच हृद्य केलेले आहे, जे आपल्या मनाला अतिशय भावते.

Uncle Tom's Cabin आधी सांगितल्याप्रमाणे प्रसिद्ध झाली १८५२ साली. प्रकाशित होताक्षणीच या कादंबरीने जगात खळबळ उडवून दिली. गुलामगिरीच्या समर्थकांनी या कादंबरीला कडाडून विरोध केला तर गुलामगिरीच्या विरोधकांनी ही कादंबरी डोक्यावर उचलून धरली. अमेरिकाभर हा वाद पेटला. अनेक अमेरिकनांना या कादंबरीने गुलामगिरीविरुद्धच्या लढ्यात भाग घेण्यास प्रेरित केले. स्टोव्हच्या या कादंबरीने गुलामगिरीच्या अनिष्ट प्रथेवर सगळ्या जगाचे लक्ष केंद्रित केले. या कादंबरीमुळे उफाळलेल्या वादाचे पर्यवसान शेवटी अमेरिकन यादवी युद्धात झाले हा इतिहास आहे.

जगातील पहिली Best Selling कादंबरी म्हणून ओळखली जाणारी Uncle Tom's Cabin ही एका तऱ्हेने Protest साहित्याची पहिली कलाकृती आहे. अतिशय भावनिक शैलीत लिहिलेली, अनेक योगायोगांची रेलचेल असलेल्या कादंबरीच्या साहित्यिक मूल्यावर कितीही वाद असले तरी या कादंबरीने फक्त अमेरिकेचाच नव्हे तर सगळ्या जगाचाच इतिहास बदलला हे सत्य नाकारता येणार नाही. गुलामगिरी किती भयंकर आहे, कशी ती मानवजातीला काळिमा आणणारी आहे याचे अत्यंत विदारक चित्र या कादंबरीत आहे. जागतिक वाङ्मयात आपले अढळपद कायम ठेवणारी ही खरोखरची एक अविस्मरणीय कादंबरी आहे!


**– राजीव श्रीखंडे**

भ्रमणध्वनी : +९१ ९८२१०१७४६२

rshrikhande@yahoo.com



ग्रंथाली

**अनुराधा नेरूरकर यांचे पुस्तक**
**व कवितासंग्रह**




## विवाहसंस्था
**संकल्पना आणि संक्रमण**

आधुनिक दृष्टीने अत्यंत आवश्यक असलेली माहितीपूर्ण 'वरदा' अनुराधा नेरूरकर यांनी ओघवत्या शैलीत मांडली आहे.

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

## हुंकारनाद

स्त्रीच्या मानसतरंगांची दशा आणि दिशा अनुराधा नेरूरकर यांनी भावगहन शब्दसारिणीत मांडली आहे.




**मूल्य १५० रु. सवलतीत १०० रु.**



शरद काळे

# मानसिकतेत बदल आवश्यक

घरातल्या घरात कचरा शून्य करता येणे शक्य आहे हे आपण मागील लेखात पाहिले. अन्नाची नासाडी थांबवणे, भाज्यांच्या खाण्यायोग्य नसलेल्या गोष्टींचे, फळांच्या सालींचे आणि इतर विघटनशील जैविक टाकाऊ पदार्थांचे विघटन करून खत बनवणे ह्या गोष्टी अवघड नसल्या तरी सहजपणे स्वीकारल्या जात नाहीत. तसा बदल घडवून आणण्यासाठी जी मानसिकता लागते, ती मानसिकता समाजात मुरण्यासाठी आणखी एका पिढीचा काळ लागेल. बावीस वर्षांपूर्वी अणुशक्तिकेंद्राच्या माध्यमातून हा निसर्गऋण सिद्धांत मांडण्यास सुरुवात केली, त्यावेळी समाजात कचरा हा विषय फक्त उकिरड्यांशीच संबंधित होता. त्यावेळीही तसा विचार घेऊन जागृती करणाऱ्या अनेक व्यक्ती आणि संस्था कार्यरत होत्या, पण त्यांची संख्या आजच्या मानाने खूपच कमी होती. आता समाजात त्या विषयी जी जागरूकता दिसू लागली आहे, त्यासाठी वीस-बावीस वर्षांचा काळ जावा लागला हे दिसतेच आहे. ही जागरूकता प्रत्यक्षात येण्यासाठी अजून कदाचित तेवढाच काळ वाट पाहावी लागेल हेही खरे आहे. महाराष्ट्रातील अनेक सेवाभावी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्था याबाबतीत चांगले प्रयत्न करत आहेत. अगदी लहानपणापासून बाळकडू दिल्यानंतर आजची शैशवातील किंवा बाल्यावस्थेत असलेली पिढी याबाबतीत येत्या काही वर्षांमध्ये पर्यावरण संरक्षणात अग्रेसर राहील. यासाठी निसर्गऋण सिद्धांत समाजात नक्की रुजण्याची आवश्यकता आहे. हे घडू लागले की देश उकिरडामुक्त होण्यासाठी मोठीच मदत होईल.

शून्य कचरा घर ही संकल्पना राबवण्यात अनेक अडथळे येणार हे गृहीत धरले पाहिजे. याचे मुख्य कारण मानसिकता हेच आहे. घरातील पुरुष जैविक कचऱ्याचे विघटनाने खतात रूपांतर करण्याचे काम करतील अशी सर्वसाधारण अपेक्षा यात आहे. परंतु पुरुषांचा अहंकार बऱ्याच ठिकाणी आडवा येतो हीदेखील वस्तुस्थिती आहे. आधीच कामाने दबलेल्या गृहिणीवर हा आणखी भार पडला, तर मनात असूनदेखील ती हे काम करू शकत नाही. आपल्या दिनचर्येचा तो भाग नसल्यामुळे हे होत असते. त्यामुळे ह्या विषयावर खोलवर विचार करून दिनचर्येत तसा कायमस्वरूपी बदल व्हायला हवा असेल तर घरातील सर्वांचे सहकार्य त्यासाठी लागणार आहे. घरात वरिष्ठ नागरिक असतील, तर त्यांनीदेखील याबाबतीत स्वतः पुढाकार घेऊन आपली जबाबदारी उचलली पाहिजे. आधुनिक युगात वयाच्या ८०-८५ वर्षांपर्यंत सहसा लोकांची प्रकृती ठीक असते. त्यांच्याकडे हे काम सोपवले किंवा ते त्यांनी आपणहून स्वीकारले, तर विनातक्रार शून्य कचरा घर ही कल्पना प्रत्यक्षात येईल. घरात काही ठिकाणी अपंगावस्थेत असलेले, किंवा वृद्धत्वामुळे येणाऱ्या आजारांनी त्रस्त असलेले रुग्ण असू शकतात. अशा घरांमध्ये हे होऊ शकणार नाही. त्यांच्यासाठी, तसेच जागेची कमतरता असलेल्या घरांसाठी गृहनिर्माण संस्थांच्या माध्यमातून ही कल्पना साकार करता येऊ शकेल. वर म्हटल्याप्रमाणे ज्या आस्थापनांमध्ये रोज पाच किलो ते एक टनापर्यंत जैविक कचरा निर्माण होतो, अशा ठिकाणी या कचऱ्याचे खत करण्यासाठी काय करता येईल ते आपण आता पाहू.

जैविक कचऱ्याचे विघटन ज्या घरांमधून आणि आस्थापनांमधून होते त्या ठिकाणी कचऱ्याचे वर्गीकरण आपोआप होतेच. त्यासाठी वेगळे प्रयत्न करावे लागत नाहीत. तिथे फक्त कोरडा कचरा व टाकाऊ किंवा निरुपयोगी अशा गोष्टी जमा होत राहतात. आपल्यासाठी त्या टाकाऊ किंवा निरुपयोगी असल्या तरी त्यांचे पुनर्चक्रांकन होण्यासारखे असते. असे पुनर्चक्रांकन जिथे होते तिथपर्यंत त्या गोष्टी कशा पोहोचवायच्या यासाठी स्थानिक स्वराज्यसंस्थांचा सहभाग असणे महत्त्वाचे असते. कोरडा कचरा गोळा करून तो पुनर्चक्रांकन करण्यासाठी लागणारी यंत्रणा बऱ्याच नगरपालिकांमध्ये अस्तित्वात आली आहे. त्यात सुसूत्रता आणून आठवड्यातील ठरावीक दिवशीच असा कचरा गोळा केला तर कचऱ्याच्या वाहतुकीवरच्या खर्चात बरीच कपात करता येणे शक्य आहे. खतनिर्मितीमध्ये येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत मदतकेंद्र असायलाच हवे. कारण प्रत्येक नागरिक त्यात तज्ज्ञ असेल अशी अपेक्षा करणे रास्त नाही.

त्यामुळे योग्य कल्चर आणि उपकरणे पुरवणे, येणाऱ्या समस्यांचे निराकरण करू शकणारे तज्ज्ञ या केंद्रात नेमणे, ज्यांच्याकडे खतवापर शक्य नसेल, अशांच्या घरी तयार होणारे खत गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावणे, अशी सर्व कामे या मदतकेंद्रांमध्ये झाली तर यशाची नक्की खात्री देता येईल.

जैविक कचऱ्याचे खत जिथे होऊ शकत नाही, अशा घरांमध्ये आणि आस्थापनांमध्ये कचऱ्याचे वर्गीकरण झालेच पाहिजे. त्यासाठी पर्याय नाही हे लक्षात घेतले पाहिजे. अशा ठिकाणी ठरावीक वेळेस सर्व घरांमधील किंवा आस्थापनेमधील जैविक कचरा एकत्र करून त्याच्यावर प्रक्रिया करावी लागेल. कचऱ्याचे प्रमाण किती आहे हे लक्षात घेऊन त्यासाठी किती जागा लागेल हे ठरवीता येईल. जर बहु मजली इमारत असेल, तर तिच्या गच्चीवर हा खतप्रकल्प करता येईल, म्हणजे हाताळताना येणारी दुर्गंधदेखील कुणासाठी त्रासदायक ठरणार नाही. अर्थात वर्गीकरण अचूक असेल आणि शिळ्या अन्नाचा व खरकट्याचा समावेश नसेल तर दुर्गंध येतच नाही. नवीन वसाहतींमध्ये अशा प्रकारचे नियोजन वसाहती बांधण्यापूर्वीच करून तशी जागा निश्चित करता येऊ शकते. अनेक स्थानिक स्वराज्यसंस्थांमध्ये हे नियोजन बांधकाम आराखड्यातच करण्यासाठी नियमांमध्ये तशी तरतूद आहे. आपण हा विषय समजावून घेण्यासाठी ५० किलो आणि ५०० किलो जैविक कचऱ्याचे नियोजन कसे करता येईल, यासंबंधी उदाहरणे घेऊ, म्हणजे त्यातील खाचाखोचांसह ते लक्षात घेता येतील.

माणशी सरासरी अर्धा किलो जैविक कचरा रोज निघेल असा विचार केला तर १०० ते १२५ माणसांच्या वसाहतीत ५० किलो रोजच्या जैविक कचऱ्याच्या हिशेबाने नियोजन करायचे आहे. साधारण १० ते १२ मजली इमारतीत ४० ते ५० फ्लॅट असतात. त्यांच्याकडे रोज ५० किलो कचरा गोळा होतो. अशा इमारतीच्या सभोवती जी जागा असते, तीत साधारण १२० चौरस फूट जागा यासाठी लागेल. ह्या जागेत पावसाचे पाणी साचणार नाही ह्याचा विचार लक्षात घेऊन २ ते ३ फूट उंचीचा ओटा करून त्यावर योग्य त्या टाइल्स (ज्यावर घसरून पडणार नाही) बसवाव्यात. हा ओटा धुण्यासाठी योग्य तो उतार देऊन धुतलेले पाणी भूमिगत गटारास जोडले तर त्याच्या आसपास स्वच्छता राहील. या ओट्यावर ऊन व पावसापासून संरक्षण करण्यासाठी हिरव्या फायबर पत्र्यांची सोय करावी. ह्या ओट्यावर आपल्याला ७५ ते १०० लिटर क्षमतेच्या १८ ड्रम ठेवायचे आहेत. यातील दोन ड्रम रोज वापरले जातील आणि सात दिवसांसाठी १४ ड्रम वापरले जातील असा हिशेब आहे. या ओट्यावर इलेक्ट्रिक जोडणी उपलब्ध असावी. साधारण ५० किलो जैविक कचरा बारीक करण्यासाठी मिक्सरचे नियोजन करावे लागेल. घराघरातून फक्त वर्गीकृत केलेलाच जैविक कचरा गोळा होईल आणि त्यात शिळ्या, टाकून दिलेल्या अन्नाचा समावेश नसेल, अशी काळजी रहिवाशांनी घ्यायची आहे. मिक्सरमधून बारीक केलेल्या कचऱ्याचे दोन समान भाग करून प्रत्येकी एकेका ड्रममध्ये टाकायचे आहेत. प्रत्येक ड्रम तयार करताना त्याच्या तळाशी १ मिलीमीटर व्यासाची ३०-४० छिद्रे करून त्यावर नारळाच्या शेंड्यांचा ६ जाडीचा थर देऊन त्यावर स्टीलची ड्रमच्याच व्यासाची जाळी बसवायची आहे. त्यावर साधारण पाच किलो ओलसर किंवा कोरडे सेंद्रिय खत व तीन किलो कोकोपीट मिसळून तो थर एकत्र मिसळायचा आहे. त्यावर तीन लिटर ताक शिंपडावे. हे ताक विरजण लावून केलेल्या दह्याचे असावे. बाजारातून जे पाश्चराइझ्ड दही मिळते त्याचे नसावे. हाताला चिखल लागणार नाही इतपत ओले करण्यासाठी त्या मिश्रणावर आवश्यक तेवढे पाणी शिंपडावे. असे चौदा ड्रम तयार करावयाचे आहेत. (चित्र १)

रोज दोन ड्रममध्ये २५ किलो मिक्सरमधून काढलेला कचरा एकजीव करायचा आहे. सात दिवस हे मिश्रण अधूनमधून एकजीव करावे व आवश्यक असेल तर मधून अधून पाणी शिंपडावे. प्रत्येक ड्रममध्ये आठवड्याला एकदा कचरा पडेल. त्याचा नंबर येईपर्यंत त्यात उत्तम खत बनलेले असेल. हा ड्रम भरायला चारपाच आठवडे किंवा थोडेफार कमीअधिक दिवस लागतील. त्यात तयार झालेले खत मधूनअधून काढून जे चार अतिरिक्त ड्रम उपलब्ध आहेत, त्यात साठवून ठेवावे. गरजेप्रमाणे ते कल्चर म्हणून किंवा खत म्हणून वापरता येते. एखाद्या ड्रमामध्ये अळ्या झाल्या किंवा दुर्गंधी येत असेल, तर या अतिरिक्त खताचा वापर करून तो ड्रम पूर्ववत बनू शकतो. कोकोपीटचा वापर फक्त सुरुवातीला काही महिने करावा लागतो, त्यानंतर मात्र हे बारीक चाळलेले खत कोकोपीटची जागा घेऊ शकते. खताचे बनण्याचे प्रमाण वाढेल, तेव्हा ते संस्थेतील बागेला देता येईल, किंवा एक एक किलोच्या पिशव्या भरून सभासदांसाठी पुरवता येतील.




**१०० किलोपर्यंत ओल्या कचऱ्याचा खत प्रकल्प**

अडीचशे ते तीनशे माणसांच्या वसाहतीत म्हणजे जिथे रोज साधारणपणे १०० ते १२५ किलोपर्यंत ओला कचरा निर्माण होतो, त्या ठिकाणी हेच प्रारूप दुप्पट करून वापराता येईल. रहिवाशांनी कचरा देताना तो मिक्सर मधून काढून दिला तर काम

अधिक सोपे होईल व दुर्गंधीचे प्रमाण शून्य करता येईल. कदाचित ही कल्पना पचनी पडायला अवघड वाटेल, पण तिची योग्यप्रकारे मांडणी रहिवाशांसमोर करता आली तर मात्र तो प्रकल्प यशस्वी होण्याची शंभर टक्के खात्री देता येईल. खताचे योग्य नियोजन करण्यासाठी गृहनिर्माण संस्थेत गच्चीवर व सभोवती जागा असेल तर फुलबागेच्या जोडीने भाजीबाग लावून त्याचाही फायदा सर्व सभासदांना मिळू शकेल. गृहिणी आणि शाळकरी मुले व वरिष्ठ नागरिक यात सहभागी झाले तर दुधात साखर! त्यामुळे एकूणच प्रकल्पाविषयी आपलेपणा वाढत जाईल व तो आपल्या सर्वांचा प्रकल्प आहे ही भावना निर्माण करता येईल. गृहनिर्माण संस्थेतील हेवेदावे कमी होण्याची बरीच शक्यता त्यामुळे निर्माण होऊ शकते.

जिथे १०० किलो ते ५०० किंवा १००० किलो रोज गोळा होतो, अशा मोठ्या गृहनिर्माण संस्थांमध्ये किंवा सरकारी वसाहतींमध्ये तसेच मोठी उपाहारगृहे, छोटे भाजीबाजार, वसतिगृहे आणि मोठी इस्पितळे यासारख्या ठिकाणी त्या कचऱ्याचे खत करण्यासाठी जी प्रणाली लागेल ती नक्कीच आकाराने मोठी असेल, शिवाय त्या ठिकाणी मोठे मिक्सर, मोठ्या आकारमानाचे कम्पोस्ट हौद आणि खताची विल्हेवाट लावण्यासाठी सुविधा निर्माण कराव्या लागतील (चित्र २). हे करणे अवघड नाही, तसे सोपेदेखील नाही.



**१०० किलोहून अधिक व १ टनापर्यंत ओल्या कचऱ्याचा खतप्रकल्प**

यासाठी स्त्रीमुक्ती संघटनेसारख्या काही सेवाभावी संस्थांची मदत घेता येईल. यासाठी तांत्रिक सहकार्यदेखील घ्यावे लागेल. आधी म्हटल्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मदतकेंद्र यासाठी शास्त्रीय सल्ला देण्याचे, कल्चर पुरवण्याचे आणि खताचे मूल्यमापन करून त्याच्या वितरणासाठी कार्य करू शकेल. मध्यम आकाराच्या म्हणजे ५० हजारापर्यंत वस्ती असलेल्या शहरात अशी कम्पोस्ट केंद्रे शहरातील सर्व ओल्या कचऱ्याचे जागीच खतात रूपांतर करून डम्पिंग यार्डवर जाण्यापासून रोखू शकतील. हे दिवास्वप्न नसून प्रत्यक्षात येण्यासारखे प्रकल्प हवेत. यासाठी नागरिकांच्या मानसिकतेत जसा बदल अपेक्षित आहे, तसाच कचरा नियोजनासाठी जबाबदार असलेल्या स्थानिक स्वराज्यसंस्थेतील कर्मचाऱ्यांच्या आणि अधिकाऱ्यांच्या मानसिकतेतदेखील बदल अपेक्षित आहेच. याला राजकीय इच्छाशक्तीची जोड असणेदेखील तितक्याच गरजेचे आहे. विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांमधून नागरिकांसाठी खत बनविण्यासाठी शास्त्रीय किंवा तांत्रिक मदत केंद्र निर्माण करणे आणि कोरड्या कचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावण्याची सोय करण्यासाठी कचरावेचकांचे बचतगट निर्माण करणे यासाठी ही राजकीय इच्छाशक्ती अतिशय महत्त्वाची आहे.

ओल्या कचऱ्याचे खत केल्यानंतर जो कोरडा कचरा उरेल, त्यासाठी कचरावेचकांच्या संघटनेशी करार करून त्याची विल्हेवाट लावणे नक्कीच सोपे होईल. आठवड्यातून एकदा किंवा दोन वेळा हा कचरा गोळा करून तो या कचरावेचकांनाच देऊन टाकावा, म्हणजे त्याच्या विक्रीतून त्यांना त्यांच्या रोजीरोटीसाठी मदत मिळेल. गृहनिर्माण संस्था किंवा त्या आस्थापनांमधील विचारी लोकांनी हा कोरडा कचरा गोळा जरण्यासाठी या कचरावेचकांना योग्य तो मोबदला मिळेल अशी व्यवस्था केली तर शून्य कचऱ्याचे हे प्रारूप नक्कीच यशस्वी होईल. काही ठिकाणी काही तरुण मंडळींनी एकत्र येऊन कोरड्या आणि ओल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी व्यापारी तत्त्वावर सुरुवात केलेली आहे. बिनटेक्स नावाची कंपनी हैदराबाद येथील मोठमोठ्या गृहनिर्माण संस्थांमधून अशा पद्धतीने कोरडा कचरा गोळा करत आहेत. ही कंपनी प्रत्येक घरात दर महिन्याला पाच मोठ्या निळ्या जाड प्लॅस्टिकच्या पिशव्या पुरवते व आठवड्यातील एका ठरावीक दिवशी त्या गोळा करून त्या कचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावण्याची जबाबदारी घेते. या पिशव्यांवर जीपीएस प्रणालीसाठी उपयुक्त असे लेबल लावलेले असते, त्यामुळे त्या पिशव्यांची नेमकी विल्हेवाट कशी लागली याचा मागोवा घेता येतो. कचऱ्यातील या दोन मोठ्या घटकांची अशी काळजी घेतली गेली तर कचऱ्याचे प्रमाण ८० ते ९० टक्क्यांनी नक्की घटते. उरलेल्या १०-२० टक्के कचऱ्याचे नियोजन करण्यासाठी स्थानिक स्वराज्यसंस्थेची गाडी आठवड्यातून एक दिवस फिरली तरी सॅनिटरी लँड फिल किंवा शास्त्रोक्त पद्धतीने उभारलेल्या डम्पिंगवर त्याची रवानगी करता येईल. जसजशी कचऱ्याकडे बघण्याची दृष्टी सकारात्मक होईल, तसतशी या उरलेल्या कचऱ्याच्या प्रमाणातदेखील घट होईल, असा विश्वास वाटतो. या सर्व चर्चेतून आपल्या लक्षात येईल की घराघरातून कचऱ्याचे वर्गीकरण, अन्न कचऱ्यात न येण्याची दक्षता, जैविक ओल्या कचऱ्याचे खतात रूपांतर आणि कोरड्या कचऱ्याचे योग्य नियोजन ह्या चार गोष्टी नीट मार्गी लागल्या तर कचरा हा प्रश्न पर्यावरणाशी समतोल राखून सोडवता येईल.

**– शरद काळे**
भ्रमणध्वनी : ७५०६४९८२८५
sharadkale@gmail.com



**प्रकाश दुधळकर**

# दीपक श्रीपाद भवरासकर



दीपक भवरासकर

दीपक भवरासकर यांची प्रथम भेट जानेवारी २०१५ला ओरीसामध्ये मंगलाजोडी येथे झाली. फेडरेशन ऑफ इंडियन फोटोग्राफी या संस्थेने आयोजित केलेल्या बर्ड फोटोग्राफी शिबिरासाठी आम्ही मंगलाजोडी येथे गेलो होतो. पहिल्या दिवशी आम्ही एकाच डॉरमेटरीमध्ये मुक्कामाला होतो. सर्व लोक देशातील विविध भागांतून आलेले होते त्यामुळे सर्व अनोळखी होते. त्यामुळे कुणी कुणाशी विशेष बोलत नव्हते. एका व्यक्तीकडे मात्र मी सारखे कुतूहलाने बघत होतो. कुतूहलाचे कारण असे होते की त्या विशेष व्यक्तीने काही कारणाने आपला उजवा हात गमावलेला होता, त्यामुळे हे गृहस्थ पक्ष्यांच्या फोटोग्राफीसाठी आलेले असणे शक्य वाटत नव्हते. कारण पक्ष्यांची फोटोग्राफी करायची म्हणजे मोठमोठ्या लेन्स असलेला कॅमेरा जवळ बाळगावा लागतो. हा कॅमेरा एका हाताने हाताळणे फारच कठीण असते. कारण कॅमेरा व लेन्स यांचे मिळून वजन जवळपास तीन ते चार किलो असते. त्यामुळे ही व्यक्ती केवळ पर्यटक म्हणूनच त्या टूरला आली असावी असे मला वाटले.

सकाळी साडेपाचलाच सर्व शिबिरार्थी पक्ष्यांच्या फोटोग्राफीसाठी चिलका सरोवराच्या परिसरात जाण्यासाठी एकत्र आलो. ही व्यक्तीपण गळ्यात एक छोटा प्रोझुमर कॅमेरा अडकवून त्या ग्रुपमध्ये सामील झाली होती. चार लोकांचा एक ग्रुप करावा असे ठरले. त्याप्रमाणे होड्यांची व्यवस्था करण्यात आली होती. मला दुसरा गट मिळाला. त्यामुळे आम्ही वेगवेगळ्या होड्यांमधून प्रवासास सुरुवात केली. माझे संपूर्ण लक्ष मात्र त्या व्यक्तीकडे सारखे जात होते. कारण सर्व कॅमेऱ्यांचे शटररिलिज बटण हे उजव्या बाजूला असते व ते उजव्या हाताने काम करणाऱ्या व्यक्तींच्या सोयीचे असते. जगातील बहुतेक मशीन हाताळणाऱ्या सर्व व्यक्ती ह्या उजव्या हातानेच काम करणाऱ्या असतील असे गृहीत धरूनच तयार करण्यात आल्या होत्या. आता काही उत्पादकांनी त्यांच्या मशीनमध्ये थोडा बदल करून त्या गरजेप्रमाणे डाव्या किंवा उजव्या हाताने काम करणाऱ्या व्यक्तींना वापरता येईल अशा केलेल्या आहेत. परंतु कॅमेऱ्याच्या बाबतीत मात्र अजूनही तो बदल झालेला नाही. त्यामुळे मला उत्सुकता होती हे गृहस्थ आपला कॅमेरा डाव्या हाताने कसे हाताळतील? आम्ही वेगवेगळ्या होडीत असलो तरी एकमेकांना दिसण्याइतपत जवळ होतो. त्यामुळे माझे लक्ष सतत यांच्याकडेच होते. हे गृहस्थ अगदी सहजपणे डाव्या हाताने कॅमेरा हाताळत होते. साधारणपणे तीन तासांनंतर आम्ही आपल्या मुक्कामाच्या ठिकाणी आलो. आता मात्र माझी उत्सुकता शिगेला पोहोचली. सरळ त्यांच्याजवळ जाऊन ते कुठून आले याची चौकशी केली. त्या शिबिरात देशातील विविध भागातून माणसे आली होती. त्यामुळे सहजच माझा प्रश्न हिंदीमधून होता. तेव्हा कळले की ते इंदोरहून आले होते आणि हेही कळले की ते महाराष्ट्रातील असून सध्या इंदोर येथे स्थायिक आहेत. पुढील तीन दिवसांत त्यांच्याशी चांगलीच मैत्री झाली व त्यांच्याबाबत एकेक नवीन गोष्ट कळत गेली.

ते सिव्हिल इंजिनीयर असून, केंद्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातून अधीक्षक अभियंता म्हणून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांनी हायवे इंजिनीयरिंगमध्ये एम.ई. केले असून, मार्केटिंगमध्ये एमबीए केलेले आहे. सन १९९० मध्ये कुटुंबीयांसोबत सहलीसाठी प्रवासास निघाले असताना बसला धुळ्याच्या जवळ रात्री अपघात झाला. या भयंकर अपघातात त्यांच्या उजव्या हाताला गंभीर इजा झाली व दुर्दैवाने त्यांचा हात कोपरापासून कापावा लागला.



**शेख सलीम चिस्ती दर्गा, फतेहपूर–शिकरी**

घेऊन त्यांच्या वाढदिवसाला प्रोझुमर कॅमेरा त्यांना भेट दिला. ते पुन्हा आपल्या जुन्या छंदाकडे वळले. डाव्या हाताने कॅमेरा हाताळायचे तंत्र त्यांनी लवकरच अवगत करून घेतले. घरगुती समारंभात, सहलीमध्ये कॅमेरा सतत त्यांच्याजवळ असायचा. निवृत्तीनंतर वेगवेगळ्या ठिकाणांना भेटी देण्याचेही चालूच होते. त्या सर्व ठिकाणांची छायाचित्रे घेऊन त्यांनी इंदोरमधीलच काही जाणकार मंडळींना ती दाखवली. त्यांची छायाचित्रे त्या मंडळींनी खूप आवडली व त्यांना हा छंद पुढे चालू ठेवण्यासाठी खूप प्रोत्साहन दिले. त्यांनी पंढरपूरवारीचे छायाचित्रण करून इंदोरच्या प्रीतमलाल दुवा सभागृह आणि रवींद्र नाट्यगृहात या छायाचित्रांचे प्रदर्शन केले. या प्रदर्शनास लोकांनी दिलेला प्रतिसाद व प्रोत्साहन यामुळे त्यांची उमेद वाढली व त्यांनी डिजिटल एसएलआर कॅमेरा विकत घेतला आणि तोही एका हाताने हाताळण्याचे तंत्र हस्तगत केले.


भवरासकर यांनी फोटोग्राफीचे विधीवत शिक्षण कुठेही घेतले नाही. तथापि कॅमेरा क्लब ऑफ इंदोर आणि फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडिया, मुंबई; तसेच, फेडरेशन ऑफ इंडियन फोटोग्राफी याची सदस्यता घेतल्यानंतर तेथील अनुभवी छायाचित्रकार मित्र

हा खूप मोठा आघात होता व यातून सावरण्यासाठी त्यांना बराच काळ लागला. परंतु त्यांनी जिद्द सोडली नाही. आता सर्वच कामे डाव्या हाताने करणे क्रमप्राप्त होते. त्यांनी डाव्या हातालाच काम करण्याचे आदेश दिले. एकेक गोष्ट सवयीची होऊ लागली. हळूहळू ते डाव्या हाताने लिहूदेखील लागले. नव्या उमेदीने परत कामावर रुजू झाले. हळूहळू सर्व गोष्टींची सवय होऊन गोष्टी अंगवळणी पडत गेल्या आणि २०११ मध्ये ते रीतसर सेवानिवृत्त झाले.

निवृत्तीनंतर आता काय हा प्रश्न त्यांच्यापुढे होताच. त्यांना फोटोग्राफीची आवड आधीपासूनच होती पण कामाच्या व्यापामुळे ही आवड जोपासणे त्यांना शक्य झाले नाही. शिकत असताना त्यांच्या अमेरिकेत असलेल्या काकाने त्यांना एक छोटा बॉक्स कॅमेरा भेट दिला होता. त्याच्या साह्याने त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणांची व प्रसंगाची छायाचित्रे घेण्याचा सुरुवात केली. फोटोग्राफीची आवड तेव्हापासूनच निर्माण झाली होती. निवृत्तीनंतरचे त्यांचे रिकामपण त्यांच्या पत्नीने लगेच हेरले आणि त्यांची फोटोग्राफीची जुनी आवड लक्षात



**बार आपोसटेल्स, ऑस्ट्रेलिया**



**टायगर नेस्ट, भुतान**

यांचे मार्गदर्शन घेऊन व फोटोग्राफीवरील प्रकाशित साहित्य वाचून, अभ्यास करून त्यांनी फोटोग्राफीविषयक माहिती प्राप्त केली. त्यांना ऑनलाइन सेमिनारचादेखील खूप उपयोग झाला. फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडिया, मुंबई याच्याद्वारे आयोजित फोटोटूर आणि रोहिंटन मेहता यांच्या ऑनलाइन क्लासचादेखील त्यांना फार उपयोग झाला.

त्यांना आर्किटक्चरल फोटोग्राफी, लॅण्डस्केप फोटोग्राफी, व ट्रॅव्हल फोटोग्राफीमध्ये विशेष आवड आहे. त्यांनी आतापर्यंत इंदोर येथे पंढरपूरवारीची दोन प्रदर्शने, लेह लडाख येथे घेतलेल्या छायाचित्राचे प्रदर्शन, कॅमेरा क्लब ऑफ इंदोर व प्रेस क्लब इंदोर येथे आयोजित केलेल्या प्रदर्शनात भाग घेतला. सन २०२२ मध्ये फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडिया; मुंबई यांनी आयोजित केलेल्या जहांगीर आर्ट गॅलरीमधील प्रदर्शनामध्ये सहभाग घेतला. २०१९ मध्ये मोरोक्को येथे फेडरेशन ऑफ इंटरनॅशनल फोटोग्राफी या संस्थेने आयोजित केलेल्या जागतिक फोटो परिषदेमध्ये फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडिया यांच्या संभासदांसह भाग घेतला. त्यावेळी आयोजित फोटो टूरमध्ये भाग घेऊन मोरोक्को येथील स्थळांची फोटोग्राफी केली. ते देशा-विदेशातील विविध फोटोग्राफी स्पर्धांमध्ये भाग घेतात व त्यांच्या कामाची दखल घेऊन फेडरेशन ऑफ इंडियन फोटो फोटोग्राफी यांनी त्यांच्या व्ह्यूफाईंडर या मासिकात त्यांच्याबाबत लेख प्रकाशित केला. तसेच दैनिक भास्कर, नई दुनिया आदी वर्तमानपत्रांनी त्यांच्याबाबत लेख प्रकाशित केले आहेत. विविध माध्यमांनी त्यांच्या जिद्दीचे व धडाडीचे कौतुक केले आहे. सरदार पटेल विश्वविद्यालय द्वारा आयोजित धरोहर फोटोग्राफीस्पर्धेमध्ये त्यांना प्रथम पुरस्कार मिळाला असून त्यांना विविध स्पर्धांमध्ये पाचशेपेक्षा जास्त स्वीकार व विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत त्यांनी आपल्या फोटोग्राफी कौशल्याने रसिकांची मने जिंकून घेतली असून, प्रयत्न केला तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही याचा स्वतःच्या अनुभवातून व कृतीतून आदर्श समाजापुढे ठेवला आहे.

कोरोना साथीमुळे काही काळ त्यांच्या फोटोग्राफीच्या छंदाला अल्पविराम मिळाला असला तरी पुन्हा मुक्तपणे फोटोग्राफी करण्याची त्यांची दुर्दम्य इच्छा आहे. फोटोग्राफी छंदामुळे त्यांना वेगवेगळ्या देशांतील खूप मित्र मिळाले व अनेक लोकांचा सहवास मिळाला. त्यामुळे सेवानिवृत्तीनंतरचे जीवन त्यांना खूप आनंदात जगता आले. फोटोग्राफीच्या क्षेत्रात नव्याने येणाऱ्या फोटोग्राफर साठी त्यांचे काम आदर्श असेच आहे. आर्थिक प्राप्तीसाठी फोटोग्राफीचा गैरवापर करण्याला त्यांचा कायम विरोध राहिला आहे. फोटोग्राफीचे तंत्र व मंत्र योग्य प्रकारे शिकून त्याचा उपयोग करून समाजासाठी काहीतरी चांगल्या गोष्टी कराव्यात असे त्यांना सतत वाटत असते असते.



**– प्रकाश दुधळकर**

माजी कोषाध्यक्ष, फोटोग्राफीक सोसायटी ऑफ इंडिया

dudhalkar@gmail.com



॥ग्रंथाली॥



# स्वयंभू

## मकरंद देवराम भारंबे

स्वयंभू नावामागे एक विचार षडजांतरातील शुद्ध अंतराळात प्राणस्वरूप 'न'कार व अग्निवाचक 'द'कारातून साकारणाऱ्या अनाहत नादाचा.. त्याभोवतीच्या गंधार ग्रामाचा.. दुसरा जन्मजात स्वतंत्रतेचा, तिसरा आत्मोत्थानाचा, आवश्यक शक्तिगर्भतेचा.

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**



चित्रगुज पश्चिमेचे



विजयराज बोधनकर

# बहुआयामी चित्रकार

साहित्य, संगीत आणि चित्रकला या कलांचा मेळ असणारे अनेक कलावंत आहेत. अनेकदा एक कलाही अनेक कलांना सोबत घेऊन प्रवास करत राहते. चित्र, साहित्य, संगीत, नृत्य, अभिनय हे मूळच्या वृत्तीतून झिरपत राहतं. अशा अनेक कलांचा संगम बघितला की जगाला आश्चर्य वाटत राहतं. तसंच आश्चर्य या कलावंतांच्या कलाप्रवासात दडलंय. अनुवाद, साहित्य, काव्य आणि चित्रकला याचा सुंदर समन्वय या कलांवतांमध्ये पाहून वेगळीच प्रेरणा मिळू शकते.

**सॅलवॉटर रोजा**



तो मनस्वी आणि बहुश्रुत होता. संगीताची, काव्याची, लेखनाची, कोरीवकामाची मोठी आवड असलेला सॅलवॉटर प्रतिभावंत चित्रकार होता. निसर्गचित्रांबरोबर ऐतिहासिक बायबलसंबंधी आणि वेगळ्या आशयाची पौराणिक दृश्यं चितारण्यात त्याची प्रतिभा खरंच उर्जावान होती. त्याच्या चित्रातला गडदभाव, एक उदासीनतेची छटा व खिन्न करणारी शैली चित्रातून प्रकट होत असायची. त्या काळाच्या चित्रपरंपरेच्या यात्रेत सामील न होता वास्तवाचं भय, वेगळा निसर्ग त्यानं चित्रित केला. त्याच्या काही चित्रांवर वादविवादसुद्धा निर्माण झालेत. जवळपास त्याला अटकही झाली होती. त्याच्या खिन्नमय चित्रकारितेचा प्रभाव संपूर्ण युरोपभर दीर्घकाळ राहिला. असा हा जगावेगळा चित्रकार २० जून १६१५ रोजी इटली देशातल्या नेपल्स शहराच्या सीमेवरील ॲरनॅला या प्रांतात जन्मला. अशा या बंडखोर चित्रकाराचे वडील एक जमीन सर्वेक्षण करणारे व आई एका संपन्न सिजलीच्या ग्रीक कुटुंबापैकी होती. वडिलांना असं वाटायचं की त्यानं एक तर वकील व्हावं किंवा धर्मगुरू बनावं. त्यांनी सोमासची फादर्सच्या मठात सॅलवॉटरला प्रवेश घेऊनही दिला. अगदी लहानपणापासून चित्रकलेची आवड



**सॅलवॉटर रोजा यांची पेंटिंग**

असलेला हा मुलगा गुपचूप आपला मामा पाओलो ग्रॅको याच्याकडे पेंटिंग शिकायला गेला.

सॅलवॉटरच्या वयाच्या सतराव्या वर्षी त्याच्या वडिलांचा मृत्यू झाला. आता सर्व आर्थिक जबाबदारी सॅलवॉटरवर येऊन पडली. हे संघर्षाचे दिवसही निभावून नेताना त्यानं चित्रांची आवड मरू दिली नाही. याच काळात इटालियन पेंटर इनयेलो फालकोन याच्याकडे चित्रकलेचे धडे गिरवू लागला. फालकोन हा युद्धावरची चित्रं चितारण्यात पारंगत होता. एका युद्धाच्या चित्रप्रतिमेत त्यानं सॅलवॉटरचं साहाय्य घेतलं. तेव्हा सॅलवॉटरची चित्रक्षमता त्याच्या लक्षात आली. हे काम पाहिल्यानंतर फालकोननं सॅलवॉटरला रोमला जाण्याचा सल्ला दिला. त्यानुसार तो दोन वर्षं रोममध्ये राहिला. तिथून तो नेप्लसला परतला आणि त्याला खूप प्रशंसा मिळवून देणारी कामं करायला प्रारंभ केला. पुन्हा रोमला जाऊन पुन्हा समाजाला त्याच्या कलेचा चित्रपरिचय करून दिला.

त्यानं रोमन कार्निवलमध्ये एकसंगीत नाटक लिहिलं आणि अभिनयही केला. त्यानंतर तो अधिकच लोकप्रिय झाला. १६३९मध्ये तो फ्लोरेन्सला स्थलांतरित झालं आणि तिथे अनेक कवींना, नाटककारांना आणि चित्रकारांना, त्यांच्या कलाकृतींना स्पॉन्सर करून त्यांचीही कला जगासमोर ठेवली. याच काळात त्यानं प्रभावी व्यक्तिमत्त्वांना व तेजस्वी विद्यार्थ्यांना तयार केलं. असे सर्वत्र संचार करताना १६४९ पुन्हा रोमला परतला व त्यानं प्रचंड आकाराच्या अत्यंत असामान्य मानल्या जाणाऱ्या संकल्पनेवर आपलं लक्ष केंद्रित केलं. त्याच्या नावावर युद्धाच्या विषयासह अनेक भव्य पेंटिंग आहेत. प्रस्थापित नियमांना धुडकावून त्यानं त्याची मनोभावना चित्रात प्रतिबिंबित केली. त्यामुळे त्याचे कडवे शत्रूही बरेच होते. फ्लोरेन्समध्ये असताना त्याला ल्यूक्रिझिया नावाची स्त्री भेटली. तो विवाह न करता दीर्घकाळ तिच्यासोबत राहिला. तिच्यापासून दोन मुलं झालीत. अखेर ४ मार्च १६७३ रोजी मृत्युशय्येवर असताना त्यानं तिच्याशी लग्न केलं व १५ मार्च १६७३ रोजी जलोदर या रोगामुळे त्याचा मृत्यू झाला.

### थॉमस लॉरेन्स

थॉमस लॉरेन्सच्या वडिलांचं एक कॉफी हाऊस होतं थॉमस फावल्या वेळात कॉफी हाऊसमध्ये रमायचा. तो सहा वर्षांचा असल्यापासून कविता वगैरे गायचा आणि पोर्ट्रेट करायचा. त्याच्या वडिलांना आपल्या मुलाचं कौतुक वाटायचं. त्याच्या या गुणांचा वडील उपयोग करून घ्यायचे. आलेल्या ग्राहकाला थॉमसला कविता ऐकवण्यासाठी सांगायचे. थॉमस कविता म्हणून दाखवायचा. कुणी ग्राहक थॉमसकडून आपलं पोर्ट्रेट करून घ्यायचे. अशा या चित्रकाराचा जन्म १३ एप्रिल १७६९ रोजी इंग्लंडमधील ब्रिस्टल या शहारात झाला.

थॉमस हा लहानपणापासूनच हरहुन्नरी होता. तो शाळेत असतांना फ्रेंच आणि लॅटिन भाषा शिकला. नृत्य, बॉक्सिंग, बिलियर्ड, तलवारबाजी असे विविध प्रकार शिकला. या सर्व बहुगुणी



स्वभावामुळे दहा वर्षांचा असतानाच त्याची सर्वत्र ख्याती पसरली. अशात दुर्दैव आडवं आलं. थॉमसचे वडील व्यवसायिक कर्जात हळूहळू बुडत गेले. त्यामुळे त्यांनी बाथ शहरात आपलं बस्तान हलवलं व लंडन सोडलं. त्या छोट्याशा वयातच थॉमसला याची जाणीव झाली व कुंटुबाला पोसण्यासाठी तो पोर्ट्रेटची कामं करू लागला. प्रारंभी त्यानं पेस्टलमध्ये पोर्ट्रेट केली. त्यानंतर त्याला राजघराण्यातली कामं मिळत गेली. त्यामुळे बाथमधल्या लोकांमध्ये थॉमस लोकप्रिय होत गेला. प्रतिभावान, आर्कषक, विनम्र असा मुळातच त्याचा स्वभाव होता.

पुढे मात्र त्याला चित्रकार विलियल हॉर आणि चित्रकर्ती मॅरी हार्टले या दोघांनी खूप प्रोत्साहित केलं. काही श्रीमंत मंडळी



**थॉमस लॉरेन्स यांची पेंटिंग**



त्याला त्यांच्याकडे असलेली पेंटिंग अभ्यासकरण्यासाठी देत असत. थॉमसनं एकदा रफैलच्या चित्राची हुबेहुब कॉपी केली म्हणून त्याला चांदीची शिल्ड व सोन्याचं नाणं लंडनमधल्या सोसायटी ऑफ आर्टसने बक्षीस म्हणून दिलं. जेव्हा तो अठरा वर्षांचा झाला तेव्हा तो लंडनमध्ये आला व चित्रकार जॉशुअ रॅन्लडच्या स्टुडिओत काम करू लागला. जवळच्या लॉजमध्ये राहू लागला. रॅन्लडच्यामार्फत रॉयल ॲकॅडॅमीमध्ये त्याला विद्यार्थी म्हणून स्वीकारण्यात आलं. काही काळातच थॉमसनं प्रदर्शनं भरवायला प्रारंभ केला. त्यामुळे त्याची प्रतिष्ठा झपाट्यानं वाढू लागली. त्यामुळे त्याला ॲकॅडॅमीत सहभागी करण्यात आलं. दुर्दैवानं सर जॉशुअ रॅन्लडचा मृत्यू झाला आणि त्याची जागा लॉरेन्सला देण्यात आली. काही काळानं ॲकॅडॅमीचा पूर्णपणे सदस्य बनवण्यात आलं. तो त्या काळातला एक फॅशनेबल पोर्ट्रेट पेंटर बनला. श्रीमंत मंडळी, राजघराणं, राजकीय मंडळी त्याच्याकडून पोर्ट्रेट करून घेऊ लागले.

इतकं होऊनही तो पुन्हा पुन्हा कर्जबाजारी होत असे कारण त्याला त्याच्या कुंटुंबाला साहाय्य करावं लागत असे. त्याचा एक आश्रयदाता लॉर्ड सिफोर्थ मात्र त्याला शेवटपर्यंत आर्थिक साहाय्य करत राहिला. पुढे 'नाईट' हा किताब देऊन त्याचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर तो रॉयल ॲकॅडॅमीचा प्रेसिडेन्ट म्हणून मरेपर्यंत त्या जागेवर राहिला. त्याच्यामध्ये व्यक्तिचित्रणाचे सर्वोच्च गुण ओतप्रोत भरले होते. त्याची चित्रं पुढे अनेक नामवंत गॅलऱ्यांमधून झळकली. दोनशे पन्नास वर्षांतील महान चित्रकारांच्या परंपरेतला एक महान चित्रकार म्हणून त्याच्याकडे पाहिलं जातं.

अशा या प्रख्यात चित्रकाराचा मृत्यू १८३० मध्ये लंडन इथे झाला.

**हेन्री फ्युसेली**



मानवी मनाची अस्वस्थता, मनाची जडणघडण, सामाजिक बंधनं, नैसर्गिक गुणतत्त्व, निसर्गाची रचनात्मक निर्मिती या सर्वांचा अभ्यास, विचार, चिंतन करण्याची एक असामान्य प्रवृत्ती असते. जी सर्वसामान्यांमध्ये दिसत नाही. कलावंत तो या सर्वांचा विचार करून त्याचं प्रकटीकरण करत राहतो. तीच त्याची कला त्याला यश मिळवून देत राहते. हेन्री फ्युसेली याची कला कालानुरूप त्याच पठडीतील आहे. ७ फेब्रुवारी १७४१ रोजी जन्मलेला हा चित्रकार अठराव्या शतकातल्या विचारधारेवर काम करताना आढळतो. स्वित्झर्लंडच्या झुरीच या शहरात याचा जन्म झाला. त्याचे वडील हे एक चित्रकार आणि लेखक होते. हेन्रीला एकूण सतरा भावंडं होती. वडिलांनी त्याला धर्मशास्त्र शिकण्यासाठी प्रोत्साहित केलं. त्याचे दोन भाऊसुद्धा चित्रकार होते. वडिलांच्या मार्गदर्शनाखाली हेन्रीनं झुरीच येथल्या कॅरोलीन महाविद्यालयात धर्मशास्त्राचे उत्तम शिक्षण घेतलं. त्याच दरम्यान एका मित्राची भेट झाली. तोही तत्त्वज्ञानात गती असलेला विद्यार्थी होता. त्याच्या सहवासात हेन्रीचं ज्ञान अधिक प्रगल्भ होत गेलं. परंतु त्या मित्राच्या काही गैरवर्तणुकीमुळे त्याला झुरीच सोडावं लागलं.

झुरीच सोडून झाल्यावर १७६४ तो इंग्लंडला आला व त्या अगोदरच त्यानं लेखन व भाषांतर यात स्वत:ला झोकून दिलं होतं. शेवटी त्याचं मन त्यात फार रमलं नाही. तो निराश झाला. हेन्रीनं आपलं लक्ष संपूर्णपणे चित्रकलेकडे वळवले. मुळातच रक्तात असलेली चित्रकला अधिक गडद होऊ लागली. लंडनमध्ये ब्रिटिश चित्रकार सर जोशुअ रेन्लड यांच्याशी त्याची ओळख झाली. हेन्रीनं आपल्या काही कलाकृती त्यांना दाखविल्या, सर जोशुअं यांना ह्या आवडल्या व त्यांनी हेन्रीला प्रोत्साहित केलं. नंरत हेन्रीने आपलं सर्व लक्ष चित्रांवर केंद्रित केलं.



त्यानंतर तो रोमला गेला. तिथे प्राचीन अवशेषांचा अभ्यास केला. मायकल अँजेलोच्या कामाचा अभ्यास केला. स्वयंस्फूर्तीने चित्रकला एकलव्य पद्धतीनंच शिकला. १८०४ मध्ये केवळ कामाच्या जोरावर रॉयल अ‍ॅकॅडॅमीमध्ये निवडून आला. त्यानंतर त्यानं कलाविषयक ग्रंथ लिहिले व सोबत चित्रकला ही त्याच ताकदीनं चालू ठेवली. काही महत्त्वाचे विद्यार्थी त्याने तयार केले. जॉन कॉन्स्टेबल, विलियम ब्लेक हे त्याचे विद्यार्थीच होते. रोमँटिसिझम ह्या शैलीतून हेन्रीनं पुढे खूप काम केलं. त्याच्या चित्रशैलीवर त्याच्या वैचारिकतेचा प्रभाव जाणवतो. अठराव्या शतकातली त्याची शैली अद्वितीय होती. प्राचीन ग्रीक व रोमन संस्कृतीनं त्याची कला प्रेरीत झाली होती. त्यांच्या अनेक कलाकृती या साहित्यिक आशयावरच आधारित होत्या. अनेक दंतकथा, विल्यम शेक्सपीयरची नाटकं, जॉन मिल्टनसारख्या दिग्गज कवीच्या कवितेचा प्रभाव त्याच्या चित्रातून प्रवाहित होत होता. अतिशयोक्ती रानटी रानभाव, मनातले अदृश्य भाव तो अनेक संकेंतासह चित्रातून दाखवत राहिला. त्याची बरीचशी चित्रं लंडनच्या रॉयल अ‍ॅकॅडॅमीमध्ये प्रदर्शित केली आहेत. त्याची चित्रंही सनसनटी निर्माण करणारीच होती. असा हा बहुआयामी चित्रकार-लेखक १८२५ मध्ये मरण पावला.

**– विजयराज बोधनकर**

vijayrajbodhankar1964@gmail.com

ग्रंथाली

**महाराष्ट्राच्या हीरकमहोत्सवी वाटचालीत विज्ञान, भाषा, साहित्य आणि संस्कृती या क्षेत्रांतील कामगिरीचा मागोवा घेणारे तीन संग्राह्य खंड**





संपादक

**विवेक पाटकर, हेमचंद्र प्रधान**

**मूल्य ७५० रु.**

**सवलतीत ५०० रु.**





संपादन

**रमेश अंधारे**

**मूल्य १५०० रु.**

**सवलतीत १००० रु.**




संपादन


**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**

**डॉ. अजय देशपांडे**

**मूल्य ७५० रु. सवलतीत ५०० रु.**

**तिन्ही खंड एकत्रित १५०० रुपयांत! टपालखर्च १०० रुपये. एका खंडासाठी टपालखर्च ५० रुपये.**

||ग्रंथाली||





# अभिनंदन!

**डॉ. स्मिता दातार लिखित, 'प्रभु अजि गमला'** या पुस्तकाला
सृजन साहित्य संघ, मूर्तिजापूर यांचा
'सृजनप्रतिभा उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार' मिळाला आहे.
आतापर्यंत या पुस्तकाला बारा पुरस्कार लाभले!

डॉ. स्मिता दातार





**अनुपमा उजगरे** यांना
**'ख्रिस्ती स्त्रियांच्या जात्यावरच्या ओव्या'**
या पुस्तकासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे
२०२० या वर्षीचे, श्रीवत्स प्रकाशनाचे 'विपुलश्री' पारितोषिक
प्रदान करण्यात आले!

अनुपमा उजगरे





**अर्जुन व्हटकर** यांच्या **'मुक्या जंगलाची गर्जना'** या
पुस्तकासाठी मराठी साहित्य अकादमी मध्यप्रदेश या संस्थेचा
'कविवर्य भास्कर रामचंद्र तांबे कृती पुरस्कार'–२०१७
योजनेअंतर्गत मिळाला.


अर्जुन व्हटकर





**प्रतिभा बिस्वास** यांच्या
**'पोलीस नभोमंडळातील २१ आयपीएस नक्षत्रं'**
या पुस्तकास 'धनंजय कीर स्मृती पुरस्कार'
प्रदान करण्यात आला.

प्रतिभा बिस्वास






**प्रतिभा सराफ** लिखित **'उमलावे आतुनीच...'**
या कवितासंग्रहाला सृजन साहित्य संघाचा
'सृजनप्रतिभा–२०२२ वाङ्मयीन पुरस्कार'
प्रदान करण्यात आला.


प्रतिभा सराफ

**'ग्रंथाली'च्या या सर्व लेखकांचे**
**ग्रंथाली परिवारातर्फे मन:पूर्वक अभिनंदन!**

## 'बायका झुळझुळत ठेवतात आयुष्याचा पदर' या पुस्तकाचे प्रकाशन

सुप्रसिद्ध कवयित्री संगीता अरबुने यांच्या 'बायका झुळझुळत ठेवतात आयुष्याचा पदर' या ग्रंथाली प्रकाशित कवितासंग्रहाचे प्रकाशन नुकतेच उदगीर येथे भरलेल्या ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात, संमेलनाध्यक्ष भारत सासणे यांच्या हस्ते ग्रंथालीच्या स्टॉलवर संपन्न झाले. अरबुने यांच्या काव्यप्रवासाला शुभेच्छा देतानाच त्यांनी आज या प्रकाशनाच्या निमित्ताने स्त्रियांच्या संदर्भातील एक महत्त्वाचा कवितासंग्रह वाचकांना उपलब्ध होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना सुप्रसिद्ध कवयित्री नीरजा म्हणाल्या, आज स्वतःबरोबरच समाजाच्याही उत्कर्षात एका बाईला एक बाईची साथ महत्त्वाची वाटते ही अतिशय महत्त्वाची बाब संगीता अरबुने यांची कविता निदर्शनास आणून देते. याबरोबरच स्त्रिया आज इतक्या मोकळेपणाने कवितेतून व्यक्त होत




**बायका झुळझुळत ठेवतात आयुष्याचा पदर**

**मूल्य १०० रु.**

**सवलतीत ६० रु.**

आहेत याबद्दल त्यांनी अरबुने यांचे आणि या संग्रहातील त्यांच्या कवितांचेही कौतुक केले.

प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या सुप्रसिद्ध लेखिका मोनिका गजेंद्रगडकर यांनी अरबुने यांची कविता दिवसेंदिवस प्रगल्भ आणि धीट होते आहे असे गौरवोद्गार काढले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात अनुराधा नेरुरकर यांनी 'बायका झुळझळत ठेवतात आयुष्याचा पदर'च्या निमित्ताने ग्रंथालीने एक चांगला संग्रह वाचकांना उपलब्ध करून दिला असल्याचे सांगतानाच ग्रंथाली ही संस्था केवळ एक व्यावसायिक प्रकाशन संस्था नसून साहित्य संवर्धनासाठी उभी राहिलेली एक व्यापक चळवळ आहे, या शब्दात ग्रंथालीचे कौतुक केले.

यातील कवितांचे वाचन अनुराधा नेरुरकर आणि मंदाकिनी पाटील यांनी केले.

या कार्यक्रमाला प्रसिद्ध कवींसह विविध क्षेत्रांतले मान्यवर उपस्थित होते. ●

## देवकी जैन यांच्या स्मरणग्रंथाच्या अनुवादाचे प्रकाशन

सुप्रसिद्ध स्त्रीवादी अर्थशास्त्रज्ञ देवकी जैन यांच्या बहुचर्चित 'द ब्रास नोटबुक' या स्मरणग्रंथाचा अलका गरुड ह्यांनी केलेला अनुवाद 'ग्रंथाली'ने प्रकाशित केला. ज्येष्ठ लेखिका व स्त्रीवादी कार्यकर्त्या डॉ. छाया दातारांच्या अध्यक्षतेखाली, १४ मे रोजी एस.एम. जोशी सभागृहात, हा समारंभ पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अलका गरुड मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, ''देवकी जैन विविध अनुभवांतून जाताना जशा घडल्या, अनेक वेळेस त्यांनी जसे स्वत:ला घडवले, ज्या थेटपणे व धाडसीपणाने अनेक गोष्टींचा उच्चार केला आणि ते सारे ज्या प्रांजळपणे मांडले ते मला अद्भुत वाटले... गप्पा माराव्यात इतक्या साधेपणाने केलेल्या या लेखनाला एक शिस्तबंध आहे, व्यावसायिक-शैक्षणिक निबंधासारखा (academic paper) घोटीवपणा आहे...त्यामुळे अनुवादासाठी ह्या पुस्तकाची निवड करावीशी वाटली.''

त्यानंतर अर्थशास्त्र विचारवंत डॉ. निरंजन राजाध्यक्ष ह्यांनी आपल्याला हे विशेष आवडलेले पुस्तक आहे,




**पितळी नोंदवही**

**आठवणी दाटतात**

**मूल्य ३०० रु.**

**सवलतीत १८० रु.**

असे सांगत, देवकी जैन ह्यांच्या कामाचे महत्त्व अर्थशास्त्रीय आयामातून विशद केले. अर्थशास्त्रीय वातावरणाविषयी गंभीर टिपणीही केली. ज्येष्ठ लेखिका विनया खडपेकर ह्यांनी स्त्रियांच्या आत्मचरित्रांच्या पार्श्वभूमीवर ह्या पुस्तकाची, देवकी जैन ह्यांची वैशिष्ट्ये सांगितली. त्यांच्या लिखाणातला प्रांजळपणा, प्रामाणिकपणा व धाडस ह्या आठवणींना उंची देते असे त्या म्हणाल्या.


डॉ. छाया दातार ह्यांनी देवकी जैन ह्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला व त्यांचे काम मराठीत येते आहे ह्याविषयी आनंद व्यक्त केला. मराठी समाज व स्त्रीजीवनात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना हे पुस्तक तसेच अलका गरुड यांनी केलेले 'पितळी नोंदवही' हे भाषांतर उपयुक्त ठरणार आहे, असे त्या म्हणाल्या.

ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर ह्यांनी ग्रंथालीच्या उपक्रमांची माहिती दिली. संज्ञा कुलकर्णी ह्यांनी केलेल्या सूत्रसंचालनाने व अभिवाचनाने कार्यक्रमाला रंगत आणली. ●

## माधव जोशी लिखित ‘माझी कॉर्पोरेट दिंडी’ पुस्तकाचा आगळा प्रकाशन सोहळा

माधव जोशी लिखित ‘माझी कॉर्पोरेट दिंडी’ या पुस्तकाचे प्रकाशन डोंबिवलीतील टिळकनगर शाळेच्या पटांगणावर १ मे २०२२ रोजी झाले. आरंभी ग्रंथालीतर्फे सुदेश हिंगलासपूरकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. माधव जोशी यांनी मनोगतात आयुष्यात आलेल्या चांगल्या माणसांचा आवर्जून उल्लेख केला. पुस्तकातील काही मजकुराचे अभिवाचन वृशांक कवठेकर व संकेत ओक यांनी केले.

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी, इंडियन एक्स्प्रेसचे CEO जॉर्ज वर्गिस बोलताना म्हणाले, हे पुस्तक सर्वांना केवळ व्यावसायिक क्षेत्रातच नाही तर जीवनातही प्रेरणा देणारे आहे. यामागची जोशींच्या यशामागील आत्मविश्वास, सर्वांविषयी आदर बाळगण्याची वृत्ती, सात्त्विक विनम्रता आणि सहयोगिता ही ठळक कारणे सांगितली.




**माझी कॉर्पोरेट दिंडी**

**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**


ज्येष्ठ पत्रकार सुधीर जोगळेकर यांनी, माधव जोशी यांनी आपल्या डोंबिवलीवरील प्रेमामुळे, शक्य असतानाही मुंबईतील उच्चभ्रू वस्तीत मुक्काम हलवला नाही व परदेशात जाण्याच्या संधीही नाकारल्या याचा कौतुकाने उल्लेख केला.

सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ चंद्रशेखर टिळक यांनी माधव जोशी यांच्यावरील संस्कार व सद्प्रवृत्तीमुळे या पुस्तकाच्या शीर्षकातील ‘दिंडी’ या शब्दाच्या सार्थपणाचे प्रत्यंतर येते असे पुस्तकाचे कौतुक करताना सांगितले. पुस्तकाचे प्रकाशन करताना पुस्तक व्यासपीठावर आगळ्यावेगळ्या अशा दिंडीच्या स्वरूपात वाजतगाजत आणण्यात आले. पारंपरिक तसेच कॉर्पोरेट वेषभूषेतील मुलेमुली हातात टाळ, पताका, तुळशीचे रोप तसेच पडद्यावर तुळशीची प्रतिमा असलेले लॅपटॉप घेऊन

यानंतर ज्येष्ठ पत्रकार उदय निरगुडकर यांनी आपल्या मनोगतामध्ये या पुस्तकाचा मराठीतील पहिले कॉर्पोरेट आत्मचरित्र असा उल्लेख केला. ते म्हणाले, या पुस्तकामध्ये गेल्या सुमारे तीस-चाळीस वर्षांमध्ये समाजामध्ये घडलेल्या स्थित्यंतरांचे प्रभावी दर्शन या पुस्तकात घडते. माधव जोशी यांनी केवळ व्यावसायिक क्षेत्रातच यश मिळवले नाही तर सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रातही ठळक योगदान दिले आहे. त्यामुळे ज्यांना आयुष्यात व्यावसायिक यश मिळवताना तत्त्वनिष्ठा, वास्तववाद व संवेदनशीलता जपायची असेल त्यांनी हे पुस्तक आवर्जून वाचले व इतरांना भेट दिले पाहिजे.

या दिंडीत सामील झाली होती. यावेळी २५हून अधिक ग्रंथ प्रकाशित झालेल्या डोंबिवलीकर लेखकांचा सत्कार करण्यात आला. माधव जोशी यांना आमदार रवींद्र चव्हाण, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, टिळकनगर शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्रीकांत पावगी यांनीही शुभेच्छा दिल्या. तसेच, पुस्तकाच्या निर्मितीमध्ये आणि कार्यक्रमाच्या आयोजनात सहकार्य केलेल्या विविध व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. या रंगतदार कार्यक्रमाच्या आरंभी सुनीला पोतदार आणि शिष्या यांनी नृत्याविष्कारातून गणेशवंदना सादर केली. सूत्रसंचालन सौरभ सोहोनी यांनी केले. ●

---




## पं. शिवानंद पाटील यांच्या अकराव्या स्मृतिदिनी महत्त्वपूर्ण दस्तऐवजाचे पेनड्राइव्ह निवडक संस्थांना प्रदान

अभिजात संगीतातील प्रतिभावंत चतुरस्र गायक पं. शिवानंद पाटील यांचा अकरावा स्मृतिदिन शिवगंधारतर्फे संपन्न झाला.

२३ एप्रिल २०२२ रोजी, ना.ग. आचार्य आणि दा.कृ. मराठे महाविद्यालयाचे सभागृह, चेंबूर येथे संगीताच्या मैफलीने कार्यक्रमाचा आरंभ झाला. त्यात योजना शिवानंद यांचे गायन आणि पं. निरंजन लेले यांचे सोलो ऑर्गनवादन झाले. धनंजय पुराणिक यांनी तबला साथसंगत केली. त्यानंतर गायक पं. शिवानंद पाटील यांच्या ‘दयाघना कमला’ या कन्नड नाट्यसंगीताचा व्हिडिओ दाखवला गेला.

पं. शिवानंद पाटील यांना २००१ साली संगीतातील शोधकार्यासाठी केंद्र सरकारची फेलोशिप मिळाली होती. विषय होता - हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत पर आधारित उत्तर कर्नाटक का नाट्य संगीत! त्यावेळी शोधकार्याचे हिंदीतील २०० पानी हस्तलिखित आणि कन्नड नाट्यसंगीताच्या १३ कॅसेट त्यांनी केंद्र सरकारला सादर केल्या होत्या. त्यांचे ते शोधकार्य (दस्तऐवज व गायन) एका पेनड्राइव्हवर घेऊन निवडक मान्यवर संस्थांना आणि व्यक्तींना शिवगंधारतर्फे प्रदान करण्यात आले.

समारंभाला सन्माननीय अतिथी म्हणून सुप्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. प्रेमानंद रामाणी आवर्जून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते या शोधकार्य दस्तऐवजाचे प्रकाशन झाले.


ग्रंथालीने या दस्तऐवजाचे डिजिटल alignment चे महत्त्वपूर्ण काम केले. तसेच, प्रकाशनासाठी त्यांनी एक छापील प्रतही विशेष भेट म्हणून योजना शिवानंद यांना दिली. ●

## 'धर्मसत्ता की ज्ञानसत्ता' व 'एकला चलो रे' या पुस्तकांचे प्रकाशन


'माणसाने जे-जे निर्माण केले, ते सारे कालांतराने त्याच्याच बोकांडी बसले. या सिद्धांताला देव आणि धर्मदेखील अपवाद नाही. मुळात जगभरातील सगळेच धर्म हे नेहमीच बाहेरच्या समाजव्यवस्थांचे समर्थन करतात. रामायण-महाभारत असो की ख्रिस्ती धर्म असो, सर्वांनीच असे समर्थन केलेले आहे. याचे सुंदर उदाहरण म्हणजे गुलाम गिरी होईल,' असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक रावसाहेब कसबे यांनी केले.

माजी सनदी अधिकारी बी.जी. वाघ यांनी लिहिलेल्या 'एकला चलो रे' आणि 'धर्मसत्ता की ज्ञानसत्ता' या दोन पुस्तकांचे प्रकाशन नुकतेच सावानाच्या मु. शं. औरंगाबादकर सभागृहात झाले. यावेळी ते अध्यक्षस्थानाहून बोलत होते. ज्येष्ठ साहित्यिक, पत्रकार उत्तम कांबळे, माजी आमदार हेमंत टकले, ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर व्यासपीठावर होते.

कसबे पुढे म्हणाले, की 'जगभरातील सर्वच माणसांवर देव आणि धर्मांचा पगडा मोठा आहे. त्याच्या व्याप्तीमुळेच माणूस नेहमीच सुखाचा विचार करण्यापेक्षा दुःखावरच जास्त चिंतन करत राहिला. परिणामी जगात सर्वात जास्त संपत्ती कुठे असेल, तर ती देवळांत आहे. म्हणूनच मुस्लिमांनी आपल्या देशावर आक्रमण केले, तेव्हा सर्वाधिक हल्ले हे देवळांवरच केलेले आढळतात.' कांबळे यांनी 'धर्मसत्ता की ज्ञानसत्ता' या पुस्तकावर भाष्य करताना, 'आजच्या काळात धर्माविषयी असे परखड मत व्यक्त केल्याबद्दल लेखक वाघ आणि हे पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल ग्रंथालीच्याही धाडसाचे कौतुकच केले पाहिजे. याच भूमिकेतून लोकांनी पुढे येऊन अशा ज्वलंत विषयांवर बोलण्याची आज गरज आहे. कारण आजच्या काळात लोकशाहीच तपासायची वेळ आलेली आहे. एकूणच समाजव्यवस्थेवर विचार करण्याची गरज आहे. त्यामुळेच लेखकाने या व्यवस्थेविरुद्ध सावध होण्याची हाक आपल्याला या पुस्तकातून दिली आहे. 'जागते रहो' हा त्यांचा संदेश आपण घेतला पाहिजे,' असे अधोरेखित केले. तसेच, 'एकला चलो रे' या पुस्तकावर भाष्य करताना टकले यांनी, 'हे पुस्तक म्हणजे जीवन समजावून सांगणारे निसर्गचिंतन' असल्याचे सांगितले. ज्योती स्टोअर्सचे संचालक वसंतराव खैरनार यांनी सूत्रसंचालन केले. हिंगलासपूरकर यांनी ग्रंथालीच्या उपक्रमांची माहिती दिली. वाघ यांनी प्रास्ताविक केले. विविध क्षेत्रांतील मान्यवर यावेळी उपस्थित होते. ●




**धर्मसत्ता की ज्ञानसत्ता**
**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २०० रु.**




**एकला चलो रे**
**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत ०० रु.**

---

## 'सकेडा' या पुस्तकाचे प्रकाशन

'सकेडा'! या कवितासंग्रहाचे प्रकाशन नुकतेच ग्रंथालीच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवरून झाले. डॉ. केदार हर्डीकर लिखित या कवितासंग्रहाच्या प्रकाशनासाठी अभिनेत्री डॉ. निशिगंधा वाड या मान्यवर वक्त्या होत्या व ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांच्या हस्ते या कवितासंग्रहाचे प्रकाशन झाले. सुदेश हिंगलासपूरकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

अमेरिकास्थित डॉ. केदार हर्डीकर यांनी अमेरिकेत आढळणाऱ्या सकेडा नावाच्या कीटकानं कशा पद्धतीनं त्यांना प्रेरणा दिली हे संगितलं. सकेडा कशा पद्धतीनं अनेक वर्षं भूमिगत राहतो आणि मग जमिनीवर येतो याबद्दल सांगितलं त्याचप्रमाणे कुब्लर रॉस मॉडेल म्हणजे नक्की काय आहे याविषयीचीदेखील माहिती त्यांनी दिली. या दोन्हीचा आधार घेऊन त्यांच्या कविता कशा फुलल्या हे त्यांनी मनोगतात सांगितलं आणि 'विराहातून प्रेमाकडे' ही संकल्पनादेखील सांगितली. अभिनेत्री लेखिका डॉ. निशिगंधा वाड यांनी या कवितासंग्रहाचं स्वागत केलं आणि जिवंत जीवनानुभव देणारा, सकारात्मक वृत्तीकडे घेऊन जाणारा हा कवितासंग्रह आहे असं त्या म्हणाल्या. सकेडा, डार्विन अशा काही कवितांचा उल्लेख केला.

अरुण म्हात्रे यांनी सकेडा आणि कुब्लर रॉस मोडेल याचा उल्लेख करत कविता कशा तरल पद्धतीने आलेल्या आहेत  हे सांगितलं. त्यांनी त्यातील काही निवडक कवितांच्या ओळी म्हणून दाखवल्या

डॉ. मृण्मयी भजक यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर समीर कदम यांनी संकलनाची तांत्रिक बाजू सांभाळली. ●





**सकेडा**
**मूल्य १५० रु.  सवलतीत १०० रु.**

## ‘अरिंदम’ या लेखसंग्रहाचे प्रकाशन

ग्रंथालीतर्फे ‘अरिंदम’ ह्या लेखसंग्रहाचे प्रकाशन, ज्येष्ठ लेखिका-कवयित्री नीरजा आणि प्रसिद्ध दिग्दर्शक-अभिनेते संदेश कुलकर्णी ह्यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले.

‘अरिंदम’ला प्रसिद्ध साहित्यिक अरुण शेवते यांचे ‘ब्लर्ब’ लाभले आहे.

प्रारंभी ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर ह्यांनी ग्रंथालीच्या वाटचालीचा आढावा घेतला. मान्यवरांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाल्यानंतर, लेखिका डॉ. निर्मोही फडके ह्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी ‘अरिंदम’च्या निर्मितीचा प्रवास थोडक्यात मांडला. तसेच, ललित लेखनाबरोबरच समीक्षात्मक लेखनाचा गांभीर्याने अभ्यास करणे का आवश्यक आहे, याबद्दलही आपले मत व्यक्त केले.




**अरिंदम**
**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

प्रा. डॉ. वैशाली दाबके ह्यांनी ‘अरिंदम’मधल्या एका लेखाचे उत्तम अभिवाचन करत ‘अरिंदम’बद्दल सर्वांची उत्सुकता वाढवली.

दिग्दर्शक-अभिनेते आणि व्यासंगी वाचक संदेश कुलकर्णी ह्यांनी त्यांना आवडलेल्या ‘अरिंदम’मधील निवडक मजकुराचे वाचन केले. आपल्या खुमासदार शैलीत लेखांबद्दल आणि त्या अनुषंगाने इतर काही विषयांबद्दल त्यांनी आपले विचार खुसखुशीत पद्धतीने मांडले.

‘निर्मोहीच्या लेखाची सुरुवात जिथे होते, तिथे शेवटी ती आपल्याला पुन्हा आणते, पण त्यादरम्यान ती वाचकाला एक वेगवान प्रवास करून आणते. तिला जाणवलेले स्वतः समजून घेत ते इतरांनाही सांगताना तिची कीर्तनकारासारखी भूमिका मला विशेष भावली. तिची स्वतःची एक स्वतंत्र लय असलेली शैली आहे. एखाद्या स्वरमैफलीसारखे तिचे लेखन आहे. एखाद्या गायकाने बंदिश सादर करावी तशी आवर्तने तिच्या लेखनात दिसतात.

तिच्या शब्दांच्या अरण्यात आपण हरवून जाताना ती आपल्या डोळ्यांमध्ये अंजनही घालते.’ अशा शब्दांमध्ये ज्येष्ठ कवयित्री, लेखिका, समीक्षक नीरजा ह्यांनी डॉ. निर्मोही फडके ह्यांच्या लेखनाविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या.

‘लेखन-कलेतून मने जिंकणारे साहित्यिक-कलाकार हे खरे ‘अरिंदम’ - सर्वांना जिंकून घेणारे - आहेत.’ असे महत्त्वपूर्ण प्रतिपादन नीरजा ह्यांनी ह्यावेळी केले.

अस्मिता पांडे ह्यांनी आपल्या नेमक्या वक्तव्यांसह कार्यक्रमात सुसूत्रता ठेवली.


●

---

## ‘जिवलग जिवाचे’ पुस्तकाचे प्रकाशन

‘जिवलग जिवाचे’ या नंदा भटमुळे लिखित कादंबरीचे १५ मे २०२२ रोजी डिजिटल प्रकाशन झाले. या कार्यक्रमाची सुरुवात निधी भटमुळे यांच्या ईशस्तवनाने झाली. सुदेश हिंगलासपूरकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सचिन भटमुळे यांनी कादंबरी तयार होत असताना लेखिकेचा चार वर्षांचा चिकाटीचा प्रवास सांगितला. कादंबरीतील पात्रांच्या भावुक संवादांबद्दल सांगितले.

लेखिका नंदा भटमुळे यांनी कादंबरी लिहिण्याआधी शेकडो कादंबऱ्या वाचल्याचे नमूद केले. तसेच, या कादंबरीची कौटुंबिक पार्शवभूमी सांगितली, मुख्य पाच पात्रांबद्दल थोडक्यात माहिती दिली. लेखक, कादंबरीकार डॉ. प्रकाश लोथे म्हणाले, कादंबरी लिहिणे हे मॅरेथॉनसारखे असते. या कादंबरीत तीन पिढ्या आहेत. आणि पात्रांच्या अंतरात्म्यातील गोडवा वाचकाला जाणवतो.




**जिवलग जिवाचे**
**मूल्य ६०० रु.**
**सवलतीत ३५० रु.**

ज्येष्ठ संपादक, विचारवंत दिनकर गांगल म्हणाले, कादंबरीची रचना जशी महत्त्वपूर्ण आहे, तसे आशयसूत्रही महत्त्वाचे आहे, ते म्हणजे ‘यथा काष्ठं च काष्ठं च’ लाकडाचे ओंडके जसे एकत्र येतात, वेगळे होतात तशीच माणसेही भेटतात आणि वेगळी होतात, पण या कादंबरीत माणसे तुटत नाहीत तर एकत्र येतात, आणि या काळात हे एकत्र येणे फार महत्त्वाचे आहे. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी सचिन गोस्वामी यांनी मुखपृष्ठाचं कौतुक केले आणि मुखपृष्ठ या कादंबरीला कसं साजेसं आहे, हे सांगितले. लेखिका नंदा भटमुळे यांची सकारात्मकता, जीवनाकडे निर्मळ, निर्व्याजपणे पाहण्याचा दृष्टिकोन कादंबरीत दिसतो. सहज, सोप्या, प्रभावी मांडणीमुळे वाचक कादंबरीशी एकरूप होतो, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मृण्मयी भजक, तर संकलन समीर कदम यांनी केले.

●

## ‘कथा जेनीची : तुम्हा–आम्हा सर्वांची’ पुस्तकाचे प्रकाशन

फ्रान्सिस डिमेलो लिखित, सुजाण पालकत्वावर आधारित ‘कथा जेनीची : तुम्हा–आम्हा सर्वांची’ या पुस्तकाचे प्रकाशन २२ मे २०२० रोजी फादर डॉ. रॉबर्ट डिसोजा यांच्या अध्यक्षतेखाली विरार येथील कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कूलच्या वेरोनिका हॉलमध्ये झाले. कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार आणि लेखिका प्रतिमा जोशी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या.




**कथा जेनीची**
**तुम्हा–आम्हा सर्वांची**
**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

डिमेलोसरांना पाठवलेल्या शुभसंदेशात फादर दिब्रिटो यांनी विद्यार्थिकल्याणाचे वेध लागलेला गुरू असे त्यांचे वर्णन केले. ते पुढे लिहितात की सरांकडे विचार आहेत आणि शैलीही आहे त्यामुळे चांगले विषय सरांच्या जणू शोधात असतात. बदलत्या परिस्थितीमुळे आणि कुटुंबाचा आकार लहान झाल्यामुळे सुजाण पालकत्व हा आज एक अभ्यासाचा आणि चिंतेचा विषय बनला आहे. डिमेलो यांनी अतिशय रंजक आणि हळुवारपणे हा विषय हाताळला आहे.

या पुस्तकातील काही भागाचे अभिवाचन प्राध्यापिका रुबिना यांनी केले.

फादर रॉबर्ट डिसोजा यांनी आपल्या भाषणात पुस्तकाचे मार्मिक विश्लेषण केले. त्यातील ठळक प्रसंगांचे वर्णन करून त्यातून पालकांनी काय बोध घ्यावा त्याचे मार्गदर्शन केले.

ज्येष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी या डिमेलोसरांच्या आरएम भट शाळेतील विद्यार्थिनी. त्यांनी आपल्या उत्स्फूर्त आणि खुसखुशीत भाषणात शिक्षक म्हणून त्यांच्या मनात ठसलेल्या सरांच्या प्रतिमेचे वर्णन केले. आपल्या सौम्य, शांत आणि हसतमुख व्यक्तिमत्त्वाने विद्यार्थ्यांमध्ये चैतन्य निर्माण करणाऱ्या सरांमुळेच आज आम्ही विद्यार्थी आयुष्यात या उंचीवर पोहोचलो आहोत असे त्या मोठ्या अभिमानाने म्हणाल्या.

विद्यार्थी शिरोबिंदू आणि शिक्षक व पालक हे पायाकडील बिंदू असलेल्या त्रिकोणातील सुजाण पालकाचे प्रतिनिधित्व करणारे रॉबर्ट लोबो यांनी आपल्या छोटेखानी परंतु खुसखुशीत शैलीत केलेल्या भाषणात सरांचे पालकांबरोबरील घनिष्ठ संबंध आणि त्यातून होणारा मुलांचा व्यक्तिमत्त्व–विकास याची काही उदाहरणे दिली.

लेखकाचे मनोगत प्रेक्षकांपर्यंत पोहोचावे आणि विद्यार्थी कृतज्ञतासोहळा या कार्यक्रमाची संकल्पना समजावी म्हणून सरांच्या भाषणाऐवजी त्यांची अनौपचारिक गप्पांच्या स्वरूपात मुलाखत घेतली गेली. त्यांचे सहकारी शिक्षक आणि परममित्र मिलिंद बेडेकर यांनी त्यांना नेमके प्रश्न विचारून मुलाखत प्रवाही ठेवली. शिक्षक म्हणून कृतार्थता वाटणाऱ्या क्षणांचे दाखले सरांनी दिले. शिक्षक या पवित्र पेशात त्यांना आणण्यास नियतीचा वाटा किती मोठा होता हे ऐकताना प्रेक्षक मंत्रमुग्ध होऊन गेले.

गोखले एज्युकेशन सोसायटीच्या आरएम भट हायस्कूलमधील ‘गुरुदक्षिणा माजी विद्यार्थिसंघा’ने सगळ्या विद्यार्थ्यांच्या वतीने सरांना एक मानपत्र अर्पण केले. या प्रसंगी त्यांच्या पत्नी लुईझाना मॅडमचाही सत्कार करण्यात आला.

शेवटी विविध उपक्रमांत सक्रिय असलेल्या सरांच्या जुन्या नव्या फोटोंची एक एव्ही दाखवण्यात आली. ती त्यांची विद्यार्थिनी स्वप्न देशपांडे यांनी तयार केला होती.

मुंबईच्या कानाकोपऱ्यातून त्यांचे जवळपास ९० विद्यार्थी या हृद्य कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अतिशय नेटके सूत्रसंचालन लेखिका, प्रवास–वर्णनकार आणि सरांची विद्यार्थिनी मेधा आलकरी यांनी केले. ●

---

## बा. ग. केसकर यांच्या ‘राजा कालस्य कारणम्’ कादंबरीचे प्रकाशन

बा.ग. केसकर लिखित व ग्रंथाली प्रकाशित राजकीय कादंबरी ‘राजा कालस्य कारणम्’चे प्रकाशन निवेदक सुधीर गाडगीळ यांच्या हस्ते करण्यात आले. पुणे श्रमिक पत्रकार संघ येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमप्रसंगी ग्रंथालीच्या धनश्री धारप, लेखक बा.ग. केसकर अभिनेते उदय लागू, पत्रकार मनोहर सप्रे, दत्तात्रय तापकीर आदी वक्ते उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना सुधीर गाडगीळ यांनी सत्ताधाऱ्यांचे निर्णय जनतेला भोगावे लागतात. चांगल्या आर्थिक स्वप्नांची लावलेली वाट यात चित्रित आहे. ग्रामीण





जीवनाचे यथार्थ दर्शन आहे, असे प्रतिपादन केले. लेखक बा.ग. केसकर यांनी महाराष्ट्रात राहणाऱ्यांनी मराठी भाषेचा आग्रह धरला पाहिजे, मराठीत बोलले पाहिजे असे सांगितले. ●

---

**राजा कालस्य कारणम्**
**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

## ‘वादळवाट’चे प्रकाशन




उस्मानाबाद येथे २९ एप्रिल २०२२ रोजी एम.डी. देशमुख लिखित ‘वादळवाट’ पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक, प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे व ज्येष्ठ साहित्यिक इंद्रजित भालेराव यांच्या हस्ते झाले.


यावेळी लेखकाने मनोगतात, शिक्षणपंढरीचा वारकरी म्हणून कर्मयोग निभावताना आयुष्यातील विसाव्याच्या दिवसात ही साहित्यकृती वाचकांच्या हवाली, ग्रंथालीच्या माध्यमातून पोचवता आली, याबद्दल आभार मानले.

ज्येष्ठ साहित्यिक भालेराव यांनी समीक्षणात्मक भाष्य करताना आचार्य अत्रे, आनंद यादव, चंद्रकात नलगे यांच्या लेखनकौशल्याची आठवण झाल्याचे तसेच लेखक उस्मानाबादमधील शैक्षणिक परिवर्तनाचे जनक म्हणून ओळखले जातात, हेदेखील ह्या साहित्यकृतीतून ज्ञात झाल्याचे म्हटले.

ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ. पाटणे यांनी या साहित्यकृतीबद्दल गौरवोद्‌गार व्यक्त केले. ‘वादळवाट’ हे सुखदु:खाच्या अक्षरांनी बांधलेले मनोहर जीवनशिल्प आहे. ते समाजस्पर्शी आणि सत्यस्पर्शी वास्तवाचे मोहक आणि दाहक दर्शन घडवते. संघर्षातून उत्कर्ष साधलेल्या ज्ञानसाधकाची वादळवाट ही यथोगाथा आहे. ती प्रत्येकाने संग्रही ठेवावीच, अशी भावना व्यक्त केली. ●

**वादळवाट**
**मूल्य ४०० रु. सवलतीत २४० रु.**

## वैचारिक हस्तक्षेप करणारा ‘विश्लेषण’ हा महत्त्वाचा ग्रंथ




समकालीन विविध घटना-घडामोडींवर परखडपणे मत नोंदवणारे पी. विठ्ठल हे नव्या पिढीतील महत्त्वाचे कवी आणि अभ्यासक आहेत. ‘विश्लेषण’ हा त्यांचा ग्रंथ वैचारिक हस्तक्षेप करणारा एक महत्त्वाचा ग्रंथ असून; अशा वैचारिक लेखनाची मराठी साहित्याला आणि समाजाला नितांत गरज आहे. त्यामुळे वाचकांनी या पुस्तकाचे उत्स्फूर्तपणे स्वागत करायला हवे, असे प्रतिपादन ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कोकणी लेखक दामोदर मावजो यांनी केले. डॉ. पी. विठ्ठल यांच्या, ग्रंथालीने प्रसिद्ध केलेल्या, ‘विश्लेषण’ या लेखसंग्रहाचे उदगीर येथे भरलेल्या ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात प्रकाशन करताना ते बोलत होते. यावेळी कवयित्री नीरजाही उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना नीरजा म्हणाल्या, ‘आज जे काही समाजात घडत आहे, त्यात लेखकाची नेमकी काय भूमिका असावी,’ या संदर्भात पी. विठ्ठल यांनी पुस्तकात परखड भाष्य केले आहे. भूमिका घेणाऱ्या सम ीक्षकाच्या पुस्तकाचे; भूमिका घेणाऱ्या लेखकाच्या हस्ते प्रकाशन व्हावे, आणि तेही साहित्यसंमेलनात व्हावे, ही गोष्ट मला महत्त्वाची वाटते, असे मत नीरजा यांनी व्यक्त केले.

पुस्तकाचे लेखक पी. विठ्ठल यांनी दामोदर मावजो यांच्यासारख्या ज्येष्ठ लेखकाच्या हातून आपल्या कलाकृतीचे प्रकाशन होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. ●

**विश्लेषण**
**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

## ‘वसंतदादा’ या पुस्तकाचे प्रकाशन




ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर संपादित ‘वसंतदादा’ या पुस्तकाचे प्रकाशन १३ मे २०२२ रोजी सांगली येथे मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयात झाले. ‘ग्रंथाली’ प्रकाशित या पुस्तकाचे प्रकाशन भारती अभिमत विद्यापीठ, पुणे कुलगुरू प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते व शिवाजी विद्यापीठाच्या कै. श्रीमती शारदाबाई गोविंदबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील यांच्या उपस्थितीत पार पडले.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्रा. डॉ. साळुंखे म्हणाले, ‘स्वातंत्र्यलढ्यात हिंसक आंदोलनाचा पुरस्कार करणारे वसंतदादा ते स्वातंत्र्योत्तर भारताच्या वाटचालीत विधायक राजकारणाला पुरस्कार करणारे वसंतदादा, ही भारतीय लोकशाहीतील लोकनायकाची रूपे आहेत. पुढे ते कारखाने, शिक्षणसंस्था उभारणीसह विधायक राजकारणाचे प्रतिमान उभे करतात. दादांमध्ये हा बदल कसा घडला, हे अभ्यासकांनी अभ्यासायला हवे. कार्यकर्त्यांचे मोहोळ उभे करणाऱ्या दादांनी लोकांचा प्रचंड विश्वास निर्माण केला. एकाद्या लोकनायकाचे मोठे होणे, अशा विश्वासात असते.’ पुस्तकातील विविध लेखांवरही त्यांनी अभ्यासपूर्ण मतप्रदर्शन केले. ●

**वसंतदादा**
**मूल्य ३५० रु. सवलतीत २०० रु.**

## ‘पाऊसपर्ण’ प्रकाशनसोहळा

‘पाऊसपर्ण’ ही पावसाची कविता आहे. यात पाऊस अनेक रूपांत भेटतो. ही कविता वाचताना वाचकांना नक्कीच आनंद देईल. पाऊसपर्णला हार्दिक शुभेच्छा!


– भारत सासणे

अध्यक्ष अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, उदगीर २०२२

‘पाऊसपर्ण’ हा मराठी कवितेतील एक अभिनव प्रयोग ठरावा. पावसाच्या ह्या कविता मनाला भावून जातात व एक सुखद अनुभव देतात. ह्या कवितेला माझ्या हार्दिक शुभेच्छा!!

– आबा महाजन

साहित्य अकादमी पुरस्कार २०२० प्राप्त बालसाहित्यिक




‘पाऊसपर्ण’ या ग्रंथाली प्रकाशित जितेंद्र कुवर यांच्या तिसऱ्या काव्यसंग्रहाचे नुकतेच प्रकाशन झाले. त्यावेळी हे मान्यवर बोलत होते. उदगीर येथील साहित्य संमेलनात पार पडलेल्या या प्रकाशन समारंभास विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.


– जितेंद्र कुवर

**पाऊसपर्ण**

**मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**

## ‘कथा मेपल कळ्यांच्या’ प्रकाशनसोहळा

रेवती भागवत लिखित ‘कथा मेपल कळ्यांच्या’ हा कथासंग्रह २८ मे २०२२ रोजी, 'Granthali watch' या यूट्यूब वाहिनीवर प्रकाशित झाला. पाश्चात्त्य साहित्याचे गाढे अभ्यासक आणि श्रीखंडे कन्सल्टंट प्रा.लि.चे व्यवस्थापकीय संचालक राजीव श्रीखंडे आणि निर्माता-दिग्दर्शक-अभिनेते अजित भुरे या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून आमंत्रित होते.




यावेळी अजित भुरे यांनी असे मत मांडले, की तथाकथित लेखक नसलेल्या लेखिकेने लिहिलेले साहित्य हे महत्त्वाचे वाटते. कारण त्यांच्या लेखनाची मांडणी साचेबद्ध दिशेने न जाता नवीन वाट चोखाळते. घरात सम ाजसेवेच्या विचारांचा वारसा असलेल्या रेवती भागवत यांनी याच क्षेत्रात कार्यरत व्हावे हे अपेक्षितच होते असे नमूद करून त्यांनी अत्यंत महत्त्वाचा मुद्दा उद्धृत केला. ते म्हणाले, ‘बालसंरक्षण’ या संकल्पनेत केवळ अन्न-वस्त्र-निवारा एवढ्याच गोष्टी येत नाहीत तर त्यापलीकडे जाऊन बालकांचे भावविश्व जाणणे, त्यांचे चांगल्या प्रकारे पालनपोषण करणे या बाबींचादेखील समावेश होतो, ही बाब या कथासंग्रहाने अधोरेखित केली आहे. याशिवाय या समस्या सोडवताना लेखिकेची द्विधा मनस्थिती जाणवत राहते याचा उल्लेख करून ते म्हणाले की ‘‘समाजशास्त्राचा अभ्यास असला तरी अशा कुटुंबाची भविष्यातील मानसिकता काय असेल याची भारतीय चुटपूट लेखिकेच्या मनाला लागून राहते आणि काही काही समस्यांची उकल करण्यासाठी मानसशास्त्राचा आधार घेणे तिला गरजेचे ठरते हे या कथांचे वेगळेपण होय.’’

या समारंभासाठी आमंत्रित मुख्य वक्ते राजीव श्रीखंडे म्हणाले, की ‘‘एका प्रगत देशातील अत्यंत जटिल समस्येवरचं हे अत्यंत उद्बोधक पुस्तक असून ‘बालशोषण’ हे या कथांमधील समान दुवा आहे. सर्वस्वी अनोळखी असलेल्या माणसांविषयी आपल्या मनात अनुकंपा निर्माण करण्यात हे पुस्तक यशस्वी ठरले आहे. व्यसनाधीन पालक आणि त्यांच्या मुलांची असहाय्यता वाचकांना व्याकूळ करते आणि वाचक त्यात नकळत गुंतले जातात. समाजशास्त्रीय-मानसशास्त्रीय चिकित्सा संयत शब्दात मांडण्याची लेखिकेची शैली विलक्षण आहे.’’

पेशाने व्यावसायिक समाजसेविका असणाऱ्या लेखिका रेवती भागवत आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, की पूर्वापार चालत आलेली गरिबी आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या या कॅनडातही तीव्र आहेत. स्थलांतरित माणसे, युद्धामुळे मातृभूमी सोडून सहकुटुंब घेऊन निर्वासित म्हणून राहणारी माणसे, त्यातून दारिद्र्याच्या खाईत अडकलेल्या वंचित समाजाच्या या कथांमधील समस्यांचे स्वरूप सारखे असले तरी त्या समस्या सोडवण्याची प्रक्रिया मात्र खूप भिन्न आहे. कॅनडासारख्या देशाला भेडसावणारी व्यसनाधीनतेची समस्या, व्यामिश्र कुटुंबपद्धती, त्यामुळे निर्माण झालेली गुंतागुंतीची कौटुंबिक रचना यांची भारतीयांना ओळख व्हावी. अशा समस्यांकडे पाहताना सकारात्मक मानसिकतेचे महत्त्व अधोरेखित व्हावे हा उद्देश या कथा लिहिण्यामागचा आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी रसिक वाचक-प्रेक्षकांचे स्वागत करून ग्रंथालीच्या विविध उपक्रमांची माहिती दिली तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथाली विश्वस्त आणि संपादक डॉ. लतिका भानुशाली यांनी केले. ●

**कथा मेपल कळ्यांच्या**

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**





# ग्रंथपान

**चांगदेव काळे**
**संपर्क : ९८६९२०७४०३**

## अचिंत अध्याय

**उषा परब**




**अध्याय एक आत्मकथेतला प्राणिसर्गाचा**

*''पुशी मांजर असली म्हणून काय झालं. आईपणाच्या भावना आणि शारीरिक वेदना तर त्याच असतील. काही भावना, वेदना कुणीही जिवंत प्राण्यासाठी सारख्याच असतील की! माणसं काय नि प्राणी काय! सांगायला आणि समजून घ्यायला शब्दांचीच भाषा हवी असं थोडीच आहे! डोळे, स्पर्श, देहबोली खूप काही बोलत असते. समजून घेणं महत्त्वाचं. त्यासाठी मनाचे डोळे, मनाचे कान, मनाची त्वचा संवेदनशील असली म्हणजे झालं.''*

पक्षी-प्राणी पाळणे, सांभाळणे, त्यांच्यावर प्रेम करणे, त्यांना जीव लावणे, याला आवड छंद, वेड या सदरात टाकलेले आपण पाहतो. हे सदर फावल्या वेळासाठी राखीव समजले जात असल्याने त्याची कौतुकापुरती जागा असते. परंतु 'सगळेच' याला काही जण अपवाद असतात. त्यांचे हे वेड, छंद जिव्हाळ्याचे, आत्मीयतेने, कुटुंबातील स्नेहाचे, आपसातल्या नात्याचे बंध सांगणारे असतात. अगदी जिवापाड म्हणता येतील असे. याचे दर्शन घडते ते 'अचिंत अध्याय' या कादंबरीत.

ओमी हा या कादंबरीचा नायक नाही, तरी तो येथे केंद्रस्थानी आहे. त्याने जोपासलेला प्राणिप्रेमाचा अनुबंध म्हणजे ही कादंबरी. या कादंबरीत नायक-नायिकेच्या भूमिकेत आहेत 'बानू', 'सारा', 'पुशी', 'मंकी' व 'मिट्टू' ही सगळी प्राणी मंडळी 'मांजर' या गटातील आहेत. गावठी ते पर्शियन. 'मांजर' काय सगळीकडेच असतात. न पाळली तरी पाळल्यासारखीच घरात माणसांच्या भोवती, पायात घुटमळत असतात, हा साधारण सगळ्यांचा अनुभव त्यामुळे त्यांच्या एकूण वागण्याकडे दुर्लक्ष वा अलिप्तता दिसून येते. कादंबरीत मात्र तसे अभावानेही आढळत नाही. ही प्राणिमंडळी घरातील सदस्यच नव्हे तर लेखिकेची बाळे म्हणून वावरतात. ती कुशीत झोपतात. गळ्यात हात टाकून लेकरासारखी. त्यांच्यासाठी सगळी व्यवस्था केली जाते, बाळांची काळजी घेतली जाते तशी. प्राण्यांना सांभाळताना त्यांचे वयानुसार होत जाणारे बदल लक्षात घ्यावे लागतात. त्याला अनुसरून त्यांचे संगोपन होईल याची काळजी घ्यावी लागते. त्यासाठी त्याचे मानसशास्त्र समजले तर वागणे सोपे होते. अर्थात त्यासाठी निरीक्षण, आपलेपणा आणि मानसिक प्रौढपणाची आवश्यकता असते. प्राणी प्रत्येक वेळी आपल्या अपेक्षेप्रमाणे वागले यालाही अनेकदा छंद बसतो. अशावेळी तर त्याच्याशी जुळवून घेणे आणखी कठीण होते, परीक्षा घेतल्यासारखे. सारा आणि पुशी या दोघींचा अनुभव हा बाईपणाचा अनुभव आहे आणि तो एक बाईच समजू शकते. हे समजणे लेखिकेने खूप आपलेपणाने, ममतेने समजून घेतलेले आहे. वयात आल्यापासून प्रसूतीपर्यंतचा प्रवास डोळ्यांसमोर पुढे सरकत असताना लेखिकेचे भावविश्व त्यांच्याशी एकरूप झालेले दिसते. इतके की मुलींसाठी नवरा शोधावा, बाळंतपणासाठी आलेल्या मुलीसाठी आईने सगळी काळजी घ्यावी.

बानू, सारा, पुशी या तिन्ही मांजरीचे घरात येणे हे वेगवेगळ्या टप्प्यावरचे आहे, तसे त्यांचे वागणेही. 'पुशी' ही त्यातली वेगळीच. तुसडी. तिचे विश्व स्वतःचे. तिच्यासाठी जोडीदार म्हणून 'मफी' नावाचा तरणाबांड बोका घरात पाळला, पण त्याच्याशी सलगी न करता स्वतःच कामज्वराने स्वतःला छळत राहिली. याविषयी लेखिका लिहितात, 'एवढा तरणाबांड मफी घरात असताना तिनं का असे स्वतःचे हाल करून घ्यावे! तिरपागडंच सगळं! नि काय! अचिंत वाटावं असंच.'

'मफी' घरातून नाहीसा झाला, त्याचा शोध घेण्यासाठी केलेला आटापिटा, मिट्टू हे लहान पिल्लू घरात रुळेना तेव्हा त्याला त्याच्या आईकडे रवाना करण्यासाठी, त्याच्या आईचा शोध घेण्यासाठी केलेला आटापिटा, ही माणूसपणाची दया आणि तळमळीची उत्कट भावनिक आणि संवेदनशील उदाहरणे होत.

दरेकरांनी दिलेले लव्हबर्ड, टाकीतील मासे, जखमी झालेला कावळा व त्यावरचे उपचार, हे यातले आणखी टप्पे. त्यामुळे घरात सातत्याने पक्षी आणि प्राणी यांचा वावर त्यांच्या मृत्यूचे प्रसंग, वियोगाचे प्रसंग, आगमनाने होणारा आनंद, वियोगाचे दुःख, यासोबतच प्राण्यांची भावभावनाशी जुळलेल्या भावभावना, हे सारेच विलक्षण आहे. या सगळ्यांच्या अनुभवाचा, केलेल्या निरीक्षणाचा लेखाजोखा म्हणजे ही कादंबरी. वास्तविक लेखिकेने मनोगतात नमूद केल्याप्रमाणे हे त्यांचे जिवंत अनुभव आहेत, त्यामुळे ही कादंबरी न ठरता लेखिकेच्या आयुष्यपर्वातला हा एक अध्याय आहे असेच म्हणावे लागेल.

लेखिका उषा परब यांची 'कुसवा'नंतरची ही दुसरी कादंबरी. ही कादंबरी आत्मनिवेदनाने पुढे जाते. तिच्यातली प्रसन्न शैली ही संवादी आहे. आपल्याशी बसून त्या आपले अनुभव मनोगतासारखे व्यक्त करत आहेत, असेच वाटत राहते. त्यामुळे आपल्याला ही कादंबरी थेट भिडते, भावते. संवादाची भाषा व्यक्तिपरत्वे स्वतंत्र असल्याने, त्या त्या भाषेचा गोडवा आणि प्रादेशिकताही ठळकपणे जाणवत राहते. सुंदर निसर्गवर्णनातून संपूर्ण कोकण उभा राहतो. या सगळ्यात भावतो तो सहजपणा. शब्दांवरील हुकमत आणि चपखल उपमांचा वापर, जो भावविश्वाइतकाच खोल आणि समृद्ध आहे. 'सारा आता पूर्वीची भित्री अन् आज्ञाधारक बाला उरली नव्हती. नसती बला झाली होती, नि कायतर!' 'तिचं आईपण जितकं खरं तितकंच तिचं बाईपणही खरं होतं, नाही का!' 'आशेला कुठे असतो शंकेचा विटाळ!' अशा सुंदर सहज वाक्यांचा गोफ एक उत्कट अनुभव देत राहतो.


खूप बोलके डोळे मुखपृष्ठासाठी सतीश भावसार यांनी योजलेले आहेत.

**मूल्य ३०० रुपये सवलतीत १८० रुपये**

## ग्रंथपान

**कदाचित...**

**वैशाली फाटक–काटकर**




**वेगळेपणाच्या वाटेवरील आश्वासक कथा**

*''का केलंस असं? मला पुन्हा अनाथाश्रमाच्या दाराशी उभं करण्याचं प्रदर्शन मांडून काय मिळवलंस? तुला माझ्यात इंटरेस्ट नव्हता, तर का माझ्या एवढ्या जवळ येऊन माझ्या आयुष्याचा भाग व्हायचा प्रयत्न केलास? माझ्या भावनांशी खेळताना काही चुकीचं करत असल्याचा विचारसुद्धा तुझ्या मनाला शिवला नाही? आता एकच कर. यामिनीचा मृत्यू खरंच अपघाती होता की बळी गेला तिचा?'*

कथालेखनात आपले स्थान निर्माण करायचे असेल तर त्यासाठी लेखकाला स्वत:ला समृद्ध असावे लागते. आपण जे लिहितो, त्यात आपल्याला जे सांगायचे आहे ते सांगताना त्याच्या मूल्यांवर अधोरेखित करायचे आहे हे अगोदर मनाशी पक्के असावे लागते. ती बैठक पक्की असेल तर कथेत काही वेगळेपण दिसून येते. लेखकाला समाधान देऊन जाते. वाचकालाही ती कथा आपली आहे याचा अनुभव देते. अलीकडील काळात बरेच कथालेखक त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहेत. त्यात वैशाली फाटक–काटकर यांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल.

'कदाचित...' हा वैशाली फाटक–काटकर यांचा दुसरा कथासंग्रह. या संग्रहात एकूण पंधरा लघुकथा आहेत. प्रत्येक कथा स्वतंत्र अस्तित्व घेऊन आलेली आहे. 'कदाचित कस्यचित' या कथेच्या शीर्षकात गूढ सामावलेले दिसते. तेच या संग्रहाच्या शीर्षकासाठी योजलेले आहे. आयुष्य सरळ एका रेषेत जात नाही, त्याला अनेक वळणाचा वेढा उकलावा लागाते. काट्याकुट्यांना तुडवताना रक्तबंबाळ व्हावे लागते. पुढच्या पावलावर काय वाढून ठेवलेले असेल याचा अंदाज तर खूपच कठीण. तरीही चालणे संपलेले नसते. अडीअडचणींवर मात तर करावी लागतेच परंतु अनेकदा तडजोडींचा स्वीकार करावा लागतो. ही तडजोड आयुष्याला आकार देते. तरी तिचा विसर कधी पडत नाही. 'कदाचित कस्यचित' या कथेत आलेल्या वैवाहिक तडजोडीला लेखिकेने खूप हळुवारपणे उकल करून मांडलेले आहे. शरद, स्नेहलता यांच्या वैवाहिक आयुष्याला व्यापणारे एक गूढ आहे, जे लेखिकेने तरलपणे शेवटापर्यंत टिकवून ठेवलेले आहे आणि त्यातूनच काही अपेक्षित प्रश्नांची मांडणी करून त्यांच्या उत्तरात वेगळी कथा आकाराला आली असती का, याची शक्यता त्या वाचकांच्या विवेकावर सोपवतात.

'जस्ट फ्रेण्ड्स' ही कथा कॉर्पोरेट जगताची आणि त्यातच फुलणाऱ्या–घुसमटणाऱ्या प्रेमाची ओळख करून देते. बॉस, तरुण–तरुणी असे विश्व कॉर्पोरेट जगताचे असते, जे दुरून आणि आतून पूर्णपणे वेगळे असते, ज्याला पर्सनल लाइफ आणि प्रोफेशनल लाइफ असे कप्पे असतात. भावनांच्या खेळाला या कप्प्यात बंदिस्त करणे किती अवघड असते, याचा परिचय या कथेत करून दिलेला आहे. पाटीलसर, मिनाली, पंकज, नेत्रा या व्यक्तिरेखा या कथेत आहेत. त्यातला पंकज नावाला श्लेष आहे. कमळांशी तुलना करून त्याच्या वागण्याचा–जगण्याचा संदर्भ लेखिकेने चपखलपणे प्रसंगानुरूप त्याच्या पाकळ्यांप्रमाणे फुलवलेला आहे. अंगठीची केलेली योजनाही कल्पक आहे. शेवटपर्यंत ही कथा हिंदोळ्यावर उंच झोके घेत घेत प्रत्येक व्यक्तिरेखेशी वाचकाला गुंतवून ठेवते.

या संग्रहातील सगळ्याच कथा वेगवेगळ्या टप्प्यावरच्या आहेत. प्रेम, विवाह, विनोद, विज्ञान, अपघात, वृद्धाश्रम अशा आयुष्यातील अनेक टप्प्यांना कथेत गुंफताना सुख–दु:ख, यश–अपयश, मिलन–ताटातूट, सकाळचे जाणारे ऋणानुबंध, संस्कार, सुसंस्कृतपणा हे घटक अपरिहार्यपणे तरीही तितक्याच ताकदीने हाताळलेले आहेत. यातील सर्वात लक्षात येणारी बाब म्हणजे येणारे सगळे घटक कथेला घट्ट वीण प्रदान करतात. कथेचा शेवट हा तिच्या यशापयशाचा मानबिंदू असतो. तो असा असावा याचे भान लेखिकेने प्रत्येक कथेसाठी जपलेले आहे. संवादावर लेखिकेची हुकमत आहे. नाटकात ज्याप्रमाणे प्रसंगानुरूप अचूक आणि नेमका संवाद असतो, ज्यावरून केवळ प्रसंगच नाही तर व्यक्तिरेखेचे व्यक्तिमत्त्वही उजळून निघते. त्या प्रकारचे हे प्रगल्भ प्रवाही संवाद आहेत. 'कपानं सांडलं तर बशीनं सांभाळून घ्यावं. संसार असाच असतो बरं!' 'तू खरोखर जंटलमन आहेस. तुझं नाव सार्थ केलंस. भोवताली दलदल असूनही त्याच्यावर तरंगत राहिलास. कोणावरही चिखलफेक होऊ दिली नाहीस.'

कथा दमदार असावी, तशी लेखकाची भाषेवरही हुकमत असावी लागते. ती लेखनातून वाचकाच्या निदर्शनास येते. वैशाली फाटक–काटकर यांच्या कथा या दोन्हींचा प्रत्यय देतात. 'त्या सगळ्याला आकाशने मूठमाती दिली असल्यामुळे अजून खणून काढून मातीच उपसली गेली असती.' 'दीड डझन काकड्या आणून सोलू न शकणारा मी दीड शहाणा ठरलो' अशी वाक्ये वेगळाच आनंद देऊन जातात.

वैशाली फाटक–काटकर या कॉम्प्युटर आणि स्टॅटिस्टिक या विषयातील तज्ज्ञ आहेत. अनेक वर्षे परदेशी वास्तव्य, तरीही त्यांच्या मराठी लेखनातील आविष्कार मोहिनी घालावा, असा उत्कट, हळुवार, प्रवाही आणि थेट भिडणारा आहे. त्यांचे विस्तारलेले अनुभव, प्रगल्भ जाणिवा, आपल्या आसपासचा परीघ टिपणारे निरीक्षण. यामुळे त्याचे लेखन आजच्या सकस साहित्यात आपले स्थान निर्माण करणारे आहे.

स्त्रीमनाचे भावविश्व, कॉर्पोरेट जगत, ऱ्हास पावणाऱ्या मूल्यांनाही बहर फुटू शकण्याची शक्यता या सगळ्यांना आपल्या चित्रात सामावून घेणारे सतीश भावसार यांचे मुखपृष्ठ या संग्रहाला लाभलेले आहे. मीनाक्षी दादरावाला याची आस्वादक प्रस्तावना संग्रहाचे अंतरंग उलगडून दाखवणारी आहे.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**गोरवेणा**
**डॉ. विजय जाधव**



**नाही मनोहर तरी सुरम्य हृदयी**

*''गोरवेणा हा डॉ. विजय जाधव यांचा दुसरा कथासंग्रह. त्यांचा पहिला कथासंग्रह आहे 'अस्वस्थ तांडा.' 'अस्वस्थ तांडा' या कथासंग्रहाचे स्वागत वाचकांनी उत्स्फूर्तपणे केले. तसे अनेक पुरस्कारांनी त्यांचा सन्मान करताना स्वत:ला सन्मानित करून घेतले, त्यात राज्य शासनाच्या पुरस्काराचाही समावेश आहे. एक वेगळा कथासंग्रहइतकीच त्याची ओळख नव्हती, त्यात आलेले समाजजीवन, जीवनशैली अणि त्याची लेखनशैलीही वेगळीच असल्याची कबुली सगळ्यांनाच द्यावी लागली. तोच अनुभव 'गोरवेणा' हा कथासंग्रह देण्याइतका समर्थ, कसदार, दमदार आणि अपेक्षा उंचावणारा आहे, असे खात्रीने नमूद करावेसे वाटते.''*

लेखक ज्या समाजजीवनाचा प्रतिनिधी आहे, त्याने जे पाहिले-अनुभवले, अंतर्मनाला झोंबले, त्याचे चित्रण या कथासंग्रहात आहे. परंतु हे काही वार्तांकन नाही. एक टाहो फोडणारे निवेदन नाही. हे आहे एका संवेदनशील, संस्कारक्षम मनाने टिपलेली, एका आत्मीय तन्मयतेने चितारलेली प्रतिबिंबित तरल प्रवाही फास घालणारी मजबूत गुंफण, खास अनवट अस्पर्शित लेखनशैलीची साज असलेली ही शैली लेखकाची ओळख निर्माण करणारी आहे. कुठलेही ललित लेखन करताना त्यात लालित्याचा पदन्यास असायलाच हवा, अट्टहासाने नव्हे, सहज स्वयंस्फूर्त प्रतिभेने रंग-गंध-स्पर्शांसह फुलणारा. त्यातली नजाकत अलगदपणे अंतर्मनाचा तळ प्रफुल्लित करणारी तर ते लेखन नुसतेच 'भावले' या सदरात मोडत नाही, ते जाऊन बसते 'चिरंजीव' या सदरात. 'गोरवेणा' या सदरात जाऊन बसणारे, स्वत:चे स्थान निर्माण करणारे साहित्य आहे, असे हे पुस्तक वाचल्यानंतर खात्रीने म्हणता येते.

ग्रंथाली सातत्याने नव्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आली आहे. अनेक उदयोन्मुख लेखक व्यासपीठावर आणले ते ग्रंथालीने. लेखक कसा लिहितो, त्यांची लेखनतंत्रावरील हुकमत किती प्रभावी आहे, हे पाहण्यापेक्षा तो जीवनानुभवाला किती उत्कटपणे भिडला आहे आणि ते त्याने कागदावर किती सहजपणे मांडले आहे, हे ग्रंथालीला विशेष महत्त्वाचे वाटते. साहित्यात आलेले अनेक नवनवे प्रवाह आले, निर्माण झाले, सर्वमान्य झाले, प्रस्थापित झाले ते ग्रंथालीच्या या ध्यासामुळे 'गोरवेणा' आणि त्याचे लेखक डॉ. विजय जाधव हे या ध्यासगंगेतील एक ध्रुव ठरावेत.

'गोरवेणा' या कथासंग्रहात एकूण तेरा कथा आहेत. बंजारा समाज आणि त्यांचा तांडा यांचे चित्रण या कथांमधून केलेले आहे. बंजारा समाज डोंगरकुशीच्या आश्रयाला असलेला, सतत कष्ट करणारा, समूहाने राहणारा समाज. वस्ती करून राहतात त्या वस्तीला 'तांडा' म्हटले जाते. लेखकाच्या भाषेत सांगायचे तर तांड्यात गाव नाही आणि गावात तांडा नाही. कष्ट आणि सततचे स्थलांतर यामुळे स्थैर्य नाही. परिणामी शिक्षणामुळे दुर्लक्ष आणि अंधश्रद्धाचा पगडा वाढलेला. या सगळ्यामुळे प्रगतीवर, स्वास्थ्यावर झालेला परिणाम. त्यातच दारू हा एक जिव्हाळ्याचा भासावा असा विषय. ह्यातच लग्न, हुंडा यांचा जीवघेणा संबंध. हे सगळे या कथांच्या केंद्रस्थानी आहे. 'पौर्णिमेचं चांदणं' ही कथा या सगळ्या घटकांना सामावून घेणारी आहे. त्यातच अलीकडील मोबाइल, डीजे यांचा समावेश घेणारी आहे. स्वत:च्या लग्नात वेळेवर मंडपात हजर व्हावे याचे भान सोडून दारू पिऊन डीजेच्या तलावर नवरदेव नाचत राहतो, हा जुन्या आणि नव्याचा घेतलेला घातक अंगीकार अंगावर काटा आणणारा आहे. यात प्रेरणाने घेतलेला पुढाकार आणि दाखवलेले धैर्य ही नव्या युगाची पहाट ठरावी.

'उसतोडणी' हा तांड्यावरील कष्टकऱ्यांसाठी सुगी. परंतु ती किती जीवघेणी आहे, याचे चित्रण 'गोरवेणा' या कथेत आलेले आहे. परिस्थितीची अगतिकता आणि तिला सामोरे जाताना होणारी फरफट ही या समाजाच्या पाचवीला पूजलेली असल्यासारखी पाठपुरावा करते.

'मोहवृक्ष', 'गीता', 'सांगड' या कथा आपण प्रत्यक्ष तांड्यावर आहोत इतक्या प्रत्ययकारी भास निर्माण करतात. कोरोनाचा काळ कुणालाच टाळता आलेला नाही. 'आक्रोश' ही कथा त्या काळाचे क्रूर दर्शन घडवते.

तांडा आणि बंजारा समाज यांचा भूतकाळ आणि वर्तमानकाळ लेखकाने प्रत्यक्ष पाहिला-अनुभवला. तेथील परिस्थिती तशीच राहावी, याच्याविरोधात लेखक उभा आहे. जे वाहून गेले ते अडवता आले नाही. परंतु जे वाहून जाण्याच्या किनाऱ्यावर उभे आहे त्यांना तर थोपावण्याचा प्रयत्न करता येऊ शकतो. त्याबाबत लेखक स्वत:ची भूमिका स्पष्ट करतो. 'भविष्यकाळ' उज्ज्वल असावा यासाठी साहित्यातून सतत उजेडबीज पेरत राहणार आहे. तांड्या-तांड्यावर शिक्षणाची ज्योत पेटणार आहे. यासाठी त्यांचे मनोगत वाचनीय ठरते. प्रमोद वाळके यांची अतिशय अभ्यासपूर्ण प्रस्तावना या कथासंग्रहाला लाभली आहे. त्यांनी लेखक आणि त्यांचे लेखन यांची चिकित्सक पद्धतीने मांडणी केली आहे.

संजय कुलकर्णी यांनी सुंदर मुखपृष्ठ सजवलेले आहे. बंजारा समाजाची पारंपरिक वेशभूषा ही छानपणे साकारलेली आहे.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**




# ग्रंथपान

**माझी कॉर्पोरेट दिंडी**

**माधव जोशी**




**जमिनीवर पाय घट्ट रोवून आकाशाला हात लावणाऱ्या माणसाची गोष्ट**

*''मी दीड ते दोन वर्षांत जर्मनीच्या बावीस वाऱ्या केल्या. कधी कधी ब्रिटिश एअरवेजने लंडनमार्गे कलोनला जायचो; पण बऱ्याच वेळा लुफ्तान्साने मुंबई ते फ्रँकफर्ट व पुढे कलोन असा प्रवास असे. लुफ्तान्सा ही त्यावेळी जर्मन सरकारची विमानकंपनी होती. फ्रँकफर्ट ह मुख्य तळ होता. वेयर ही जर्मन बहुराष्ट्रीय कंपनी असल्याने लुफ्तान्साने प्रवास हा जवळजवळ नियम होता.''*

कॉर्पोरेट जग ही औद्योगिक क्षेत्राशी संबंधित असलेली संज्ञा तशी आता अपरिचित राहिलेली नाही. तरीही मान्य करावे लागेल की आपला सामान्य माणसांचा तिच्याशी जवळून खास असा परिचय नाही. ऐकायला गोड वाटते, तशी गूढ, कुतूहल असलेली ही संज्ञा आहे. दुरून डोंगर साजरे या न्यायाने आपण तिला दाद देतो, गझल समजली नाहीतरी दाद देतो. इतरांचे आपणही रसिक आहोत असा देखावा करण्यासाठी. मग या कॉर्पोरेटचे अंतरंग जवळून पाहणे, समजून घेणे दूरच. परंतु कुणी या जगताविषयी सांगितले; स्वत:च्या अनुभवातून, तर नक्कीच आपण त्यांच्या या विश्वाशी एकरूप होऊ. अचंबित होऊन का होईना पण होणारच! 'माझी कॉर्पोरेट दिंडी' हे पुस्तक आता आपल्या हाती आले आहे, एक समृद्ध अनुभवसंपन्न असे कथन त्यातून आपल्यासमोर उलगडते आहे. इतके की आपण खरोखर अचंबित व्हावे. त्याने अचंबित झालो तरी अनुभवाने आपणही सृमद्ध झाल्याचे जाणवत राहते, हा आनंद वेगळाच!

'माझी कॉर्पोरेट दिंडी' या आत्मकथनाचे नायक आहेत माधव जोशी. त्यांनी आयुष्यात फक्त एकदाच मुलाखत दिली. नोकरी मिळवण्यासाठी, अगदी सुरुवातीच्या काळात. त्यानंतर त्यांना कधीही मुलाखत द्यावी लागली नाही, अर्ज सादर करावे लागले नाहीत. कॉमर्सचे पदवीधर असलेले माधव जोशी लेखनिक म्हणून रुजू झाले. पुढे त्यांनी यशाची अशी शिखरे पादाक्रांत केली, की कॉर्पोरेट जगताचे ते सन्माननीय व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जाऊ लागले. डायरेक्टर, संचालक, अध्यक्ष हे शब्द त्यांच्यापुढे गुळगुळीत ठरले. मोठमोठ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी त्याच्यासाठी रेड कार्पेट अंथरले. एक मराठी माणूस जिद्दीने, ध्यासाने आणि व्यासंगाने हात इतका उंचावतो की आकाश चार अंगुली फक्त अंतर ठेवून राहते. अभिमान आणि गर्व यांची कुठेही गल्लत न करणारी ही माधव जोशींची दिंडी आपल्यालाही तिच्यात सहभागी करून घेतल्याशिवाय राहत नाही.

सुरुवातीच्या पहिल्या टप्प्यात सुरेश राजे नावाचे अधिकारी लाभले. त्यांच्याकडून सर्वकाही शिकून घेतले. इतके की राजे यांनीच मान्य केले, एक लेखिनिक असूनही तू सीएची कामे करण्याची पात्रता तुझ्यात आली आहे; तीही अवघ्या सहा महिन्यांत. पुढे सुरेश राजे यांनीच माधव जोशींना आपला आवडता हुशार सहकारी म्हणून बढतीच्या संधी सोन्यासारख्या बहाल करताना कधी हात आखडता घेतला नाही. पुढे सुब्राह्मनिअन भेटले, त्यांनीही सुरेश राजेची परंपरा वरदहस्तासारखी कायम ठेवली. कंपनी सेक्रेटरीची फायनल परीक्षा पास झाल्यानंतर याच सुब्राह्मनिअन यांनी जो उदार दृष्टिकोन ठेवला, तो माधव जोशी यांच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. तिथून पुढे माधव जोशी यांना मागे वळून पाहण्याची कधी फुरसत मिळाली नाही. त्यांच्या यशाच्या चढत्या आलेखाचा नुसता आढावा घेतला तरी आपली दमछाक व्हावी.

ठाणे येथे असलेली एपीव्ही, कॅडबरी, कलरकेम, मेल्ट्रॉन, बायर, ह्युजेस इस्पात, टाटा समूह अशा विविध औद्योगिक कंपन्यांसोबत त्यांनी विविध पदांवर काम करताना त्यांनी स्वत:ची मोहर उमटवलेली आहे.

हा सगळा प्रवास म्हणजे एखाद्या निष्ठावान भाविकाने प्रत्येक वारीत सहभागी व्हावे, आपली भक्ती परमेश्वरचरणी अर्पण करावी, असाच निखळ योगकर्म सांगणारा आहे. या प्रवासात जशी गावे लागतात, सरकारी-वरिष्ठ लाभतात, निसर्गही सोबतीला असतो. तसे माधव जोशी यांनी त्यांना सहकारी, वरिष्ठ म्हणून लाभलेल्या केकोबाद मिस्त्री, प्रथमन कौल ब्रेनायझर, डॉ. इराणी, रतन टाटा अशा अनेकांच्या व्यक्तिमत्त्वांविषयी मनमोकळेपणे लिहिलेले आहे. त्यांच्यातले मोठेपण दिलखुलासपणे मांडलेले आहे. केलेल्या परदेशप्रवासाविषयी माहिती आहेच, सोबत त्यातल्या नेमक्या वैशिष्ट्यांकडे ते ज्या नजरेने पाहतात ती नजर कॅमेऱ्याची आहे, हे त्यातून जाणवते.

औद्योगिक क्षेत्रात सर्वोच्च पदावर काम करताना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींचा अभ्यास असावा लागतो. त्यांचा प्रगती आणि विस्तार यावर परिणाम कसा होतो, हेही लक्षात ठेवावे लागते. भारताने केलेल्या अणुचाचण्यांचा परिणाम कसा झाला, टू जी स्पेक्ट्रम घोटाळा याचे स्वरूप, वायटूकेची यासारख्या घटना आपल्यासाठी वृत्तपत्रीय बातम्या होत्या. परंतु माधव जोशी यांनी त्यांची धूपछाँव अनुभवलेली आहेत.

रतन टाटांसारख्या महाउद्योगपतींसोबत काम करण्याचा अनुभव, वकील म्हणून पी. चिदंबरम यांचा अनुभव, ज्योती बसू, मनमोहन सिंग, मूपनार, कांशीराम, कपिल सिब्बल, अरुण शौरी यांच्यासमवेतचे अनुभव एका वेगळ्याच विश्वात घेऊन जातात.

२६/११/२००८ ला ताज हॉटेलवर झालेल्या अतिरेकी हल्ल्याची माहिती आपणास आहे ती वरवरची. प्रत्यक्ष यावेळी ताजमध्ये परिस्थिती कशी होती, तेथील कर्मचाऱ्यांनी जिवावर उदार होऊन संयम दाखवत ग्राहकांची कशी सेवा केली, रतन टाटा हे यावेळी कसे त्यात सहभागी होते हा वृत्तांत अंगावर काटा आणणारा आहे, आपल्यासाठी नवीन आहे. तो या 'दिंडी'त माधव जोशी यांनी दिलेला आहे.

सतीश भावसार यांनी सुंदर मुखपृष्ठ सजवलेले आहे.

**मूल्य ३०० रुपये सवलतीत १८० रुपये**

# पुस्तकप्रकाशनाची क्षणचित्रे




▲१



▲२



▲१२



▲३



▲४



▲५




▲६



▲७



▲८



▲९



▲१०



▲११

१. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत पर
आधारित उत्तर कर्नाटक का
नाट्य संगीत!

२. अरिंदम

३. जिवलग जिवाचे

४. कथा मेपल कळ्यांच्या

५. धर्मसत्ता की ज्ञानसत्ता आणि
एकला चलो रे

६. कथा जेनीची : तुम्हा-आम्हा सर्वांची

७. विश्लेषण

८. वसंतदादा

९. पाऊसपर्ण

१०. गणिती काव्य या अनोख्या
प्रयोगाबाबत कवी डॉ. केदार हर्डीकर
यांच्याशी अनौपचारिक चर्चा

११. वादळवाट

१२. सकेडा

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.
Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.